अकोला । शनिवार
दि. २६ जुलै २०२५
वर्ष : १९ अंक : १४६
पाने : ८ + ४

दैनिक **अजिंक्य भारत** बातम्यांचा गतिमान पाठलाग

www.ajinkyabharat.com

स्वागत मूल्य ३ रुपये




# अश्लील आणि आक्षेपार्ह : २५ ओटीटी प्लॅटफॉर्म्स आणि ॲप्सवर बंदी!

नवी दिल्ली, दि. २५ वृत्तसंस्था

**केंद्र सरकारने अश्लील आणि आक्षेपार्ह मजकूर प्रसारित करणाऱ्या २५ ओटीटी (ओव्हर-द-टॉप) प्लॅटफॉर्म्स आणि ॲप्सवर बंदी घातली आहे. यामध्ये उल्लू, आल्ट बालाजी, डेसीफ्लिक्स, बिग शॉट्स यांसारख्या प्रसिद्ध ॲप्सचाही समावेश आहे. सूचना आणि प्रसारण मंत्रालयाने या ॲप्सना तात्काळ बंद करण्याचे आदेश दिले असून, इंटरनेट सेवा प्रदात्यांना या वेबसाइट्स आणि ॲप्सवर भारतात प्रवेश बंद करण्यास सांगितले आहे.**




मंत्रालयाने जारी केलेल्या अधिसूचनेनुसार, या ॲप्सवर दाखवला जाणारा मजकूर भारतीय कायदा आणि सांस्कृतिक मूल्यांचे उल्लंघन करणारा आहे. या प्लॅटफॉर्म्सवर अश्लील जाहिराती आणि पोर्नोग्राफिक मजकूर प्रसारित होत असल्याचे आढळले. हा मजकूर सामाजिक किंवा कथानकाच्या दृष्टिकोनातून कोणतेही मूल्य नसलेला असून, विशेषतः लहान मुलांपर्यंत त्याचा सहज प्रवेश होत असल्याने ही कारवाई करण्यात आली आहे.

या ॲप्सवर दाखवल्या जाणाऱ्या मजकुरामुळे खालील कायद्यांचे उल्लंघन झाल्याचे सरकारने नमूद केले आहे. सूचना प्रौद्योगिकी कायदा, २००० : कलम ६७ आणि ६७ (इलेक्ट्रॉनिक स्वरूपात अश्लील मजकूर प्रसारित करणे).

भारतीय न्याय संहिता, २०२३: कलम २९४ (अश्लील कृत्ये आणि गाणी); महिलांचे अश्लील चित्रण (प्रतिबंध) कायदा, १९८६: कलम ४ (महिलांचे अश्लील चित्रण); या ॲप्सवर दाखवल्या जाणाऱ्या सामग्रीत "कथानकाचा अभाव" आणि "अनावश्यक लैंगिक दृश्ये" असल्याचे सरकारच्या तपासात आढळले, ज्यामुळे ती "पोर्नोग्राफिक" स्वरूपाची ठरली.

या कारवाईला सर्वोच्च न्यायालयाच्या सूचनांचाही आधार आहे. एप्रिल २०२५ मध्ये, ओटीटी आणि सोशल मीडियावरील अश्लील मजकुराविरोधात दाखल झालेल्या एका जनहित याचिकेवर कोर्टाने सुनावणी केली होती. कोर्टाने याबाबत कार्यकारी किंवा विधायी मंडळाकडे कारवाईची जबाबदारी सोपवली होती, परंतु कारवाईची गरज अधोरेखित केली होती. सॉलिसिटर जनरलनेही विद्यमान नियम आणि इतर उपायांचा उल्लेख केला होता. सूचना आणि प्रसारण मंत्रालयाने दूरसंचार विभागाला या बंदीच्या अंमलबजावणीसाठी इंटरनेट सेवा प्रदात्यांना सहकार्य करण्यास सांगितले आहे. ही कारवाई डिजिटल सामग्री नियमन आणि भारतीय कायद्यांचे पालन सुनिश्चित करण्याच्या सरकारच्या वचनबद्धतेचा भाग आहे.

### बंदी घालण्यात आलेल्या ॲप्सची यादी

» उल्लू, आल्ट बालाजी, डेसीफ्लिक्स, बिग शॉट्स, बूमेक्स, नवरसा लाइट, गुलाब ॲप, कंगन ॲप, बुल ॲप, जलवा ॲप, वाउ एंटरटेनमेंट, लुक एंटरटेनमेंट, हिटप्राइम, फेनेओ, शोएक्स, सोल टॉकीज, अड्डा टीव्ही, हॉटएक्स व्हीआयपी, हलचल ॲप, मूडएक्स, नियोनएक्स व्हीआयपी, फूगी, मोजफ्लिक्स, ट्रायफ्लिक्स.

## महत्त्वाचे

### युद्धासाठी शस्त्र आणि शास्त्र दोन्ही आवश्यक



**नवी दिल्ली :** संरक्षण प्रमुख (सीडीएस) जनरल अनिल चौहान म्हणाले की, 'ऑपरेशन सिंदूर' अजूनही सुरू आहे आणि सैन्याला नेहमीच सर्वोच्च सतर्क राहावे लागेल. ते म्हणाले की, युद्धासाठी शस्त्र आणि शास्त्र (ज्ञान) दोन्ही आवश्यक आहेत. अनिल चौहान म्हणाले की, ऑपरेशन सिंदूर अजूनही सुरू आहे आणि सैन्याने सर्व परिस्थितीत २४७, ३६५ दिवस तयार राहिले पाहिजे. त्यांनी यावर भर दिला की युद्ध केवळ शस्त्रांनी नाही तर शास्त्राने म्हणजेच ज्ञानाने देखील लढले जाते. आजचे युद्ध हे पारंपारिक आणि आधुनिक पद्धतींचे मिश्रण आहे, ज्यामध्ये गतिज (शस्त्र-आधारित) आणि गैर-गतिज (माहिती-आधारित) दोन्ही रणनीतींचा समावेश आहे. हे पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या पिढीतील युद्ध तंत्रांचे समन्वय आहे.

### धनखड यांना काढून टाकण्यात आले- चव्हाण



**पुणे :** भारताचे उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी आरोग्याच्या कारणामुळे पद सोडत असल्याचे म्हणत राजीनामा दिला. अश्यातच उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी राजीनामा दिला नाही तर त्यांना काढून टाकण्यात आल्याचा घणाघात माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी केला. दिल्लीतील घडामोडींवर त्यांनी त्याचे स्पष्ट मत नोंदवले. पुणे दौऱ्यावर असताना त्यांनी विविध विषयावर परखड मतं मांडले. अंतर्गत वादामुळे दुर्दैवी पद्धतीने त्यांना पदावरून काढण्यात आलं. धनखड यांना राजकीय हेतूने उपराष्ट्रपती पदावर बसवलं होतं, तेच मुळात चुकीचं होतं. त्यांचा राजीनामा जबरदस्तीने घेतला गेला. 'दाल में कुछ काला है ऑल इज नॉट वेल इन दिल्ली' असा टोला चव्हाण यांनी लगावला.

### महिलांबद्दल असे बोल निंदनीय – प्रियंका चतुर्वेदी

**नवी दिल्ली :** आध्यात्मिक गुरू अनिरुद्धाचार्य यांच्या महिलांबद्दलच्या कथित आक्षेपार्ह आणि अपमानास्पद विधानावर राजकीय प्रतिक्रिया तीव्र झाल्या आहेत. शिवसेनेच्या (उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या) राज्यसभा खासदार प्रियंका चतुर्वेदी यांनी या मुद्द्यावर कडक भूमिका घेतली. प्रियंका चतुर्वेदी म्हणाल्या, तुम्ही स्वतःला आचार्य आणि गुरुजी समजता आणि लाखो लोक तुम्हाला भेटायला येतात. अशा परिस्थितीत तुम्ही महिलांबद्दल असे बोललात तर ते अत्यंत निंदनीय आहे.

# सरकारी शाळेचे छत कोसळून ७ विद्यार्थ्यांचा मृत्यू

## राजस्थानच्या झालावाड जिल्ह्यातील पिपलोडी गाव शोकमग्न

जयपूर, दि. २५ वृत्तसंस्था

राजस्थानच्या झालावाड जिल्ह्यातील पिपलोदी गावात आज सकाळी शाळेचे छत कोसळले. ही दुर्घटना सकाळच्या प्रार्थनेनंतर घडली. मुलं वर्गात गेली आणि काही क्षणांत सातवीच्या वर्गाचा छप्पर अंगावर कोसळला. ज्यामुळे शाळा परिसरात एकच गोंधळ उडाला. यात सात मुलांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. या दुर्घटनेनंतर शिक्षणमंत्री मदन दिलावर यांनी घटनेच्या उच्चस्तरीय चौकशीचे आदेश दिले आहेत.



पिपलोदी गावातील या शाळेचं आधी छत कोसळलं, त्यानंतर भिंतही कोसळली. या घटनेत ३५ विद्यार्थी आणि शिक्षक ढिगाऱ्याखाली अडकले. दुर्घटना घडताच शाळेत एकच गोंधळ माजला, सगळीकडे फक्त किंचाळण्याचा आवाज येत होता. ढिगाऱ्याखाली अडकलेले सर्व विद्यार्थी इयत्ता सातवीचे असल्याचे समोर आले आहे. जेसीबी मागवण्यात आला आणि त्याच्या मदतीने ढिगारा बाजूला केला जाऊ लागला. मात्र, तोपर्यंत सात विद्यार्थी आणि एका शिक्षकाचा मृत्यू झालेला होता. तर, २८ विद्यार्थ्यांना तात्काळ उपचारासाठी सीएचसी रुग्णालयात नेण्यात आलं. तीसहून अधिक विद्यार्थी जखमी झालेत. त्यातील दहा जण मृत्यूशी झुंज देता आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि प्रशासनाचे वरिष्ठ अधिकारी, तसेच बचाव पथक घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी ढिगाऱ्याखाली अडकलेल्या मुलांना बाहेर काढण्याचे काम सुरू केले. स्थानिक नागरिकही (पान २ वर)

### पंतप्रधान मोदींनी केले दुःख व्यक्त

» झालावाड शाळेतील अपघातात मुलांच्या मृत्यूबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दुःख व्यक्त केले. पंतप्रधान म्हणाले, ही दुर्घटना अत्यंत दुःखद आहे. या कठीण काळात माझ्या संवेदना बाधित विद्यार्थ्यांसोबत आणि त्यांच्या कुटुंबियांसोबत आहेत. जखमींना लवकर बरे व्हावे अशी मी प्रार्थना करतो. पंतप्रधानांनी सर्वतोपरी मदत करण्याबाबतही सांगितले आहे.

# राज्य मंत्रिमंडळात होणार मोठे फेरबदल!

## ८ मंत्र्यांना मिळणार डच्चू?



मुंबई, दि. २५ वृत्तसंस्था

राज्यातील राजकारणात विविध घडामोडी सुरु आहेत. याच पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे मंत्रिमंडळात लवकरच मोठे फेरबदल करतील, अशी शक्यता वर्तवली जात आहे. शिवसेनेच्या मुखपत्रात याबद्दलचा दावा करण्यात आला आहे. महायुती सरकारमधील ८ वादग्रस्त मंत्र्यांना लवकरच डच्चू देण्यात येणार असल्याचे बोलले जात आहे. त्यांच्या ऐवजी काही नव्या चेह-यांना मंत्रिमंडळात संधी दिली जाईल, असे बोलले जात आहे. यात भाजपचे दोन, शिंदे गटातील चार आणि पवार गटातील दोन मंत्र्यांचा समावेश असल्याची माहिती समोर येत आहे. विधानसभा निवडणुकीत भाजप महायुतीला मोठे यश मिळाले. यानंतर राज्यात महायुतीचे सरकारही (पान २ वर)

# विरोध डावलून देशभर मतदार यादीची पुनर्रचना

## लवकरच वेळापत्रक जाहीर करणार

नवी दिल्ली, दि. २५ वृत्तसंस्था

बिहारमध्ये निवडणूक आयोगाकडून केल्या जाणाऱ्या मतदार यादीच्या सखोल पुनर्रचनाला संसदेपासून ते रस्त्यापर्यंत विरोध केला जात आहे. असा प्रचंड विरोध असूनही, निवडणूक आयोगाने शुक्रवारी एक मोठी घोषणा केली. खरं तर, निवडणूक आयोगाने म्हटले आहे की देशभरात मतदार यादीच्या सखोल पुनरीक्षणाचे काम सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. लवकरच यासाठीचे वेळापत्रक जाहीर केले जाईल.



निवडणूक आयोगाने २४ जून रोजीच या संदर्भात एक आदेश जारी केला होता आणि म्हटले होते की, मतदार यादीच्या सखोल पुनरीक्षणाचे हे काम संवैधानिक कर्तव्याच्या अंतर्गत आणि मतदार यादीच्या अखंडतेसाठी आणि सुरक्षिततेसाठी केले जाईल. आता निवडणूक आयोगाने हे काम सुरू केले आहे. मतदार यादीची अखंडता राखणे ही निष्पक्ष आणि मुक्त निवडणुकांसाठी मूलभूत आवश्यकता आहे. मतदार यादी तयार करण्याची पात्रता, प्रक्रिया आणि पद्धतीबद्दल माहिती लोकप्रतिनिधी कायदा, १९५० आणि निवडणूक नियम नोंदणी, १९६० अंतर्गत देण्यात आली आहे. गेल्या महिन्यात २४ जून रोजी निवडणूक आयोगाने बिहारमध्ये विशेष मतदार सघन पुनरीक्षण (एसआयआर) करण्याचे निर्देश दिले होते. २५ जून ते २६ जुलै २०२५ दरम्यान हे मतदान होणार आहे. निवडणूक आयोगाचे म्हणणे आहे की, मतदार यादीतील दोन ठिकाणी नोंदणीकृत बनावट, अपात्र आणि मतदारांना काढून टाकण्याच्या उद्देशाने ही पुनरावृत्ती केली जात आहे. त्याच वेळी, विरोधी पक्षांचा आरोप आहे की, निवडणूक आयोग या विशेष सखोल पुनरावृत्तीद्वारे मागच्या दाराने लोकांचे नागरिकत्व (पान २ वर)

### आई-वडिलांच्या सेवेसाठी मिळणार रजा

**नवी दिल्ली :** नोकरी आणि कुटुंबाची जबाबदारी, विशेषतः वृद्ध आई-वडिलांची काळजी, या दुहेरी भूमिकेत अडकलेल्या केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांसाठी एक दिलासादायक बातमी आहे. केंद्रीय कार्मिक राज्यमंत्री जितेंद्र सिंह यांनी संसदेत स्पष्ट केले आहे की, कर्मचाऱ्यांना आपल्या आजारी किंवा वृद्ध आई-वडिलांच्या सेवेसाठी रजा घेण्याची तरतूद आधीपासूनच नियमांमध्ये उपलब्ध आहे. या घोषणेमुळे लाखो कर्मचाऱ्यांना मोठा आधार मिळाला आहे. संसदेच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान राज्यसभेत एका प्रश्नाला उत्तर देताना मंत्री जितेंद्र सिंह यांनी ही महत्त्वपूर्ण माहिती दिली. काही खासदारांनी वृद्ध पालकांच्या काळजीसाठी कर्मचाऱ्यांना विशेष रजेची तरतूद आहे का, असा प्रश्न विचारला होता. यावर उत्तर देताना सिंह यांनी सांगितले की, केंद्रीय नागरी सेवा (रजा) नियम, १९७२ अंतर्गत अशी सुविधा आधीपासूनच अस्तित्वात आहे.

# ओबीसीच्या रक्षणात कमी पडलो, ही माझी चूक - राहुल गांधी

नवी दिल्ली, दि. २५ वृत्तसंस्था

काँग्रेसचे नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी शुक्रवारी दिल्लीतील तालकटोरा स्टेडियम येथे आयोजित 'भागीदारी न्याय संमेलनात' अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीय यांच्या मुद्द्यांवर जोरदार भाष्य केले. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्यासह पक्षातील अनेक वरिष्ठ नेते या संमेलनाला उपस्थित होते. राहुल गांधी यांनी यावेळी ओबीसी समाजाच्या हक्कांसाठी पुरेसे प्रयत्न न झाल्याची कबुली देत, ही चूक सुधारण्याचा संकल्प व्यक्त केला.

राहुल गांधी म्हणाले, मला राजकारणात २१ वर्षे झाली. या काळात मी जमीन अधिग्रहण विधेयक, मनरेगा, अन्न सुरक्षा कायदा आणि आदिवासी विधेयकासाठी लढा दिला. पण



ओबीसी समाजाच्या हक्कांसाठी ज्या पद्धतीने रक्षण करायला हवे होते, ते मी करू शकलो नाही. याचे कारण म्हणजे, त्या वेळी मला ओबीसीच्या समस्यांची खोली समजली नव्हती. दलित आणि आदिवासींच्या समस्या मला तेव्हा नीट समजल्या होत्या, पण ओबीसीच्या अडचणी लपलेल्या होत्या. राहुल पुढे म्हणाले, ओबीसीच्या समस्या मला तेव्हा पूर्णपणे (पान २ वर)

### जातनिहाय जनगणना हा पहिला टप्पा

» राहुल गांधींनी अर्थसंकल्पाच्या हलवा वितरणाच्या परंपरेचा उल्लेख करत सांगितले, देशातील ९०% लोकसंख्या ही उत्पादक शक्ती आहे. हलवा बनवणारे तुम्ही आहात, पण तो खातात दुसरेच. आम्ही हे म्हणत नाही की त्यांनी हलवा खाऊ नये, पण तुम्हालाही त्यात हिस्सा मिळाला पाहिजे. त्यांनी जातनिहाय जनगणना हा पहिला टप्पा असून, ओबीसी समाजाला शिक्षण, राजकारण आणि न्यायव्यवस्थेत योग्य प्रतिनिधित्व आणि सन्मान मिळवून देणे हा आपला मुख्य उद्देश असल्याचे स्पष्ट केले.

# सहमतीने लैंगिक संबंधांसाठी वयोमर्यादा १८ वर्षांहून कमी करणे धोकादायक

## केंद्र सरकारची सुप्रीम कोर्टात माहिती

नवी दिल्ली, दि. २५ वृत्तसंस्था

सुप्रीम कोर्टात सुनावणी दरम्यान केंद्र सरकारने ठामपणे सांगितले, की भारतात लैंगिक सहमतीची वयोमर्यादा १८ वर्षांहून कमी केली जाऊ नये. सरकारने दिलेल्या सादरीकरणात सांगितले की, अल्पवयीन मुलांचे लैंगिक शोषण थांबवण्यासाठी १८ वर्षे वयोमर्यादा अनिवार्य आहे, आणि याला कदापि कमी करणे मुलांच्या संरक्षण कायद्यांसाठी धोकादायक ठरू शकते.



अल्पवयीन मुलांचे संरक्षण करणाऱ्या कायद्यांमध्ये कोणताही बदल मुलांच्या शोषणाला वाव देणारा ठरेल. या मुद्द्याचा विचार करताना, सरकारने न्यायालयाला मुलांच्या कायदेशीर सुरक्षिततेची गांभीर्याने दखल घ्यायला सांगितले. केंद्र सरकारने सांगितले की, १८ वर्षे वयाच्या खाली असलेल्या व्यक्तीला लैंगिक सहमती देण्याची क्षमता असणे शक्य नाही. त्याच्या मते, मुलांची मानसिक व शारीरिक अवस्था त्यांना अशा प्रकारच्या निर्णय घेण्यास सक्षम करत नाही. सरकारने हा मुद्दा मांडला की, जर वयोमर्यादा कमी केली गेली, तर यामुळे शोषण करणाऱ्यांना न्याय प्रणालीतील फायद्याचा अवकाश मिळेल, ज्यामुळे त्यांना सहमतीचा बचाव मिळू शकतो. सरकारने खास करून पोक्सो कायदा आणि इतर बाललैंगिक शोषणाविरोधी कायद्यांच्या संदर्भात याची माहिती दिली. सरकारने सांगितले की, या कायद्यांमुळे १८ वर्षांखालील मुलांना लैंगिक शोषणापासून संरक्षण मिळते. केंद्र सरकारने हे देखील स्पष्ट केले की, बहुतांश बाललैंगिक शोषणाचे प्रकरणे कुटुंबीय, शेजारी, शिक्षक किंवा इतर विश्वासू व्यक्तींकडून घडतात. राष्ट्रीय गुन्हेगारी नोंद माहिती केंद्र व इतर सामाजिक संस्थांच्या अहवालानुसार, ५० टक्क्यांपेक्षा जास्त बाललैंगिक शोषणाची प्रकरणे मुलाच्या जवळच्या व्यक्तींनी केलेली असतात. यामुळे, १८ वर्षांखालील (पान २ वर)

### सावरकर प्रकरणात राहुल गांधींना सुप्रीम कोर्टाचा दिलासा

**नवी दिल्ली :** उत्तर प्रदेशात काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्याविरुद्ध दाखल झालेल्या फौजदारी खटल्याच्या सुनावणीवरील स्थगिती सर्वोच्च न्यायालयाने आज वाढवली. २०२२ मध्ये राहुल यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याबाबत केलेल्या टिप्पणीवरून ते अडचणीत आले आहेत. न्यायमूर्ती दीपांकर दत्ता आणि न्यायमूर्ती ऑगस्टीन जॉर्ज मसीह यांच्या खंडपीठाने या प्रकरणातील त्यांची स्थगितीची मागणी मान्य केली आहे आणि सुनावणी चार आठवड्यांसाठी तहकूब केली आहे. उत्तर प्रदेश सरकारच्या वतीने उपस्थित असलेल्या ज्येष्ठ वकील गरिमा प्रसाद यांनी न्यायालयाला सांगितले की, राज्याने राहुल गांधींच्या याचिकेवर उत्तर दाखल केले आहे. उत्तर प्रदेश सरकारने न्यायालयाला सांगितले की, वकील नृपेंद्र पांडे यांनी दाखल केलेली तक्रार योग्य आहे. समाजात द्वेष पसरवण्याच्या उद्देशाने राहुल गांधी यांचे विधान देण्यात आले होते. २५ एप्रिल रोजी या प्रकरणाची सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते की, राहुल गांधी यांचे वक्तव्य बेजबाबदार आहे.




## पान 1 वरून...

### राज्य मंत्रिमंडळात होणार मोठे...

स्थापन झाले. पण हे सरकार स्थापन झाल्यापासून महायुतीचे काही मंत्री आणि आमदार सातत्याने वादग्रस्त वक्तव्य आणि वर्तन करत आहेत. त्यामुळे सरकारची प्रतिमा डागाळली जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलेल्या १०० दिवसांच्या कार्यक्रमातही काही मंत्र्यांची कामगिरी समाधानकारक नसल्याचे दिसून आले आहे. हीच बाब लक्षात घेता, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपूर्वी मंत्रिमंडळात मोठे फ ेरबदल अपेक्षित आहेत. इतर पक्षातील काही दिग्गजांना भाजपमध्ये प्रवेश देऊन त्यांना मंत्रिमंडळात स्थान दिले जाण्याची शक्यताही वर्तवण्यात येत आहे. दरम्यान, गिरीश महाजन यांनाही पक्षाच्या गरजेनुसार मंत्रिमंडळाबाहेर राहण्यास सांगितले जाऊ शकते, अशीही चर्चा आहे. या फेरबदलात विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांची मंत्रिपदावर वर्णी लागण्याची शक्यता आहे. त्यांच्या जागी भाजपमध्ये सध्या नाराज असलेल्या सुधीर मुनगंटीवार यांची विधानसभा अध्यक्षपदी वर्णी लागण्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. मात्र या संभाव्य फेरबदलांमुळे राज्याच्या राजकारणात सध्या मोठ्या घडामोडी घडत असल्याचे पाहायला मिळत आहे. शिंदे गटाच्या तीन ते चार मंत्र्यांना संभाव्य फेरबदलात नारळ दिला जाण्याची शक्यता आहे. यामध्ये वादग्रस्त ठरलेले सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट, मंत्री भरत गोगावले, शिक्षणमंत्री दादा भुसे आणि गृहराज्यमंत्री योगेश कदम यांचा समावेश असल्याचे बोलले जात आहे. तर अजित पवार गटातील सातत्याने वादग्रस्त ठरणा-या माणिकराव कोकाटे यांच्या मंत्रिपदावर टांगती तलवार असल्याची चर्चा आहे. तसेच, नरहरी झिरवळ यांनाही मंत्रिपद गमवावे लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे. भाजपकडून मंत्रिमंडळात स्थान मिळालेल्या मत्स्यविकास मंत्री नितेश राणे आणि ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्याकडून सातत्याने वादग्रस्त वर्तन केले जात आहे. त्यामुळे त्यांचेही मंत्रिपद धोक्यात आले आहे.

### सरकारी शाळेचे छत कोसळून...

मदतीसाठी पुढे सरसावले. सर्वांनी एकत्र येऊन ढिगारा हटवला आणि मुलांना बाहेर काढले. सध्या रेस्क्यू ऑपरेशन पूर्ण झालं असून आता पोलीस या घटनेच्या कारणांचा शोध घेत आहेत. ही इमारत खूप जुनी असल्याचं सांगितलं जात आहे. त्यात पावसाने दिवस, गेल्या काही दिवसांपासून या भागात मुसळधार पाऊस सुरु आहे, त्यामुळे हा अपघात झाला असावा, असं सांगितलं जात आहे. ही दुर्घटना झालावाड जिल्ह्यातील मनोहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ही इमारत १९४७ पासून सुरु आहे. म्हणजेच या शाळेची इमारत तब्बल ७८ वर्ष जुनी आहे. ग्रामस्थांनी सांगितलं की ही इमारत खूप जुनी असून पावसाळ्यात पाणी गळत असल्याच्या तक्रारी करण्यात आल्या होत्या. अनेकदा शाळेच्या दुरूस्तीसाठीही तक्रारी करण्यात आल्या, मात्र कोणीच याची दखल घेतली नाही, असा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. शाळेचे छत बऱ्याच काळापासून जीर्ण झाले होते आणि सततच्या मुसळधार पावसामुळे ते कधीही कोसळण्याची भीती व्यक्त केली जात होती. तरीही याकडे दुर्लक्ष करण्यात आले, ज्याचा परिणाम म्हणून निष्पाप मुलांना आपला जीव गमवावा लागला. गंभीर जखमी झालेल्या मुलांना झालावाड जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. बचाव पथकासोबत गावकरीही ढिगारा हटवण्याच्या कामात पूर्णपणे गुंतले होते. ही शाळा पिपलोद गावात बांधण्यात आली होती. ढिगाऱ्याखाली दबलेली सर्व मुले इयत्ता ७ वीत शिकत असल्याचेही उघड झाले आहे. या दुर्घटनेप्रकरणी मुख्यमंत्री भजनलाल शर्मा, विरोधी पक्षनेते गोविंदसिंह डोटासर, माजी मुख्यमंत्री वसुंधराराजे यांनी दु:ख व्यक्त केले आहे.

### ओबीसीच्या रक्षणात कमी पडलो...

समजल्या असत्या, तर मी तात्काळ जातनिहाय जनगणना करवली असती. ही माझी चूक होती, पण आता मी ती सुधारणार आहे. एका अर्थाने हे चांगलेच झाले, कारण तेव्हा जनगणना झाली असती, तर ती आजच्या इतकी परिणामकारक झाली नसती. त्यांनी देशातील ९०% लोकसंख्या असलेल्या दलित, मागासवर्गीय, आदिवासी आणि अल्पसंख्याकांना त्यांचा हक्क मिळाला पाहिजे, असे ठाम मत व्यक्त केले.

### विरोध डावलून देशभर मतदार...

तपासत आहे. तसेच, त्याच्या नावाखाली, मोठ्या प्रमाणात लोकांकडून मतदानाचा अधिकार हिरावून घेतला जाऊ शकतो. तथापि, निवडणूक आयोगाने आश्वासन दिले आहे की, जर एखादी व्यक्ती मतदार यादीतून बाहेर पडली तर त्याचा अर्थ असा होणार नाही की त्याचे नागरिकत्व संपले आहे. कायदा आणि संविधानानुसार, नागरिकांना 'मतदानाचा अधिकार' मिळावा म्हणून नागरिकत्वाशी संबंधित कागदपत्रे मागण्याचा अधिकार आहे. असा दावा केला जात आहे की सुधारणेत बिहारमध्ये किमान ५६ लाख मतदारांची नावे वगळता येतील. यापैकी २० लाख मतदारांचा मृत्यू झाला आहे. २८ लाख अशा मतदारांची ओळख पटवण्यात आली आहे जे त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यावरून कायमचे स्थलांतरित झाले आहेत.

### सहमतीने लैंगिक संबंधांसाठी...

मुलांचा शोषण करणाऱ्यांना सहमती दाखवण्याची संधी दिल्यास ते अधिक शोषक होऊ शकतात. केंद्र सरकारने सांगितले की, मुलं त्यांच्या जवळच्या कुटुंबातील किंवा विश्वासार्ह व्यक्तींनी लैंगिक शोषण केले तरी त्यांच्या मनामध्ये प्रतिकार करण्याची शक्ती नाही. अशा परिस्थितीत, शोषण करणाऱ्यांना सहमतीचा बचाव देणे त्यांना अधिक शक्ती देण्यासारखे ठरेल. केंद्र सरकारने आपल्या सादरीकरणात भारतीय दंड संहितेतील विविध बदलांचा उल्लेख केला, ज्यामुळे सहमतीच्या वयोमर्यादेतील वाढ दिसून आली. भारतीय दंड संहिता, १८६० मध्ये लैंगिक सहमतीचे वय १० वर्ष होते; नंतर एज ऑफ कन्सेंट ॲक्ट १८९१ नुसार १२ वर्षे करण्यात आले; १९२५ मध्ये भारतीय दंड संहितेत आणि शारदा कायदा (बाल विवाह प्रतिबंधक कायदा) १९२९ मध्ये १४ वर्षे वय केले गेले; १९४० मध्ये भारतीय दंड संहितेतील सुधारणा करून १६ वर्षे वय केले गेले; १९७८ मध्ये बाल विवाह प्रतिबंधक कायदा मध्ये सुधारणा करून १८ वर्षे वय ठरवले गेले, जे आजही लागू आहे. सरकारने हे देखील सांगितले की, १८ वर्षांहून कमी वय असलेल्या व्यक्तीला शारीरिक आणि मानसिक पातळीवर लैंगिक सहमती देणे शक्य नाही.

# अकोला विमानतळ विकासाला गती

## केंद्रीय राज्यमंत्री मोहोळ यांच्या अध्यक्षतेखाली बैठक, ड्रोन ॲकॅडमी व विमानसेवेसंदर्भात सकारात्मक निर्णय



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २५ :** अकोला विमानतळाच्या विकासकामांचा आढावा घेण्यासाठी केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री नामदार मुरलीधर मोहोळ यांच्या दालनामध्ये विशेष बैठक पार पडली. या बैठकीत अकोल्याचे खासदार अनुप धोत्रे यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्याची दखल घेत लवकरच अकोल्यातून लहान विमानसेवा सुरू करण्यासाठी अधिकाऱ्यांनी तत्काळ कार्यवाही करावी, असे निर्देश मोहोळ यांनी दिले.

या बैठकीला विमानतळ प्राधिकरणाचे अधिकारी प्रतिनिधी संजू दास, अंकित कुमार यांच्यासह विविध विभागांचे सचिव व उपसचिव उपस्थित होते. बैठकीदरम्यान अकोला विमानतळावर प्रस्तावित ड्रोन अकॅडमीची स्थापना, तसेच अकोला ते नवी मुंबई, पुणे आणि गोवा दरम्यान थेट विमान सेवा सुरू करण्यासंदर्भात सविस्तर चर्चा झाली.

खासदार अनुप धोत्रे यांनी अकोला विमानतळाच्या धावपट्टीची सीमा वाढवण्याबाबत राज्य सरकारकडून प्रयत्न सुरू असल्याची माहिती दिली. स्वातंत्र्यपूर्व काळातील अकोला विमानतळाची देखभाल केंद्र सरकारच्या अखत्यारीत येते. त्यामुळे या ठिकाणावरून लहान विमानसेवा सुरू करण्याचा प्रस्ताव त्यांनी केंद्र सरकारसमोर मांडला. त्यावर सकारात्मक प्रतिसाद देत केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी संबंधित अधिकाऱ्यांना विविध विमान कंपन्यांशी चर्चा करून तातडीने पुढील पावले उचलण्याचे निर्देश दिले.

अकोला हे विदर्भातील आठ जिल्ह्यांतील विद्यार्थी शिक्षणासाठी येणारे महत्त्वाचे केंद्र आहे. त्यामुळे येथे प्रस्तावित असलेली ड्रोन अकॅडमी ही विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे, असे प्रतिपादन खासदार अनुप धोत्रे यांनी बैठकीत केले.

या बैठकीदरम्यान केंद्रीय मंत्री मोहोळ यांनी अकोल्यातील समस्या, अडचणी समजून घेऊन त्यावर केंद्र सरकारच्या स्तरावर ठोस निर्णय घेण्याचे आश्वासन दिले. तसेच अकोलेकरांना हक्काच्या सुविधा मिळवून देण्यासाठी केंद्र सरकार कटीबद्ध आहे, असे अभिवचनही त्यांनी दिले.खासदार अनुप धोत्रे यांनी अकोल्याच्या दळणवळण व्यवस्था, हवाई सेवा आणि विकासकामांसाठी केंद्रीय मंत्र्यांशी सातत्याने संपर्क साधत काम सुरू ठेवले आहे. या प्रयत्नांची दखल घेऊन अकोला विमानतळाच्या विकासाला गती मिळावी, यासाठी ही महत्त्वपूर्ण बैठक निर्णायक ठरली आहे.

केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी विकासासाठी दिलेल्या सहकार्याबद्दल खासदार अनुप धोत्रे यांनी आभार मानले. अकोलेकरांसाठी लवकरच हवाई सेवा आणि अन्य सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने आपण कटिबद्ध असल्याचे त्यांनी नमूद केले.

## सर्वसामान्य जनतेच्या सर्वांगीण विकासावर भर: माजी सभापती गोपाल कोल्हे



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २५ :** ग्रामीण भागातील जनतेच्या समस्या सोडवून त्यांच्या सामाजीक, शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे माजी सदस्य तथा माजी सभापती गोपाल कोल्हे यांनी केले. तेल्हारा तालुक्यातील धोंडा आखर येथे क्रांतीकारी रेंगा आबा यांच्या जयंतीनिमित्त क्रांतीकारी रेंगा आबा स्मारक लोकार्पण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणुन विचारवंत रामकृष्ण ढिगर, जयस महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष संदीप तोटा, विदर्भ अध्यक्ष ब्रिजेश गवते, माजी उपसभापती किशोर मुंदडा, माजी सभापती हेमराज काळबांडे, माजी सरपंच दिनेश मावशे, उपसरपंच संजय गावंडे, बाबाराव मावस्कर आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते क्रांतीकारी रेंगा आबा यांच्या पुतळ्याचे हारार्पण करण्यात आले. यावेळी गोपाल कोल्हे म्हणाले, गेल्या वीस वर्षांपासून मतदारसंघातील जनतेच्या समस्या सोडवून त्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळेच सर्वसामान्य जनतेचे भक्कम पाठबळ आपल्याला मिळाले आहे. भविष्यातही जनसमस्या सोडवून शेतकरी, मजुर, कामगार, महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्ररमाच्या यशस्वीतेसाठी अनिल मावशे, नंदू दही, अमर मावशे यांच्यासह युवा कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

## टीबीमुक्त भारतासाठी मनपाची तयारी

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २५ :** अकोला महानगरपालिकेच्या वतीने टिबी मुक्त भारत अभियान अंतर्गत शहरातील अति जोखमीच्या भागांमध्ये क्षयरुग्णांचे सर्वेक्षण व उपचारासाठी भव्य मोहिम राबवण्यात येणार आहे. याअंतर्गत १ जुलै ते ३१ डिसेंबर २०२५ दरम्यान आशा व स्वयंसेवकांच्या माध्यमातून विशेष सर्वेक्षण व तपासण्या होतील. नालासोपारा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात दोन दिवसीय प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले. यात प्रमुख प्रशिक्षक म्हणून जागतिक आरोग्य सल्लागार डॉ. सम्यक खरे यांनी मार्गदर्शन केले. वैद्यकीय अधिकारी, आशा, जीएनएम, एमपीडब्ल्यू आदींनी सहभाग घेतला. वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. आशिष गि-हे आणि शहर क्षयरोग अधिकारी डॉ. निखिल लहाने यांनी क्षयरुग्णांना उपलब्ध असलेल्या शासकीय सुविधांची माहिती दिली.

सदर अभियानात दोन आठवड्यांपेक्षा जास्त काळ खोकला, ताप, वजन घट, थुंकीत रक्त, मानेवर गाठी यांसारखी लक्षणे असलेल्या व्यक्तींची तपासणी करण्यात येणार आहे. यासाठी आणि तंत्राचा वापर केला जाणार आहे. तपासणीनंतर टिबी निदान झाल्यास रुग्णांना मोफत उपचार, तपासण्या आणि 'निक्षय पोषण योजने' अंतर्गत प्रतिमाह रु. १००० आर्थिक मदत मिळणार आहे.

## स्काऊटर-गाईडर उजळणी वर्ग व बिगिनर्स कोर्स संपन्न

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि. २५ :** शहरातील स्काऊट-गाईड उजळणी वर्ग व बिगिनर्स कोर्स नुकतेच संपन्न झाले. हा उपक्रम २१ जुलै २०२५ रोजी जिल्हा परिषद शिक्षण विभाग (प्राथमिक व माध्यमिक) व अकोला भारत स्काऊट-गाईड जिल्हा कार्यालयाच्या विद्यमाने राबविण्यात आला. जिल्हा मुख्य आयुक्त रतनसिंग पवार, जिल्हा आयुक्त डॉ. अरविंद मोहरे व जिल्हा चिटणीस विनोद मानकर यांच्या मार्गदर्शनाखाली अकोला शहरात या उपक्रमाची सुरुवात झाली.

कार्यक्रमाची सुरुवात ध्वजारोहण व लॉर्ड बेडन पावेल यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य रत्नमाला खडके व इतकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आयुक्त किरण लहाने यांनी केले, तर प्रास्ताविक श्रीकृष्ण डांबलकर यांनी केले.

प्रशिक्षणात डांबलकर यांनी युनिट लीडर प्रशिक्षणाचे टप्पे, स्मार्टनेस व गुड ऑर्डर याबाबत मार्गदर्शन केले. शालिनी तायडे यांनी स्काऊट-गाईड चळवळीचा इतिहास मांडला, तर सुषमा देशमुख, अशोक राठोड, बुंदेले, विद्या सिरसाठ, कोकाटे, सोनाली वयदु, मेघा घोंगडे, रजनी अरबाळ, जयमाला जाधव व संतोष गायगोये यांनी विविध विषयांवर सविस्तर माहिती दिली. अकोला शहरातील १०० पेक्षा अधिक शिक्षकांनी या प्रशिक्षणात सहभाग घेतला. कार्यक्रमाची सांगता ध्वजावतरण व राष्ट्रगीताने करण्यात आली. आयोजन यशस्वी होण्यासाठी संतोष भेंडेकर, ज्योती इंगळे, सुबोध शेगावकर व नरेंद्र आठवले यांनी महत्त्वाचे योगदान दिले.

## हुमणी अळीमुळे सोयाबीन, तूर, कपाशी पिकांचे नुकसान

### अकोला पूर्व मतदार संघातील शेतकऱ्यांची आ.सावरकरांकडे मदतीची मागणी

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि. २५ :** अकोला महसूल मंडळातील चांदुर, बाभूळगाव जहाँगीर, शिवणी अंतर्गत येणाऱ्या डोंगरगाव, मासा, सिसा उदेगाव, बाभूळगाव, सिसा, बोदरखेड, कुंभारी, येवता, हिंगणा, आणि वाशिंबा येथील शेतकरी हुमणी अळीच्या प्रादुर्भावामुळे मोठ्या संकटात सापडले आहेत. या अळीने सोयाबीन, तूर आणि कपाशी या प्रमुख पिकांचे सुमारे २०० एकरांहून अधिक क्षेत्रावर मोठे नुकसान केले आहे, ज्यामुळे शेतकऱ्यांचे हातातोंडाशी आलेले पीक पूर्णतः उद्ध्वस्त झाले आहे. या गंभीर परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी, २३ जुलै २०२५ रोजी डोंगरगावचे उपसरपंच किशोर काकडे यांच्या नेतृत्वाखाली या भागातील शेतकऱ्यांनी अकोला पूर्व विधानसभा मतदारसंघाचे आमदार रणधीरभाऊ सावरकर यांना निवेदन सादर करून तातडीच्या मदतीची मागणी केली.

निवेदनात ग्राम पंचायतचे शासकीय मदत त्वरित मिळण्याबाबतचे ठराव जोडलेले आहेत. शेतकऱ्यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर, आमदार रणधीर सावरकर यांनी तातडीने उपविभागीय अधिकारी डॉ. शरद जावळे यांना महसूल विभागामार्फत बाधित क्षेत्राचा त्वरित शासकीय सर्वे करण्याच्या सूचना दिल्या आहेत. यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे. शेतकऱ्यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे की, यंदा पिकांची वाढ चांगली झाली होती आणि त्यासाठी त्यांनी मोठा आर्थिक खर्च केला होता. मात्र, आता हुमणी अळीमुळे सर्व पिके पूर्णपणे उद्ध्वस्त झाली आहेत. दुबार पेरणीची वेळ निघून गेल्याने शेतकरी हतबल झाले असून, त्यांच्यावर मोठे आर्थिक संकट ओढवले आहे. या पार्श्वभूमीवर, आमदार सावरकर यांनी कृषी विभागाला या बाधित गावांमध्ये तात्काळ पाहणी करून सोयाबीन, तूर आणि कपाशी या सर्व पिकांचे पंचनामे तयार करण्याचे निर्देश द्यावेत, अशी विनंती शेतकऱ्यांनी केली आहे. तसेच, शासन स्तरावरून तातडीने आर्थिक मदत मिळावी यासाठी पाठपुरावा करण्याची मागणीही शेतकऱ्यांनी केली आहे. यापूर्वी ग्रामपंचायतीचा ठराव आणि निवेदनही देण्यात आले असल्याचे शेतकऱ्यांनी नमूद केले आहे. आमदार रणधीरभाऊ सावरकर यांनी या निवेदनाचा सहानुभूतीपूर्वक विचार करून शेतकऱ्यांना मदत मिळवून द्यावी, अशी आर्त विनवणी डोंगरगाव आणि परिसरातील समस्त शेतकऱ्यांनी केली आहे.

या निवेदनावेळी विजयसिंह देशमुख, चंद्रभागा वनारे, किशोर काकडे, अंतकलाबाई खरोडकार, विलास बंड, वंदना देशमुख, मनोहर काकडे, राहुल काकडे, उपराई पचारे, योगेश नागापुरे, जगदेव वानरे, गौरव बंड, दिलीप खरोडकार, शंकर देशमुख, रमेश वानरे, प्रफुल वाघाडे, अमोल काकडे, योगेश ज्ञानदेवराव नागापुरे आदींसह अनेक शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. या गंभीर संकटामुळे शेतकरी मोठ्या आर्थिक अडचणीत सापडले असून, त्यांना शासनाकडून त्वरित मदतीची अपेक्षा आहे.

## अकोला-शेगाव पायदळ वारीचे रौप्य महोत्सवी वर्ष

### दि अकोला अर्बन बँक कर्मचाऱ्यांचे आयोजन

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २५ :** अकोल्यातील अग्रगण्य सहकारी संस्था असलेल्या दि अकोला अर्बन को-ऑप. बँकेच्या कर्मचाऱ्यांनी सुरू केलेल्या अकोला ते शेगाव पायदळ वारीला यंदा २५ वर्षे पूर्ण होत आहेत. ही वारी म्हणजे केवळ एक धार्मिक परंपरा नाही, तर श्रद्धा, निष्ठा आणि एकात्मतेचं जिवंत प्रतीक बनली आहे. शनिवार (ता.२६) रोजी सकाळी ७ वाजता ही पायदळ वारी अनोखा मंदिर डाबकी रोड येथून निघणार आहे.

२००१ साली गजानन रेलकर यांनी ही मूळ संकल्पना मांडली. त्यानंतर स्व. ए. बी. देशपांडे, राम पत्की, हेमंत थोरात, नागोराव माहोरे, विनोद अग्रवाल, यांनी स्वतःच्या मनातून आणि श्रद्धेतून या वारीचा प्रारंभ केला. त्यावेळी कोणतीही घोषणा, प्रसिद्धी किंवा मोठं नियोजन नव्हतं. होता तो फक्त श्री गजानन महाराजांवरील निस्सीम भक्तिभाव आणि चालत जाण्याचा निर्धार. या छोट्याशा उपक्रमाला आज २५ वर्षांचा प्रदीर्घ आणि यशस्वी प्रवास लाभला आहे. आज ही वारी बँकेच्या सर्व कर्मचाऱ्यांची, त्यांच्या कुटुंबियांची, आणि अकोलातील असंख्य वारकऱ्यांची सामूहिक वारी झाली आहे. या वारीमुळे बँकेच्या सेवकांमध्ये केवळ आध्यात्मिक ऊर्जा वाढलेली नाही, तर परस्पर संबंधही अधिक घट्ट झाले आहेत. या उपक्रमात बँकेचे सर्व स्तरांतील कर्मचारी आणि त्यांचे परिवार सहभागी होणार असून, या यात्रेद्वारे सामाजिक बांधिलकी ही जोपासली जाणार आहे. श्री गजानन महाराजांच्या पावन भूमीकडे नेणारी ही वारी केवळ



पायांनी चालत जाण्याची यात्रा नाही, ती अंतःकरणातील विश्वासाची, भक्तीची आणि सेवाभावाची चाल आहे. २५ वर्षांचा हा प्रवास म्हणजे श्रद्धेने सुरु झालेल्या संकल्पाची यशोगाथा आहे. या वारीने दि अकोला अर्बन बँकेच्या कार्यसंस्कृतीत एक वेगळीच उर्जा निर्माण केली आहे.



### जाहीर नोटीस

आमचे पक्षकार नामे भागवतराव सोनाजी तिडके, रा. अकोला, ता. जि. अकोला यांनी दिलेल्या माहिती, अधिकारान्वये सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, आमचे पक्षकार हे वरील नमूद ठिकाणी राहत असून, त्यांचे नावे असलेली मौजे डाबकी रोड जुने शहर, अकोला येथील नोंदणीकृत दस्त क. १९२/१९९४, दि.२१/०१/१९९४ या दस्तान्वये असलेली मालमत्ता असून, सदर मालमत्तेचे मूळ दस्त खरेदीखत व इतरही दस्त दि. २४/०७/२०२५ रोजी सकाळी ११.३० ते १२.०० वा. च्या दरम्यान आमचे पक्षकार डाबकी रोडवरून दुचाकी वाहनाने जात असताना त्यांचेकडून अनावधानाने कागदपत्रांची फाईल असलेली पिशवी हरविल्या गेली आहे. सदर मूळ दस्त अत्यंत महत्वाचे असून, सदर दस्त कुणाला आढळून आल्यास, मिळाल्यास आमचे पक्षकार किंवा त्यांचे अधिवक्ता यांचेसोबत संपर्क करून त्यांना आणून दयावेत. त्याकरिता योग्य ते बक्षीस दिल्या जाईल. तसेच सदरहु दस्तांचा कुणीही गैरउपयोग करू नये.

पक्षकाराचे नाव : भागवतराव सोनाजी तिडके मो.क्र. ९७६७२३०२७९
पक्षकाराचे वकील : ॲड. संतोष एस. पाटकर मो. क्र. ८२०८६५१०८१
ठिकाण : अकोला
दिनांक : २४/०७/२०२५

**ॲड. एस. एस. पाटकर**
कोठारी वाटिका, मलकापूर
अकोला, ता. जि. अकोला.


# कावड यात्रेनिमित्त शहर व जिल्ह्यातील वाहतुकीत बदल

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि. २५ : श्रावणातील कावड यात्रेनिमित्त सुरळीत वाहतुकीच्या दृष्टिकोनातून अकोला- अकोट, अकोला- दर्यापूर राज्य महामार्गावरील, तसेच अकोला शहरातील वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात येणार आहे. त्याबाबतचा आदेश जिल्हा दंडाधिकारी अजित कुंभार यांनी निर्गमित केला.**

आदेशानुसार, हा बदल पहिला सोमवार (२८ जुलै), दुसरा सोमवार (४ ऑगस्ट), तिसरा सोमवार (११ ऑगस्ट) या तीन सोमवारी अकोला शहरात प्रत्येक रविवारच्या (२७ जुलै, ३ ऑगस्ट व १० ऑगस्ट) रात्री ८ वा. पासून तिन्ही श्रावण सोमवारी रा. १२ पर्यंत लागू राहील व राज्य मार्गावर आदला दिवस- प्रत्येक रविवारच्या (२७ जुलै, ३ ऑगस्ट व १० ऑगस्ट) दु. २ वा. पासून ते श्रावण सोमवारी सायं. ७ वा. पर्यंत लागू राहील.

चौथ्या सोमवारनिमित्त अकोला शहरातील कावड मार्गावरील वाहतूक दि. १७ ऑगस्ट रोजी रा. ८ पासून दि. १८ ऑगस्ट रोजी रा. १२ पर्यंत, तसेच राज्य मार्गावरील वाहतूक दि. १७ ऑगस्ट रोजी दु. १२ पासून दि. १८ ऑगस्ट रोजी रा. ८ वा. पर्यंत वळविण्यात येणार आहे.

**अकोला- अकोट, अकोला- दर्यापूर राज्य महामार्गावरील वाहतूक**

अकोला बसस्थानकाकडून रेल्वेस्थानक, आपातापा चौक, गांधीग्राम मार्गे अकोटकडे जाणारी व येणारी सर्व वाहतूक अकोला बसस्थानक, अशोक वाटिका, वाशिम बायपास, शेगाव टी पॉईंट, गायगाव- निंबा फाटा, देवरी- अकोट अशी वळविण्यात येणार आहे.

अकोला बसस्थानकापासून म्हैसांग मार्गे दर्यापूरकडे जाणारी व येणारी वाहतूक अकोला बसस्थानक, अग्रसेन चौक, दुर्गा चौक, जठारपेठेकडून मोठी उमरी, गुडधी- रेल्वे फाटक, आदिलाबाद मार्गे म्हैसांग मार्गे दर्यापूर अशी वळविण्यात येणार आहे.

**अकोला शहरातील मिरवणूक मार्गावरील वाहतूक**

रेल्वे स्थानक चौकाकडून पुलावरून अकोट स्टँड ते कोतवाली चौक- लक्झरी बसस्थानक- वाशिम बायपासकडे जाणारी वाहतूक रेल्वेस्थानक चौकापासून अग्रसेन चौक, उड्डाण पुलावरून जेल चौक ते वाशिम बायपासकडे वळविण्यात येणार आहे.

अकोला नविन बसस्थानकाकडून गांधी चौक- कोतवाली चौक- जयहिंद चौकाकडून डाबकी रस्त्याकडे, तसेच पोळा चौक, हरिहरपेठेकडे जाणारी वाहतूक अशोक वाटिका चौक, जेल चौक, लक्झरी बसस्थानक, वाशिम बायपास, हरिहरपेठ, किल्ला चौक, भांडपुरा चौकातून डाबकी रस्त्याकडे वळविण्यात येणार आहे. डाबकी रस्त्याकडून विठ्ठल मंदिर, जयहिंद चौक, कोतवाली चौकाकडून गांधी रस्ता मार्गे बसस्थानकाकडे जाणारी वाहतूक, तसेच डाबकी रस्त्याकडून भीमनगर चौक, दगडी पूल, मामा बेकरीकडे जाणारी वाहतूक पोळा चौक, हरिहरपेठ, वाशिम बायपास, लक्झरी बसस्थानक, शासकीय उद्यान, अशोक वाटिका मार्गे बसस्थानकाकडे वळविण्यात येणार आहे. लक्झरी बसस्थानकाकडून कोतवाली चौकातून टिळक रस्त्याने रेल्वे स्थानकाकडे जाणारी वाहतूक जेल चौक, नव्या उड्डाण पुलावरून अग्रसेन चौक मार्गे वळविण्यात येणार आहे.

**मूर्तिजापूर- दर्यापूर मार्गावरील वाहतूक**

मूर्तिजापूर ते दर्यापूर रस्त्यावरील टोल नाका, तसेच दर्यापूर ते मूर्तिजापूर टोल नाक्याकडे येणारी वाहतूक दर्यापूर रस्त्यावरील टोल नाका, मूर्तिजापूर, हिरपूर, बोरटा, आसरा फाटा, अमरावती रस्त्याने दर्यापूर अशी वळविण्यात येणार आहे.

## थोडक्यात

### श्रावणात चिकन डिलीव्हरीवरून ब्लिंकिट कर्मचाऱ्यांना शिवीगाळ; बजरंग दलाच्या कार्यकर्त्याला अटक

**नवी दिल्ली :** श्रावण महिना सुरू झाला असून या महिन्यात बरेच जण नॉनव्हेज खाणे टाळतात. यादरम्यान उत्तर प्रदेशात एक गंभीर प्रकार समोर आला आहे. श्रावण महिन्यात चिकन डिलिव्हरी केल्याबद्दल ब्लिंकिटच्या सहाय्यक व्यवस्थापकाला अपमान करत त्याला धमकावल्याप्रकरणी बजरंग दलाच्या एका सदस्याला अटक करण्यात आली आहे. उत्तर प्रदेशच्या गाझियाबाद येथे गुरूवारी ही घटना घडली असे पोलिसांनी सांगितले.

गाझियाबाद (शहर) पोलीस उपायुक्त धावल जैस्वास यांनी आरोपीचे नाव मनोज वर्मा असे असल्याची माहिती दिली आहे. ''आम्ही या घटनेचा तपास सुरू केला आहे,'' असेही त्यांनी सांगितले, तसेच न्यायालयाने आरोपीला न्यायालयीन कोठडी सुनावली असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.विजय नगरचे सहाय्यक पोलिस आयुक्त रितेश त्रिपाठी म्हणाले की, ब्लिंकिटचे सहाय्यक व्यवस्थापक मोनिश यांनी बुधवारी पोलिसांकडे तक्रार दाखल केल्यानंतर वर्मा यांना अटक करण्यात आली.वर्मा त्याच्या काही साथिदारांसह १५ जुलै रोजी विजय नगरमधील सिद्धार्थ विहार येथील ब्लिंकिट स्टोअरमध्ये आला होता, असे मोनिश यांनी आपल्या तक्रारीत म्हटले आहे. ''तो दुपारी ४ ते ५ च्या दरम्यान आला आणि श्रावण महिन्यात चिकनची डिलीव्हरी करत असल्याचे सांगून त्याने फ्लीट मॅनेजर अभयला शिवीगाळ सुरू केली,'' असे मोनिश यांनी त्यांच्या तक्रारीत म्हटले आहे. तसेच अभयने हे थांबवले नाही तर वर्मा त्याचा जीव घेईल आणि स्टोअर बंद पाडेल अशी धमकी दिल्याचेही त्यांनी तक्रारीत म्हटले आहे.

### दोन भावांचा अल्पवयीन मुलीवर बलात्कार



**जगतसिंगपूर :** दोन भावांनी एका १५ वर्षीय मुलीवर सामूहिक बलात्कार केल्याची घटना समोर आली आहे. इतकेच नाही तर आरोपींनी पीडिता ५ महिन्यांची गर्भवती राहिल्यानंतर तीला जिवंत पुरण्याचा प्रयत्न केल्याचा प्रकार देखील ओडिशाच्या जगतसिंगपूर जिल्ह्यात घडला आहे.

पोलिसांनी बनशबारा गावातील भाग्यधर दास आणि पंचानन दास या दोन भावांना अटक केली आहे, तर तिसरा संशयित, टुलू अद्याप फरार आहे. त्याला पकडण्यासाठी पोलीस अधिकाऱ्यांकडून प्रयत्न केले जात आहेत.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी अल्पवयीन पीडितेवर अनेक वेळा अत्याचार केला. जेव्हा ती गर्भवती असल्याबद्दल माहिती मिळाली तेव्हा त्यांनी गुन्हा लपवण्यासाठी चक्क तिला जिवंत गाडण्याचा प्रयत्न केला. त्यांनी पीडितेला घटनास्थळी बोलवले आणि ती आली देखील. तिथे पोहचल्यावर तिला जमिनीत मोठा खड्डा खणलेला आढळून आला. त्यानंतर ते दोघे तिला धमकावू लागले, की जर तिने गर्भपात करून घेतला नाहीत तर ते तिला खड्ड्यात जिवंत गाडतील. दरम्यान, पीडित मुलगी आरोपींपासून पळून जाण्यात यशस्वी झाली आणि तिने तिच्या वडिलांना घडलेला प्रसंग सांगितला.

### पंतप्रधान नरेंद्र मोदींची इंग्लंडच्या पंतप्रधानांशी 'चाय पे चर्चा'

**लंडन :** भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सध्या विदेश दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यावेळी पंतप्रधान मोदी आणि ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांच्यात २४ जुलै द्विपक्षीय चर्चा झाली. यावेळी भारत आणि ब्रिटनमध्ये ऐतिहासिक मुक्त व्यापार करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या आहेत. या करारामुळे जवळपास ३४ अब्ज डॉलर्सने व्यापार वाढण्याची अपेक्षा आहे. या दौऱ्यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांच्याबरोबर'चाय पे चर्चा' केली आहे. पंतप्रधान मोदी आणि पंतप्रधान कीर स्टार्मर यांचा 'चाय पे चर्चा' करतानाचा एक व्हिडीओ समोर आला आहे. त्यामुळे या माध्यमातून भारत आणि इंग्लंडमधील संबंध अधिक मजबूत असल्याचा संदेश देण्यात आला आहे.दरम्यान, पंतप्रधान कीर स्टार्मर यांच्याबरोबरचा 'चाय पे चर्चा' करतानाचे काही फोटो पंतप्रधान मोदींनी एक्सवर (ट्विटर) शेअर केले आहेत. तसेच पंतप्रधान मोदींनी म्हटलं की, ''पंतप्रधान कीर स्टार्मर यांच्या बरोबर 'चाय पे चर्चा.' ही चाय पे चर्चा भारत आणि इंग्लंडमधील संबंध अधिक मजबूत करत आहे.'''चाय पे चर्चा'च्या व्हिडीओमध्ये एक व्यक्ती 'मसाला चहा' असं लिहिलेल्या कागदाच्या कपमध्ये किटलीतून चहा ओतताना दिसत आहे. तसेच यावेळी त्या व्यक्तीने पंतप्रधान कीर स्टार्मर आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी संवाद साधताना सामचा चहा आणि केरळचा मसाला असं म्हणताना दिसत आहे.

मोदींचं उत्तर ऐकून ब्रिटनचे पंतप्रधानही आश्चर्यचकित पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ब्रिटनच्या दौऱ्यादरम्यान झालेल्या एका पत्रकार परिषदेतील एका हलक्याफ ुलक्या क्षणाची चांगलीच चर्चा रंगली आहे.

# अन्य भाषा न स्वीकारण्याइतका मराठी माणूस संकुचित नाही

## दिल्लीतील दोन अध्यासन केंद्रांचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

नवी दिल्ली दि.२५ वृत्तसंस्था

मराठी की हिंदी असा वाद होऊच शकत नाही. मराठी असेलच, मराठीला अन्य भाषा पर्याय नाहीत. पण, मराठीबरोबरच इतर भाषाही आल्या पाहिजेत, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी केले. भाषा हे संवादाचे माध्यम आहे, वादाचे नाही, असे सांगत त्यांनी त्रिभाषा सूत्राच्या विरोधकांना चिमटेही काढले.

दिल्लीतील जवाहरलाल नेहरू विद्यापीठात 'छत्रपती शिवाजी महाराज सामरिक अध्यासन केंद्र' व 'कुसुमाग्रज मराठी भाषा अध्यासन केंद्र' यांचे उद्घाटन गुरुवारी फडणवीस यांच्या उपस्थित झाले. तमीळ समृद्ध प्राचीन भाषा आहे. तिथल्या चोला साम्राज्याने १ हजार वर्षे तमीळ संस्कृती जपली आणि विकसित केली. मग, तामीळ भाषेचा आपल्याला अभिमान का असू नये, असा सवाल फडणवीस यांनी केला. पानिपतची लढाई मराठ्यांनी स्वतःसाठी नव्हे तर, देशाला वाचवण्यासाठी लढली. छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठी माणसाला संकुचित विचार करायला शिकवलेले नाही. ज्ञानेश्वरांनी पसायदान मागितले ते विश्वासाठी. देशासाठी लढणारा मराठी माणूस संकुचित असू शकत नाही. ज्या राजधानीला वाचवण्यासाठी मराठ्यांनी बलिदान दिले, त्या दिल्लीमध्ये कुसुमाग्रज मराठी भाषा अध्यासन केंद्र सुरू झाले ही आनंदाची बाब आहे, असे फडणवीस म्हणाले. मराठी भाषेने देशाला समृद्ध केले आहे. मराठीमध्ये साहित्य, नाटक अशा विविध कला सर्वोत्तम आहेत. देशात थिएटर कुठे टिकले तर मराठीमध्ये या भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे. त्यामुळे मराठी भाषेवर देशातील सर्व विद्यापाठांमध्ये संशोधन झाले पाहिजे, अशी सूचना फडणवीस यांनी केली.

'पण, बोलणार नाही'

दोन्ही अध्यासनाच्या उद्घाटनाचा कार्यक्रम सुरू असताना कन्व्हेन्शन हॉलच्या बाहेर जेएनयूतील विद्यार्थ्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याविरोधात निदर्शने केली. राज्यात नुकत्याच लागू झालेल्या जनसुरक्षा कायदा, भाषिकवाद, प्रादेशिक सत्तावाद आदींविरोधात त्यांनी आंदोलन केले. या आंदोलनावर 'जेएनयू'च्या कुलगुरू शांतिश्री पंडित यांनी, कुसुमाग्रजांच्याच शब्दांत 'काही बोलायचे आहे पण, बोलणार नाही', अशी मार्मिक टिप्पणी केली.



मातृभाषा म्हणून मराठीचा रास्त अभिमान असलाच पाहिजे. मराठीचा आग्रह धरणेही गैर नाही पण, इतर भाषांबद्दल तिरस्कार करायचा आणि इंग्रजीसाठी पायघड्या घालायच्या, हे पाहून मला दुःख होते.

**देवेंद्र फडणवीस**, मुख्यमंत्री

### कुसुमाग्रज अध्यासनासाठी तीन कोटी!

जेएनयूमध्ये तब्बल १७ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर कुसुमाग्रज अध्यासन केंद्र सुरू होत आहे. २००८मध्ये या अध्यासनासाठी राज्य सरकारने जेएनयूला दीड कोटी दिले होते, त्याचे आता २ कोटी २६ लाख रुपये झाले आहेत. याव्यतिरिक्त राज्य सरकार या अध्यासनासाठी आणखी ३ कोटी रुपये देणार आहे. हा निधी तातडीने विद्यापीठाला दिला जाईल, अशी माहिती मराठी भाषामंत्री उदय सामंत यांनी 'लोकसत्ता'ला दिली. यंदापासून कुसुमाग्रज अध्यासनामध्ये संशोधनाचे काम सुरू केले जाईल, असे आश्वासन कुलगुरू पंडित यांनी दिले. या समारंभामध्ये तंजावरच्या राजघराण्याचे वंशज बाबाजीराजे भोसले उपस्थित होते.

### मराठी प्राध्यापकांना डावलले?

अध्यासन केंद्रांच्या उद्घाटन कार्यक्रमासाठी 'जेएनयू'ने १० प्राध्यापकांची आयोजन समिती नियुक्त केली होती. मात्र, प्रा. अरविंद येलरी यांचा अपवाद वगळता समितीमध्ये एकाही मराठी प्राध्यापकाचा समावेश करण्यात आला नव्हता. या आयोजन समितीमध्ये 'जेएनयू'मधील मराठी प्राध्यापकांना डावलल्याबद्दल नाराजी व्यक्त होत आहे.

### विद्यापीठात शिवरायांचा अश्वारूढ पुतळा

'जेएनयू' परिसरात शिवरायांचा अश्वारूढ पुतळा उभा केला जाणार असून त्यासाठी जागा देण्याची विनंती राज्य सरकारच्या वतीने विद्यापीठाला करण्यात आली आहे. पुतळा उभारण्यासाठी आवश्यक निधी राज्य सरकारकडून दिला जाईल, असे सामंत यांनी सांगितले. हा पुतळा तरुणांना देशासाठी बलिदान देण्याची स्फूर्ती देईल, असे फडणवीस म्हणाले.

## जगात दरवर्षी वीज पडून ३२० दशलक्ष झाडांचा बळी

नवी दिल्ली दि.२५ वृत्तसंस्था



जगातील वनस्पती बायोमासच्या नुकसानीच्या सुमारे दोन ते तीन टक्के आहे, असे 'ग्लोबल चेंज बायोलॉजी' या नियतकालिकात नुकत्याच प्रकाशित झालेल्या अभ्यासातून उघड झाले. जर्मनीतील 'म्युझिक टेक्निकल युनिव्हर्सिटी'च्या संशोधकांनी हा अभ्यास केला आहे.

अहवालानुसार जंगलातील आगींत वनस्पती जळल्यामुळे दरवर्षी १.२६ अब्ज टन कार्बन डायऑक्साईड वातावरणात सोडला जातो. पावसाळ्यात वीज पडणे ही सामान्य घटना आहे, पण त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. सध्या उष्णकटिबंधीय प्रदेशात वीज पडून नष्ट होणाऱ्या झाडांचे प्रमाण सर्वाधिक आहे. वीज पडणे हे अनेक जंगलांमध्ये झाडे नष्ट होण्याचे एक महत्त्वाचे कारण आहे. आधी दरवर्षी वीज पडून नष्ट होणाऱ्या झाडांची संख्या स्पष्ट होत नव्हती. या संशोधनामुळे मात्र त्यांचा अंदाज घेता आला.

संशोधनाने अंदाज व्यक्त करण्यास मदत करणारी पहिली पद्धत विकसित केली. आता दरवर्षी वीज पडून किती झाडे नष्ट झाली याबरोबरच विजेमुळे सर्वाधिक प्रभावित झालेले प्रदेशदेखील ओळखता येतील. या अभ्यासातून वीज पडण्यामुळे जागतिक स्तरावर होणाऱ्या झाडांच्या नष्ट होण्याचा आणि संबंधित कार्बन प्रभावांचा पहिला अंदाज देण्यात आला आहे. यापुढे वेगवेगळ्या जंगलांमध्ये विजेचे पर्यावरणीय परिणाम अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्याची गरज आहे, असेही मत अभ्यासकांनी नोंदवले आहे.

## शहरांमध्ये सहकारातून टॅक्सी सेवेला गती

नवी दिल्ली दि.२५ वृत्तसंस्था



नव्या राष्ट्रीय सहकार धोरणाच्या माध्यमातून शहरांमध्ये डिसेंबरपर्यंत सहकारी संस्थाच्या माध्यमातून शहरांमध्ये टॅक्सी सेवा सुरू केली जाईल. तसेच देशातील प्रत्येक जिल्ह्यात एक' सहकार गाव' विकसित करणार आहे. येत्या दहा वर्षांत सकल राष्ट्रीय उत्पन्नातील सहकार क्षेत्राचा वाटा तिपटीने वाढविणार असल्याचे केंद्रीय सहकारमंत्री अमित शहा यांनी गुरुवारी येथे जाहीर केले.

शहरातील टॅक्सी चालकांच्या सहकारी संस्था स्थापन करून त्यांच्या माध्यमातून ही सेवा डिसेंबरपूर्वी सुरु केली जाईल. यातून मिळणारा सर्व लाभ संबंधित टॅक्सीचालकांना मिळेल. या संस्थांना सरकार मदत करणार आहे. यामध्ये वाहन घेण्यासाठी मदतीचा समावेश असेल. सध्या ॲप आधारीत टॅक्सीसेवेवरून प्रवासी तसेच टॅक्सीचालकांची होणारी पिळवणूक लक्षात घेता या नव्या उपक्रमाला प्रतिसाद मिळेल अशी अपेक्षा आहे.

सहकार मंत्रालय स्थापन झाल्यानंतरचे पहिलेच राष्ट्रीय सहकार धोरण दिल्ली येथील ऊर्जा भवनात शहा यांच्या हस्ते जाहीर करण्यात आले. यावेळी केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, धोरणाच्या मसुदा समितीचे अध्यक्ष व माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू, सहकार सचिव आशीष भुतांनी उपस्थित होते. राष्ट्रीय सहकार धोरणानुसार प्रत्येक राज्यांनीही सहकार धोरण जाहीर करण्याची सूचनाही शहा यांनी केली. सहकारी बँका, साखर कारखाने यांनाही भरीव मदत करण्यात येणार असून ज्या राज्यांत सहकार कमकुवत आहे येथे अधिक मदत करून सहकाराचा समांतर विकास करणार आणि या क्षेत्राला अन्य क्षेत्रांप्रमाणेच साह्य करण्याचा सरकारचा मनोदय असल्याचेही शहा सांगितले.

नव्या धोरणाच्या माध्यमातून येत्या १० वर्षांत देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नातील सहकार क्षेत्राचा वाटा तिपटीने वाढविण्यात येणार आहे.

या धोरणाच्या माध्यमातून पुढील २५ वर्षांतील सहकार क्षेत्राचा वाटचालीचा कृती आराखडा तयार करण्यात आला असून देशातील प्रत्येक गावात सहकारी संस्थांचे जाळे उभारले जाणार आहे. नव्या धोरणात महिला, तरुण यांना केंद्रबिंदू मानून त्यांना सक्षम आणि व्यावसायिक तयार करण्यावर भर देण्यात आला आहे. तसेच नवीन क्षेत्रात सहकार रुजवणार असल्याचे अमित शहा यांनी सांगितले.

## कायमच्या स्थलांतरितांना मतदार यादीत स्थान नाही: मुख्य निवडणूक आयुक्त कुमार यांचे स्पष्टीकरण

नवी दिल्ली दि.२५ वृत्तसंस्था



निवडणूक आयोग प्रभावाखाली येऊन मृतांना, कायमचे स्थलांतरित झालेल्यांना किंवा अनेक ठिकाणी मतदार म्हणून नोंदणी केलेल्यांना मतदार यादीत स्थान देणार नाही, असे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी गुरुवारी सांगितले. बिहारमध्ये मतदार यादीच्या विशेष सखोल तपासणीवरून (एसआयआर) निवडणूक अधिकाऱ्यांवर विरोधी पक्षांच्या वाढत्या टीकेवर आयुक्त कुमार यांनी स्पष्टीकरण दिले. बिहारमध्ये अनेक मतदारांना मतदानाच्या हक्कापासून वंचित ठेवण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप विरोधी पक्षांनी केला आहे. त्यावर आयुक्त कुमार म्हणाले की, अपात्र व्यक्तींना प्रथम बिहारमध्ये आणि नंतर पूर्ण देशात मतदान करण्याची परवानगी देणे हे संविधानाच्या विरोधात आहे. या प्रश्नावर आपण सर्वांनी राजकारणापलीकडे जाऊन खोलवर विचार करणे आवश्यक आहे. बिहारमध्ये मतदार यादीच्या सध्या सुरू असलेल्या विशेष सखोल तपासणीअंतर्गत घरोघरी भेटी दिल्या जात आहेत. यामध्ये ५२ लाखांहून अधिक मतदार त्यांच्या पत्त्यावर उपस्थित नव्हते, तसेच १८ लाख मतदारांचा मृत्यू झाल्याचे आढळले, असे आयुक्तांनी सांगितले.

**फसवणुकीचे १०० टक्के पुरावे : राहुल गांधी**

कर्नाटकातील एका मतदारसंघा त निवडणूक आयोगाने फसवणूक करण्यास परवानगी दिल्याचे १०० टक्के ठोस पुरावे आहेत. निवडणूक निरीक्षकांना असे वाटत असेल की ते यातून सुटतील, परंतु आम्ही तसे होऊ देणार नाही, असा इशारा लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी गुरुवारी दिला. निवडणूक आयोग भारताच्या निवडणूक आयोगाप्रमाणे काम करीत नाही, असा आरोपही त्यांनी केला. विधानसभा निवडणुकीपूर्वी बिहारमधील लाखो मतदारांना मतदानाच्या अधिकारापासून वंचित ठेवण्याचा डाव असल्याचा आरोप करत संसद भवनात विरोधी पक्षांनी गुरुवारी निदर्शने केली.

## जगप्रसिद्ध रेसलर हल्क होगन काळाच्या पडद्याआड

नवी दिल्ली दि.२५ वृत्तसंस्था



जगप्रसिद्ध रेसलिंग स्टार टेरी बोलिया ज्यांना संपूर्ण जग 'हल्क होगन' या नावाने ओळखतं, याच हल्क होगन यांचं वयाच्या ७१ व्या वर्षी निधन झालं. कार्डिॲक अरेस्टमुळे होगन यांची प्राणज्योत मालवली. गुरुवारी सकाळी त्यांच्यावर अचानक वैद्यकीय आपत्कालीन परिस्थिती ओढावली, ज्यानंतर होगन यांना रुग्णालयात नेण्यात आलं. मात्र उपचारां दरम्यान होगन यांचा मृत्यू झाला. होगन यांना स्ट्रेचरवरून त्यांच्या घरातून जवळच्या रुग्णालयात नेण्यात आलं, मात्र तिथे त्यांची प्राणज्योत मालवली. १९९० च्या दशकात हल्क होगन हे नाव केवळ साठी मर्यादित नव्हतं, तर ते एक 'पॉप कल्चर आयकॉन' बनलं होतं. त्यांच्या दमदार शरीरयष्टी खास व्यक्तिमत्त्व यामुळे ते प्रत्येक घरात ओळखले जात होते. केवळ च नाही, तर त्यांनी काही हॉलिवूड चित्रपटांतही अभिनय करून स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केली होती९० च्या दशकात अनेकांच्या बालपणीचा हिरो अशी ओळख असलेले हल्क होगन यांनी तो काळ खरोखर गाजवला होता.

### १०० वर्षे जुन्या हिंदू मंदिरावर बुलडोझर कारवाई

**हैदराबाद :** तेलंगणामध्ये एका हिंदू मंदिरावरील कारवाईवरुन वाद पेटला आहे. तेलंगणाची राजधानी हैदराबाद येथील १०० वर्षे जुन्या मंदिरावर बुलडोजरच्या कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. यामुळे मंदिर परिसरामध्ये मोठा गोंधळ उडाला आहे. बंजारा हिल्स परिसरातील प्रशासनाने १०० वर्षांच्या ग्राम देवता मंदिर पाडण्याचा आदेश दिला आहे. मंदिरावरील या कारवाईला जोरदार विरोध आणि निषेध करण्यात येत आहे.या कारवाईला भाजपाच्या नेत्या माधवी लता यांनी तीव्र विरोध करत जोरदार हल्लाबोल केला आहे. माधवी लता यांना कायदा व सुव्यवस्थेमध्ये अडथळा निर्माण केल्याबद्दल पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

हैदराबादमधील बंजारा हिल्स परिसरातील ग्रामदेवतेचे मंदिर पाडले जाणार असल्याची माहिती मिळाताच मंदिर परिसरामध्ये तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले. या मंदिरावरील बुलडोझर कारवाईविरोधात जोरदार आवाज उठवला जात आहे. निदर्शने करण्यासाठी स्थानिक लोक आणि भाजपा कार्यकर्ते रस्त्यावर उतरले आहेत. आंदोलन करताना भाजपचे नेत्या माधवी लता यांनीही सहभाग घेतला. यावेळी पोलिसांचा मोठा बंदोबस्त देखील ठेवण्यात आला. मात्र आंदोलनाची तीव्रता वाढल्यानंतर माधवी लता यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

या निषेधाच्या वेळी भाजप नेत्या माधवी लता म्हणाल्या की, 'राज्य सरकारने मंदिर तोडून कोटी हिंदूंच्या भावना फेटाळून लावल्या आहेत. मी शांततेत निषेध करत होते, पण पोलिसांनी मला ताब्यात घेतले.

## बहुप्रतीक्षित, ऐतिहासिक ! भारत-ब्रिटनमधील मुक्त व्यापार करारावर स्वाक्षऱ्या

## बहुतांश उत्पादनांना ब्रिटिश बाजारपेठेत शुल्कमुक्त प्रवेश

लंडन दि.२५ वृत्तसंस्था

तीन वर्षांपेक्षा जास्त काळ चाललेली खलबते, ब्रिटनमधील अनेक सत्तांतरे आणि प्रदीर्घ वाटाघाटींनंतर अखेर भारत आणि ब्रिटनमधील 'मुक्त व्यापार करार' अस्तित्वात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांच्या साक्षीने वाणिज्यमंत्री पीयूष गोयल आणि ब्रिटनचे व्यापार सचिव जोनाथन रेनॉल्ड यांनी या ऐतिहासिक करारावर स्वाक्षऱ्या केल्या. करारामुळे भारतातील बहुतांश उत्पादनांना ब्रिटनमध्ये करमुक्त प्रवेश मिळेल, तर ब्रिटनमधील चारचाकी वाहने, मद्य आदी स्वस्त होईल.

'सर्वसमावेशक आर्थिक आणि व्यापार करार' (इकोनॉमिक अँड ट्रेड ॲग्रिमेंट सीईटीए) असे नाव असलेल्या या महाकरारामुळे भारतीयांना मोठ्या संधी उपलब्ध होतील, असा दावा पंतप्रधान मोदी यांनी केला. भारत आणि ब्रिटन हे नैसर्गिक भागीदार असून दोन्ही देशांमध्ये नवा इतिहास सुरू होत असल्याचे ते म्हणाले. भारतातील वस्त्रोद्योग, पादत्राणे, हिरे आणि दागिने, मत्स्योद्योग आणि उत्पादित वस्तूंना ब्रिटनची मोठी बाजारपेठ मिळणार असल्याचेही पंतप्रधानांनी नमूद केले. तर आतापर्यंतच्या अनेक सरकारांनी प्रयत्न केला, मात्र आपल्या कार्यकाळात हा करार अस्तित्वात आल्याचे स्टार्मर यांनी अधोरेखित केले. या करारामुळे ब्रिटनमधील मद्य उत्पादनांचे भारतातील व्यापार शुल्क १५० टक्क्यांवरून ७५ टक्क्यांपर्यंत खाली येत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

या कराराबरोबरच 'दुहेरी योगदान पद्धती'देखील (डीसीसी) अस्तित्वात येणार असून त्यामुळे दोन्ही देशांतील सेवाक्षेत्राला नवी उभारी येणार असल्याचे पंतप्रधान मोदी यांनी नमूद केले. विशेषतः तंत्रज्ञान आणि वित्तक्षेत्रांना अधिक फायदा होणार आहे. 'डीसीसी'मुळे दोन्ही देशांमध्ये व्यापार सुलभता, खर्चामध्ये कपात होऊन व्यवसायाचा आत्मविश्वास वाढेल, असे ते म्हणाले.



भारतातील कृषी उत्पादनांसाठी ब्रिटनच्या बाजारपेठेत अनेक संधी उपलब्ध होणार आहेत. याचा भारतातील तरुण, शेतकरी, मच्छीमार आणि सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योग क्षेत्राला सर्वाधिक लाभ होईल.

**नरेंद्र मोदी**, पंतप्रधान

युरोपीय महासंघ सोडल्यानंतर ब्रिटनने केलेला हा सर्वांत मोठा आणि आर्थिकदृष्ट्या महत्त्वाचा व्यापार करार आहे. यामुळे ब्रिटनची दारे व्यापारासाठी खुली असल्याचा संदेश जगात गेला आहे.

**कीर स्टार्मर**, पंतप्रधान, ब्रिटन

### महाराष्ट्रात कुणाला फायदा?

- कोकणातील हापूस आंबे, फणस
- नाशिकची द्राक्षे, कांदा
- कोल्हापुरी चप्पल
- सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योग
- सेवाक्षेत्रात रोजगाराच्या संधी

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस एन.एच.६ बोरगाव मंजू येथे मुद्रित करून दै.अजिंक्य भारत, सुगत भवन,बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला येथे प्रकाशित केले.* **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271

आपले पत्र या मेलवर पाठवावे. आम्ही त्याला प्रसिद्धी देऊ
ajinkyabharat23@gmail.com

# संपादकीय...

## कारगील: गुप्त माहिती देणाऱ्या मेंढपाळांच्या कार्याला सलाम!

कारगिलच्या लढाईत भारताने मिळविलेला विजय कारगिल विजय दिवस म्हणून साजरा केला जातो. या दिवशी कारगिलच्या लढाईत शहीद झालेल्या वीरांच्या आठवणी जागविल्या जातात. कारगिल विजय दिवस हा भारतीय सैन्यांच्या शौर्याची आठवण सदैव जागृत ठेवणारा दिवस असून देशाबद्दल त्यागाची आणि सैनिकांप्रती कृतज्ञतेची भावना जागृत करणारा दिवस आहे. २६ जुलै हा कारगिल दिन म्हणून साजरा होतो आज संपूर्ण देशात २६ वा कारगिल विजय दिवस साजरा केला जाणार आहे. इतिहासात हा विजय सोनेरी अक्षरात लिहिण्यासारखाच आहे. कारगिल युद्धात शहीद झालेल्या भारतीय सैन्याच्या शूर अधिकाऱ्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ 'कारगिल विजय दिवस' देशभरात साजरा करण्यात येतो. याच दिवशी भारतीय सैन्याच्या जवानांनी कारगिलमध्ये विपरित परिस्थितीत शत्रूसैन्याला नामोहरम केले. कारगिलच्या शहिदांचे नागरिक सन्मानाने स्मरण करण्याबरोबरच, देशातील सैनिकांचा आदर करण्याचा हा दिवस असतो. भारतीय सैन्याचे देशप्रेम, स्वयंशिस्त, श्रद्धा, शारीरिक व मानसिक सामर्थ्य, तसेच वीरवृत्ती उल्लेखनीय असते आणि त्यांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून आपण देशहितासाठी कार्य करणे आवश्यक आहे. सैनिकांनी केलेल्या त्यागाबद्दल आपण सर्वांनी कृतज्ञता व्यक्त करणे आवश्यक आहे. सैनिकांच्या कुटुंबियांच्या पाठिशी शासन खंबीरपणे उभे असून त्यांच्या विकासासाठी शासन स्तरावर विविध योजना राबविण्यासह त्यांना सर्वतोपरी मदत करण्यात येत असते. सैनिकांच्या कुटुंबासाठी शैक्षणिक व वैद्यकीय सुविधा पुरविण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. कारगिल विजय दिवस हा देशासाठी अभिमानाचा दिवस असून या युद्धात शहीद झालेल्या तसेच उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या जवानांप्रती समाज आणि शासन कृतज्ञ राहील. देशासह देशवासियांचे संरक्षण करण्यासाठी सीमेवर सैनिक अहोरात्र पहारा देत असतात. त्यावेळी आपले सैनिक स्वत:सह कुटुंबाचाही विचार करीत नाही, फक्त देशाचाच विचार करतात. देशासाठी प्राणार्पण केल्यानंतर त्यांच्या कुटुंबियांना आधार देण्यासह त्यांची जबाबदारी उचलणे हे आपले सामाजिक कर्तव्यच आहे. १९९९ मध्ये कारगिल युद्धादरम्यान, भारतीय लष्कराने पाकिस्तानी घुसखोरांना हाकलून लावले आणि ऑपरेशन विजय चा भाग म्हणून टायगर हिल आणि इतर सर्व चौक्यांवर कब्जा करण्यात भारतीय सैनिकांना यश मिळविले होते. ही लढाई लडाखच्या कारगिलमध्ये ६० दिवसांहून अधिक काळ चालली. भारत विरुद्ध पाकिस्तान युद्ध सुरु राहिले आणि शेवटी या लढाईत भारताने युद्ध जिंकले. १९९८ मध्ये दोन्ही देशांनी अणुचाचण्या घेतल्या होत्या. लाहोर घोषणेने काश्मीर समस्येवर शांततापूर्ण तोडगा काढण्याचे आश्वासन दिले होते, ज्यावर दोन्ही देशांनी फेब्रुवारी १९९९ मध्ये स्वाक्षरी देखील केली होती. पण पुढे नियंत्रण रेषा ओलांडून पाकिस्तानने भारतीय हद्दीत घुसखोरी केली होती. याच घुसखोरीला ऑपरेशन बदर असे नाव देण्यात आले होते. लगेच भारत सरकारने या घुसखोरीला प्रत्युत्तर देण्यासाठी ऑपरेशन विजय सुरू केले आणि सुमारे दोन महिन्यांच्या मोठ्या युद्धासाठी दोन लाख भारतीय सैनिकांना एकत्र जमविले. हे युद्ध मे ते जुलै १९९९ दरम्यान जम्मू-काश्मीरमधील कारगिल जिल्ह्यात सुरू झाले होते. त्यावेळचे पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल परवेझ मुशर्रफ यांनी देशाचे तत्कालीन पंतप्रधान नवाझ शरीफ यांना न कळविता युद्धाची योजना आखली होती असे सांगितले जाते. या युध्दात स्थानिक मेंढपाळांच्या गुप्त माहितीने मदत केली. सुरुवातीच्या काळात पाकिस्तानने भारताच्या ताब्यातील काश्मीरमधील भाग ताब्यात घेतला. युद्धाच्या दुसऱ्या टप्प्यात, भारताने प्रथम सामाईक वाहतूक मार्ग काबीज करून प्रत्युत्तर दिले. स्थानिक मेंढपाळांनी दिलेल्या गुप्त माहितीच्या आधारे भारतीय लष्कराला हल्ल्याचे ठिकाण ओळखता आले. अंतिम टप्प्यात भारतीय लष्कर भारतीय हवाई दलाच्या मदतीने शत्रूवर तुटून पडले आणि जुलैच्या शेवटच्या आठवड्यात या युद्धाची सांगता झाली. कारगिल युद्धात पाकिस्तानी लष्कराचाही मोठ्या प्रमाणात सहभाग होता. मात्र ही गोष्ट मान्य करण्यास पाकिस्तानने नेहमीच नकार दिला आहे. पण नंतर अशी अनेक तथ्ये युद्धादरम्यान आणि युध्दानंतरही समोर आली आहेत, ज्यात सिद्ध झाले की पाकिस्तानी लष्कराने घुसखोरांना मदत केली होती. तेव्हा नवाझ शरीफ हे मदतीसाठी अमेरिकेच्या वॉशिंग्टनलाही गेले होते. मात्र त्यावेळी अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष बिल क्लिंटन यांनी पाकिस्तानला मदत करण्यास स्पष्ट नकार दिला होता. २६ जुलै १९९९ रोजी सैन्याने मिशन यशस्वी झाल्याचे घोषित केले. पण या विजयाची खूप जास्त किंमत भारतीय सैन्याला मोजावी लागली हे मात्र खरे आहे. या युद्धात भारतीय सैन्यातील शूर सैनिकांपैकी एक असलेले कॅप्टन विक्रम बत्रा हे या युद्धात शहीद झाले होते. नंतर बत्रा यांना मरणोत्तर परमवीर चक्र, भारताचा सर्वोच्च शौर्य पुरस्कार प्रदान करण्यात आला. अलीकडेच विक्रम बत्रा यांच्या जीवनावर आधारित शेरशाह नावाचा चित्रपट बनविण्यात आला आहे. कारगिल युद्धाचे परिणाम भयंकर होते. अनेक माता आणि वडिलांनी आपले पुत्र गमावले आणि भारताने अनेक शूर सैनिक गमावले. कारगिल युद्धात भारतीय लष्कराचे ५२७ जवान शहीद झाले होते, तर पाकिस्तानचे ३५७ जवान शहीद झाले होते. या युद्धात ४५३ नागरिकांचाही मृत्यू झाला होता. या युध्दात स्थानिक मेंढपाळांच्या गुप्त माहितीने मोलाची मदत केली. त्यामुळेच भारतीय सैन्याला हे युद्ध जिंकता आले. त्यामुळे या कारगील युद्धातील शहीदांना विनम्र अभिवादन करतानाच गुप्त माहिती देणाऱ्या स्थानिक मेढपाळांच्या कार्यालाही सलाम केल्यावाचून राहवत नाही.



# 'ये दिल मांगे मोअर!'



**दिन विशेष**

डॉ.सुगत वाघमारे
सामाजिक कार्यकर्ते व उद्योजक, अकोला.

**''ये दिल मांगे मोअर''हे शब्द फक्त विजयाचे नव्हते, ते होते त्याग, साहस आणि मातृभूमीसाठी अखंड समर्पणाचे. हे शब्द होते कॅप्टन विक्रम बत्रा यांचे. एक नाव, जे कारगिलच्या बर्फाळ डोंगरांमध्ये भारताच्या विजयाचे प्रतीक बनले.**

**कारगिल युद्ध :** एक नजर १९९९ साली. भारत आणि पाकिस्तान यांच्यात झालेले कारगिल युद्ध हे आधुनिक काळातील सर्वात अवघड युद्धांपैकी एक मानले जाते. पाकिस्तानच्या सैन्याने आणि घुसखोरांनी भारतीय हद्दीत घुसून कारगिलमधील टायगर हिल, तोलोलिंग, पॉईंट ५१४० यांसारख्या उंच ठिकाणी कब्जा मिळविण्याचा प्रयत्न केला होता.

भारतीय सैन्याने कठीण भूप्रदेश, थंडी आणि प्राणांचे संकट यावर मात करीत हे सगळे शिखर परत मिळविले. २६ जुलै १९९९ रोजी भारताने अंतिम विजय मिळविला आणि म्हणून हा दिवस ''कारगिल विजय दिवस'' म्हणून साजरा केला जातो.

**कॅप्टन विक्रम बत्रा :** ज्या माणसाने मृत्युच्या डोळ्यात डोळा घातला, हिमाचल प्रदेशातील पालमपूर गावातील विक्रम बत्रा यांचं बालपण सामान्य होतं; पण त्यांचं स्वप्न असामान्य होतं. ''भारतीय लष्करात भरती होऊन देशासाठी जीव देण्याचं.'' कारगिल युद्धात, पॉईंट ५१४० या अत्यंत कठीण टेकडीवर कब्जा मिळविण्याची जबाबदारी त्यांच्यावर होती. हे काम अशक्य वाटत होतं; पण विक्रम बत्रांनी ''ये दिल मांगे मोअर!'' म्हणत आपल्या सैनिकांसोबत शत्रूवर झडप घेतली आणि विजय मिळविला. दुर्दैवाने, पॉईंट ४८७५ च्या लढाईत त्यांनी वीरमरण पत्करलं; पण आपल्या जवानांला वाचविण्यासाठी जीवाचा आहेर देणारा हा अधिकारी आजही प्रत्येक भारतीयांच्या हृदयात अमर आहे. कारगिलचे धडे, देशप्रेम आणि कृतज्ञता कारगिल युद्धाने आपल्याला शिकवली की सैन्य म्हणजे फक्त बंदुका नव्हे, तर निष्ठा, साहस आणि बलिदान आहे. आपण मोकळा श्वास घेतो,




कारण कुणीतरी डोंगरात थांबून रक्षण करतेय. देशासाठी काम करणे हीच खरी भक्ती आहे. स्वामी विवेकानंद म्हणतात,''स्वत:वर श्रद्धा ठेवा आणि शक्तिशाली बना. भारतात ३३ कोटी देव-देवतांवर श्रद्धा आहे; पण जर स्वत:वर श्रद्धा नसेल तर कुठेही मुक्ती नाही.''कारगिलचे वीर आणि विक्रम बत्रा यांचे जीवन हेच याचं उदाहरण आहे. त्यांना स्वत:वर विश्वास होता, म्हणून त्यांनी अशक्य वाटणारी कामगिरी शक्य करून दाखविली.

**युवकांसाठी संदेश :** आजच्या तरुणांनी देशासाठी काहीतरी देण्याची, काहीतरी करून दाखविण्याची प्रेरणा विक्रम बत्रा यांच्याकडून घ्यायला हवी. प्रत्येक जण लष्करात भरती होऊ शकत नाही; पण प्रत्येक जण आपापल्या क्षेत्रातून देशाची सेवा नक्की करू शकतो.

शेवटी कारगिल विजय दिवस हे फक्त एक स्मरण नाही, ती एक शपथ आहे देशासाठी, जवानांसाठी आणि भविष्यासाठी. आज आपण सगळे ''विक्रम बत्रा'' व्हा, आपल्या क्षेत्रात, आपल्या जबाबदाऱ्यांमध्ये, आपल्या भारतासाठी!

**जय हिंद!**
**वंदे मातरम्!**




# 'कोणी मारले हर्षलला?' : कंत्राटदारांच्या आत्महत्येवरून सरकारला जाब विचारा!



**विचारमंथन**

संजय भा. देशमुख
8888872784

सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील तांदुळवाडी चा हर्षल पाटील एक तरुण, मेहनती, कष्टाळू सरकारी कंत्राटदार. मागे आई-वडील, पत्नी आणि एक लहान मुलगी असा संसार होता. पण आता या कुटुंबातला कमावता हात नाही. कारण हर्षलने आत्महत्या केली आहे!

हो, ही आत्महत्या नव्हे तर एक व्यवस्थाकृत हत्या आहे. एक अशी हत्या जी थंडपणे, हिशोबाने आणि प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे घडवली गेली. हर्षलच्या १ कोटी ४० लाख रुपयांची बिले सरकारी खात्यात अडकून पडली होती. वेळेवर पैसे मिळाले असते, तर आज हर्षल आपल्या मुलीच्या केसांत फुलं माळत असता, तिच्या शिक्षणाची चिंता करत असता. पण नाही... सरकारकडून केवळ आश्वासने, गोंडस शब्द आणि असंवेदनशीलतेचे डोंगर मिळाले. काही दिवसांपूर्वीच राष्ट्रवादीचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी भविष्यवाणी केली होती ''राज्य सरकारकडे पैसे नाहीत, आणि या आर्थिक डबघाईत पहिला बळी ठरणार आहे तो लहान कंत्राटदारांचा!'' आणि दुर्दैवाने हे खरे ठरत आहे.



आज महाराष्ट्रात शेतकऱ्यांप्रमाणेच लहान कंत्राटदारही आत्महत्या करण्याच्या उंबरठ्यावर उभे आहेत. कारण त्यांचे कोट्यवधींचे पैसे सरकारकडे अडकून पडले आहेत. ना कुठली निश्चिती, ना पैसे मिळण्याची तारीख, ना कुठली व्यवस्था. हे सरकार इतकं नाकर्तं, की ज्यांनी प्रत्यक्ष कामं करून दाखवली, त्यांनाही ते जगू देत नाही! हर्षलचं मरण हे एका संपूर्ण वर्गाचं दु:ख आहे.कंत्राटदार असो वा शेतकरी कष्ट करायचे, सरकारी कामं वेळेत पूर्ण करायची, आणि नंतर हातात काहीही न पडल्याने न्यायाची अपेक्षा न करता मृत्यूला कवटाळायचं ही महाराष्ट्राची आजची शोकांतिका आहे. हर्षलच्या आत्महत्येची जबाबदारी कोण घेणार?का त्याचे बिले वेळेवर मंजूर झाली नाहीत? का त्याला वारंवार हेलपाटे घालावे लागले? का त्याच्या मुलीच्या भविष्याची काळजी करण्याऐवजी त्याला मृत्यू स्वस्त वाटला? असे नानांविध प्रश्न त्याच्या कुटुंबातील सदस्यांना आणि इतर शासकीय कंत्राटदारांच्या मनात घोंगावत आहेत. याला कारण ही व्यवस्थाच गुन्हेगार आहे. हे फक्त प्रशासनिक अपयश नाही ही मानवी हत्या आहे.

कंत्राटदारांनी सरकारला थेट प्रश्न विचारायलाच हवेत,

जनतेचे काम करूनही पैसे मिळत नाहीत,मग ह्या सरकारचं काम काय? वेळेवर दिले नाहीत बिले, म्हणून जर एखादा कंत्राटदार आत्महत्या करतो, तर त्या मंत्र्यांची, अधिकाऱ्यांची जबाबदारी नाही का? महाराष्ट्रात सरकार चालतंय की केवळ उधारीवर, आणि तेही जनतेच्या प्राणांवर? हर्षलसारखा आणखी एकही तरुण आत्महत्या करू नये यासाठी, सरकारने कंत्राटदारांची थकीत बिले तातडीने अदा करावी. अन्यथा, लवकरच प्रत्येक जिल्ह्यात अशी अंत्ययात्रा निघेल आणि तिचं संपूर्ण श्रेय याच सरकार जाईल!

''हर्षलचं मरण हे एक इशारा आहे याला दुर्लक्षित केल्यास महाराष्ट्रात एक नवीन आत्महत्येचं संकट उभं राहील. ते रोखायचं असेल, तर शब्द नव्हे, तर कृती हवी!''

अमरावतीत कंत्राटदारांच्या सुरक्षा ठेवी गायब अमरावती महानगरपालिकेत तर शहरातील विकासकामांच्या बदल्यात महानगरपालिकेकडे कंत्राटदारांनी जमा केलेली ५० कोटी रुपयांहून अधिक सुरक्षा ठेव आता वाऱ्यावर गेल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. नाले, रस्ते, गार्डन फेंसिंग यांसारखी कामे पूर्ण करूनही अनेक कंत्राटदारांना त्यांची ठेव परत मिळालेली नाही. त्यातच लेखा विभागाकडून ''ही रक्कम विकासकामासाठी वापरली गेली'' असे सांगण्यात आल्याने कंत्राटदारांच्या पायाखालची वाळू सरकली आहे. कंत्राटदारांनी दोन-तीन वेळा स्मरणपत्रे देऊनही महानगरपालिका कारवाई करत नाही. उलट लेखा विभागाचे उत्तर ''आमच्याकडे पैसेच नाहीत'' ऐकून अनेकांचा संताप उफाळून आला आहे.''कामे पूर्ण करून दिल्यानंतर सुरक्षा ठेव परत करणे ही मनपाची जबाबदारी आहे. पण मनपा फक्त बोळवण करते.'' ही सुरक्षा ठेव खरंच विकासकामांसाठी वापरली का? वापरली असेल, तर त्या कामांसाठी राज्य सरकारकडून आलेला निधी कुठे गेला? कंत्राटदारांना त्यांच्याच सुरक्षा ठेवी परत मिळत नाहीत. याला कंटाळून उद्या मनपा क्षेत्रात हर्षल सारख्या कंटाळून एखाद्या कंत्राटदाराने आत्महत्या केल्यास याला कोण जबाबदार असेल. अश्या घटना घडूच नये म्हणून मनपा प्रशासनाला कृती करावी लागेल, सुरक्षा ठेवी परत कराव्या लागतील.

# न्यायाधिशांविरोधातील महाभियोग!



**राजकारण**

डॉ. विनोद गायकवाड
राजकीय अभ्यासक, मो. ९८५०३२४२०२

भ्रष्टाचार ही भारताला लागलेली मोठी वाळवी आहे. त्यामध्ये आतापर्यंत न्यायव्यवस्थेतील काही प्रकरणांसह इतर सर्वच क्षेत्रातील लहान-मोठी मंडळी सहभागी आहेत. म्हणूनच राजकीय आणि नोकरशाही स्तरावरील भ्रष्टाचाराची मोठी प्रकरणे पुढे येतात. प्रत्येक सरकारी आणि खाजगी कामांतील भ्रष्टाचाराचे प्रमाण ठरले आहे. त्यानुसार प्रत्येकाला तो हिस्सा त्या प्रमाणात मिळतो. मुळात तो अलिखित नियमच बनला आणि त्याचे पालन कायदयाइतकेच होते. न्यायाचे पवित्र कार्य करणाऱ्या न्यायव्यवस्थाही भ्रष्टाचाराच्या विळख्यात आल्यात. १९९१ मधील मद्रास उच्च न्यायालयाचे तत्कालीन मुख्य न्यायाधीश के. वीरस्वामी यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप होते. त्यासाठी त्यांना सर्वोच्च न्यायालयाच्या कायदेशीर प्रक्रिया आणि कारवाईचा सामना करावा लागला होता. यामुळे न्यायव्यवस्थेच्या निष्पक्षतेवर आणि विश्वासार्हतेवर प्रश्न उपस्थित झाले. त्यानंतर उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या घरात मोठी रोख रक्कम मिळाल्याने न्यायव्यवस्थाच हादरली. ते प्रकरण महाभियोगापर्यंत पोहचले.

संविधानातील कलम २१४ ते २३१ नुसार घटकराज्यांसाठी उच्च न्यायालयाची तरतूद करून न्यायव्यवस्थेस संरक्षण दिले. राष्ट्रपती, सर्वोच्च व उच्च न्यायालयाचे न्यायाधीश अशा काही संवैधानिक पदावरील मान्यवरांनी लोकशाही मूल्यांचे पालन न केल्यास पदावरून हटविण्यासाठी महाभियोगाची तरतूद संविधानात आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांप्रमाणेच उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांनाही महाभियोगाच्या प्रक्रियेद्वारे पदावरून दूर केले जाते. उच्च न्यायालयातील न्यायाधीशाने गैरवर्तन केल्यास किंवा अकार्यक्षमता, भ्रष्टाचार या कारणांवरून न्यायाधीशाविरुद्ध महाभियोग चालविला जातो. संसदेच्या प्रत्येक सभागृहातील एकूण सभासद संख्येच्या बहुमताने आणि उपस्थित राहून मतदान करणाऱ्या सभासदांच्या दोनतृतीयांशा बहुमताने न्यायाधीशांवरील आरोप सिद्ध झाल्यास राष्ट्रपती त्या न्यायाधीशाला पदच्युत करू शकतात. उच्च न्यायालयातील न्यायाधीशांना पदावरून दूर करण्याचा अधिकार संसद आणि राष्ट्रपती यांनाच आहे, हा अधिकार घटकराज्यांच्या विधिमंडळाला किंवा राज्यपालाला संविधानाने दिलेला नाही. याच अधिकाराचा वापर करून संसदेने वर्माविरोधात महाभियोग चालविण्याचा निर्णय घेतला. दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायाधीश यशवंत वर्मा यांच्या सरकारी निवासस्थानी मोठ्या प्रमाणात रोख रक्कम सापडली होती. स्टोअर रूमला आग लागल्याने हा प्रकार उघड झाला. त्यामुळे न्यायाधीश वर्मा यांच्या विरोधात इन-हाऊस चौकशी सुरू असून सरन्यायाधीश खन्ना यांनी तीन न्यायाधीशांची समिती स्थापन केली होती. त्या समितीचा अहवाल नुकताच सर्वोच्च न्यायालयात सादर झाला. दरम्यानच्या काळात न्यायमूर्ती वर्मा यांना काही काळासाठी कोणतीही न्यायालयीन जबाबदारी देऊ नये असे सरन्यायाधीशांनी सुचविले. त्यानंतर त्यांची बदलीही करण्यात आली. दुसरीकडे त्यांच्या विरोधात संसदेत महाभियोग प्रस्तावावर कारवाई सुरू झाली. संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी लोकसभेच्या १४५



आणि राज्यसभेच्या ५३ खासदारांनी स्वाक्षरी केलेला महाभियोग प्रस्ताव दिला. महाभियोग प्रस्तावाकरिता आवश्यक असलेल्या संख्येपेक्षा ही जास्त आहे. तसेच हा प्रस्ताव दोन्ही सभागृहात एकाच दिवशी आल्याने त्याचे महत्त्व वाढले. जर हा प्रस्ताव एका सभागृहात आला तर तो स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार पीठासीन अधिकाऱ्यांना असतो. परंतु जर प्रस्ताव दोन्ही सभागृहात एकाच दिवशी आला तर तो सभागृहाची मालमत्ता बनतो असे राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड (उपराष्ट्रपती) यांनी स्पष्ट केले. त्यानंतर लगेच संध्याकाळी त्यांनी उपराष्ट्रपती पदाचा राजीनामा दिल्याने राज्यसभेचे सभापती पदही रिक्त झाले. महाभियोगाचा प्रस्ताव आणि राजीनामा यांचा संबंध तसेच विरोधकांच्या मागणीनुसार ऑपरेशन सिंदूर बाबत सभागृहात चर्चेचा कालावधी देणार असल्याचे कारण राजीनाम्यामागे आहे असे बोलले गेले. विरोधी पक्षांकडून महाभियोगाची सूचना आल्यानंतर ती सभापती धनखड यांनी स्वीकारल्याने सत्ताधारी भाजपाची नाराजी असल्याचे बोलले गेले असले तरी असा प्रस्ताव लोकसभेत आल्याने सत्ताधारी पक्षाला माहिती नव्हते असे म्हणता येणार नाही. मुख्य न्यायाधीश, उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश आणि एक सदस्य यांचा समावेश असलेल्या तीन सदस्यांची चौकशी समिती गठीत केली जाते. या समितीच्या अहवालानंतर सभागृहाचे सभापती प्रस्तावावर निर्णय घेतात.

आतापर्यंत एकाही न्यायाधीशांना महाभियोगाद्वारे काढून टाकण्यात आलेले नसले तरी उच्च आणि सर्वोच्च न्यायालयाच्या किमान सहा न्यायाधीशांविरुद्ध महाभियोग चालवण्याचे प्रयत्न झालेत. सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश रामास्वामी यांच्या विरोधात महाभियोग ठराव आणला होता. मात्र बहुमताअभावी तो पारित झाला नव्हता. अलाहाबाद उच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश एस. एन. शुक्ला यांचा मेडिकल कॉलेज प्रवेश घोटाळा, पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश निर्मल यादव यांच्यावर २००८ च्या कॅश-एट-जज डोअर घोटाळा, तसेच दिल्ली उच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश शमित मुखर्जी यांनी न्यायालयीन निर्णयांवर प्रभाव पाडण्यासाठी लाच घेतल्याचा आरोप अशी काही भ्रष्टाचाराची प्रकरणे पुढे आलीत. १९९९ मध्ये सर्वोच्च आणि उच्च न्यायालयांच्या न्यायाधीशांविरुद्ध कारवाई करण्यासाठी इन-हाऊस प्रक्रिया स्थापन केली. त्यानुसार न्यायाधीशांविरुद्ध तक्रार प्राप्त झाली तर प्रथम त्यांची न्यायाधीश स्तरावर चौकशी केली जाते. या समितीच्या चौकशीत न्यायाधीश दोषी आढळून आल्यास त्यांना राजीनामा देण्यास सांगितले जाते. त्यांनी राजीनामा न दिल्यास त्यांच्यावर महाभियोग प्रक्रिया सुरू करण्यासाठी राष्ट्रपतीला अहवाल सादर केला जातो.

न्यायाधीश पदे संवैधानिक असून ते न्यायदाते असतात. म्हणूनच न्यायदान प्रक्रियेतील व्यक्तींच्या घरी घडलेला हा प्रकार असंवैधानिकच म्हणावा लागेल. न्यायाधीश वर्माजींनी न्याय विकला म्हणूनच त्यांच्याकडे रोकड जमा झाली. म्हणूनच संसदेने महाभियोगाचा घेतलेला निर्णय न्यायव्यवस्थेची प्रतिमा जपणारा ठरणार. उच्च न्यायालय हे घटकराज्याचे सर्वोच्च न्यायालय आहे. म्हणजेच त्या घटकराज्यातील जनमाणसांच्या आयुष्याचा न्यायनिवाडा करणारी संस्था आहे. भ्रष्टाचार करणाऱ्यास शिक्षा देणारी आणि सामाजिक व्यवस्थेला मूल्यात्मक व्यवस्था जोपासण्यास भाग पाडणारी न्यायव्यवस्था भ्रष्टाचाराच्या विळख्यात येणे म्हणजेच न्यायव्यवस्थेसमोरील अडचणी वाढविणारे ठरते. म्हणूनच संवैधानिक पदावरील मान्यवरांनी संविधानाचे आणि लोकशाही मूल्यांचे पालन करून लोकशाही बळकट करावी हीच अपेक्षा.



**लक्ष्यभेद**

जयदीप सोनखासकर
9890508017

## दोष निर्दोष



मुंबई बॉम्बस्फोट आरोपी
ठरले सारे निर्दोष आता
कोण म्हणणार तेच पापी
न्यायालयाने सिद्ध केले आता

लोकल ट्रेन साखळी प्रकरण
अनेक मृत्युमुखी घेऊन गेले
ज्या घडून आणले रणकंदन
ते मात्र सही सलामत सुटले

१८९ जणांचा मृत्यू तेव्हा
आकांड तांडव करीत होता
८२४ लोक जखमी जेव्हा
रुग्णालयात तडपत होता

## ॥ अभंगवाणी ॥

- प्रवीण हटकर
८०५५२१३२८१

प्रेम समजाया प्रेमात रंगाया ।
प्रेमात जगाया कृष्ण झालो ॥

संवेदन मना वेदना कळाया ।
दुखास झेलाया येशू झालो ॥

शांतीचा संदेश जगी पोहचाया ।
मनी रुजवाया बुद्ध झालो ॥

ज्ञान हीच शक्ती सत्य जाणूनिया
ज्ञान वाटावया सज्ज झालो ॥

विश्व उमगण्या विश्व जाणावया।
विश्वात गुंताया कण झालो ॥

माणसाच्या मनी माणूस बघता ।
माणूस दिसता देव झालो ॥

# 'सैयारा'मुळे मराठी चित्रपट 'येरे येरे पैसा ३' थिएटर बाहेर; मनसेने दिला आंदोलनाचा इशारा







मोहित सुरी दिग्दर्शित 'सैयारा' चित्रपट सध्या बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालत आहे. या चित्रपटाने अनेक मोठ्या चित्रपटांचे बॉक्स ऑफिस रेकॉर्ड मोडले आहेत. सोशल मीडियावर व्हायरल होणाऱ्या रिल्समुळे आणि त्यावरील चर्चेमुळे चित्रपटाला चांगलीच प्रसिद्धी मिळत आहे. मात्र सैयाराचा फटका मराठी चित्रपटांना बसत असल्याचे समोर आले आहे. सैयाराला स्क्रिनिंग मिळण्यासाठी 'येरे येरे पैसा ३' हा चित्रपट सिनेगृहातून काढला जात असल्याची बाब समोर आली आहे. मनसेचे नेते संदीप देशपांडे यांनी याबाबत भाष्य केले असून मराठी चित्रपटाची गळचेपी केल्यास मनसे स्टाईलने उत्तर देण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला आहे.

माध्यमांशी बोलत असताना संदीप देशपांडे म्हणाले, ''मनसेचे पदाधिकारी अमेय खोपकर यांचा 'येरे येरे पैसा ३' हा चित्रपट नुकताच प्रदर्शित झाला आहे. त्यांच्यावर सूड उगविण्यासाठी काही मल्टिप्लेक्स आणि थिएटर्सनी जाणीवपूर्वक त्यांचा चित्रपट काढून घेतला आहे. या सर्व थिएटर्सना आम्ही इशारा देत आहोत. जाणीवपूर्वक मराठी चित्रपटांची गळचेपी केल्यास मनसे आपल्या पद्धतीने आंदोलन करेल, याची त्यांनी नोंद घ्यावी.''

अमेय खोपकर मराठी चित्रपटांसाठी लढत होते, यासाठी त्यांच्याच चित्रपटावर सूड उगविण्याचा प्रयत्न काही मल्टिप्लेक्स आणि थिएटरचे मालक करत आहेत. आम्ही त्यांना इशारा देत आहोत. त्यांनी योग्य वेळी थाऱ्यावर यावे, नाहीतर त्यांना थाऱ्यावर कसे आणायचे? हे आम्हाला चांगले ठाऊक आहे, असा इशारा संदीप देशपांडे यांनी दिला.संदीप देशपांडे पुढे म्हणाले, कोणतातरी सैयारा नावाचा चित्रपट आला आहे. त्यासाठी मराठी चित्रपटांचा बळी दिला जात आहे. जाणीवपूर्वक जर हे केले जात असेल तर मनसे गप्प बसणार नाही. मराठी सिनेमाच्या निर्मात्याला जाणूनबुजून लक्ष्य करण्यात येत असेल तर मनसे शांत बसणार नाही.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची आज बैठक संपन्न झाली. पक्षबांधणीसंदर्भात सदर बैठक झाल्याचे पक्षाचे सरचिटणीस संदीप

# श्वेता तिवारी ही टीव्हीवरील लोकप्रिय अभिनेत्री-एकता कपूर





श्वेता तिवारी ही टीव्हीवरील सर्वात लोकप्रिय अभिनेत्री आहे. 'कसौटी जिंदगी की' या मालिकेत प्रेरणाची भूमिका साकारून ती घराघरांत लोकप्रिय झाली. आज श्वेता तिच्या सौंदर्य आणि दमदार अभिनयामुळे प्रेक्षकांच्या मनावर राज्य करते.

अभिनेत्रीने अलीकडेच टेलिव्हिजन इंडस्ट्रीमधील शूटिंग शेड्यूलचा तिचा अनुभव शेअर केला. एका मुलाखतीदरम्यान तिने सांगितले की, तिने डेली सोपच्या शूटिंगदरम्यान सतत ७२ तासांची शिफ्टदेखील केली. श्वेताने एकता कपूरच्या कठोर परिश्रम आणि समर्पणाचे कौतुक केले.खरं तर, भारती टीव्हीच्या यूट्यूब चॅनेलवरील अलीकडेच एका पॉडकास्टमध्ये श्वेता तिवारीने तिच्या थकवणाऱ्या शिफ्ट्सबद्दल सांगितले. श्वेता तिवारीने सांगितले की, तिने सतत ७२ तास शूटिंग केले आहे आणि तिला ३० दिवसांच्या महिन्यात ४५ दिवसांचा पगार मिळत असे.श्वेता म्हणाली, ''आम्ही संपूर्ण इंडस्ट्रीत प्रसिद्ध आहोत की कोणीही झोपत नव्हते. मी ७२ तास शूटिंग करायचे. ३० दिवसांचा महिना असायचा, मला ४५ दिवसांचा चेक मिळत असे. सकाळी ७ ते संध्याकाळी ७ वाजेपर्यंत एक असायचा, संध्याकाळी ७ ते दुसऱ्या दिवशी सकाळी ७ वाजेपर्यंत दोन असायचे.''

श्वेताने मुलाखतीदरम्यान टीव्ही क्वीन एकता कपूरच्या समर्पणाचे आणि वचनबद्धतेचे कौतुक केले आणि म्हणाली की, केवळ कलाकारांचेच वेळापत्रक इतके व्यग्र नव्हते. २२ शो हाताळताना, एकता क्वचितच झोपायची आणि नेहमीच कॉलला उत्तर देण्यासाठी उपलब्ध असायची. श्वेता पुढे म्हणाली, ''फक्त आम्ही कलाकार असे काम करत नव्हतो, एकताही असे करत असे.

# आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 112

## हे कोडे कसे सोडवाल

संकेतामध्ये काही शब्द दिलेले आहेत. हे शब्दच योग्यप्रकारे या चौकटीत लिहून हे महाशब्दकोडे आपणचं तयार करा. मदतीकरिता काही शब्द चौकटीत दिलेले आहे.

**संकेत शब्दः–**

**दोन अक्षरी**
- उणे
- कड
- काका
- काम
- कान
- काकू
- कुंज
- खोका
- गत
- घेर
- घोडा
- जम
- टाच
- तथ्य
- दात
- दाम
- दही
- धणे
- नर
- नार
- पण
- बोट
- मत
- मद
- बाला
- रान
- रूप
- वाम
- सान
- साध्वी
- सुत्र
- सुन
- स्वाद
- हज

**तीन अक्षरी**
- कातर
- गरज
- घनता
- डमरु
- तगादा
- तक्षक
- पकड
- पचन
- पपई
- भेदक
- मांजर
- लगट
- लवण
- वचन
- वजन

**चार अक्षरी**
- अवघड
- उरविणे
- एकटक
- जपमाळ
- जमविणे
- जोडाक्षर
- डावखोरा
- पडसाद
- बोळवण
- मजकूर
- मतभेद
- मालवणे
- लक्षदीप
- लाजवणे
- क्षपणक
- हटवादी
- हस्तकला

**पाच अक्षरी**
- अपराजित
- एकलकोंडा
- जकात
- नाका
- नतमस्तक
- मकरालय
- वजनदार
- हवालदार

**सहा अक्षरी**
- अवसान घात
- पदरात घेणे
- वानर किवण
- विजया दशमी
- सुगावा लागणे

**अन्य अक्षरी**
- कान उघडणी करणे
- ताटाखालचे मांजर

### मागील महाशब्दकोडेचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प | क | ड | स | म | न्स | | पा | ळ | त | | नी | र | स |
| द | | ळ | | र्जी | | ऋ | ण | | न | | र | ज | क |
| | म | म | ता | | मा | | उ | भ | य | प | क्षी | | र्म |
| पा | त | ळी | | कु | त्र | | ता | ड | | ठा | र | | क |
| द | दा | त | | रू | | नि | रा | क | र | ण | | सु | |
| | र | | | क्षे | त्र | | | | क्ष | | सं | धा | न |
| क | | द | त्ता | त्र | य | | दि | न | क | र | | र | व |
| ड | ग्गा | | | | स्थ | | वा | | | क्त | ट | | रा |
| क | | उ | त्त | रा | | गं | भी | र | | ना | व | | त्र |
| ल | ज्ज | | | णी | | | त | ट | स्थ | | क्त | ष्ठ | |
| क्षी | | ज | मा | ल | गो | टा | | णे | | बी | | | अ |
| | गृ | ह | ल | क्ष्मी | | ळ | | | न | भ | | कू | प |
| क | ह | र | | बा | | कु | टूं | ब | व | त्स | ल | | रा |
| | स्थ | | अ | ई | | ट्या | | हू | | | स | मा | धी |

Uday Munde - 8446302691

# महाशब्दकोडे 493

**–: आडवी विधाने :–**

1) गान सम्राज्ञी, गानकोकिळा इत्यादी उपाध्यांनी अलंकृत झालेली प्रख्यात गायिका
5) सरावलेला, निष्णात
8) देणे
10) तबला, मृदंग
12) हानी, तोटा
14) मनातील विचार
16) संशय दूर करणे
18) सहाय्य
19) चारशेऐंशी कागदाचे पुडके
20) झुंज, लढाई, सामना
21) एक खाजगी दूर चित्रवाहिनी
22) श्रीविष्णू पत्नी
23) दूर अंतरावरच्या माणसांशी बोलणे करून देणारे यंत्र, टेलिफोन
25) चेन्नईचे पूर्वीचे नाव
26) महत्तम, पराकाष्ठा
29) प्रती, लेखाची नक्कल
30) ग्रहाच्या उच्च स्थापनापासून सातवी रास
31) घरातील अगदी सर्वात वरचा मजला
33) प्रस्थापित राज्यत्तेविरूध्द केलेली बंडखोरी
35) मोठे
37) अखंडीतपणा
39) पती, नवरा
41) नवे
43) मनाचे समाधान, खात्री करून घेणे
45) धुणे
47) सप्ताहातील एक वार
48) हिंदीत शपथ
49) पौराणिक काळातील मदनाची स्त्री
50) साधारणपणे एका दिवसात क्रमिला जाणारा रस्ता, टप्पा
51) विज्ञान अभ्यासक्रमातील एक विषय
53) लाक्षणिक अर्थाने अत्यंत खादाड मनुष्य
55) अहंकारी, गर्विष्ठ
56) माफी
57) बंदुकीत भरावयाची दारू, वकील लोकांचे मंडळ
58) तयार, स्थापित
59) पकडलेले, पांगलेले
61) खिडकी किंवा दारावर लावलेली काच
64) नेता, नेतृत्व करणारा
65) आदर
66) प्रेम, ममता
68) कसोटी, चांचणी
70) पुर्वी समुद्र चौपाटीवर मिळणारा हा चटपटीत पदार्थ आता बहुतेक सर्वच शहरात मिळतो
72) गजानन
74) छत्रपती शिवरायांचे आध्यात्मिक गुरु
75) पुर्वी शाईत बुडवून लिहिण्याची लेखणी
76) प्रजा, जनता

**–: उभी विधाने :–**

1) आळा घालणे
2) रामायणात रावणाची पत्नी
3) अर्थयुक्त वर्ण
4) चापट व मऊ पदार्थाचा आघात
5) घोडयावर चढून बसलेला
6) राजबिंडा, सुंदर चेहऱ्याचा
7) शरीर, देह
8) देवाच्या नैवेद्याचे वितरण
9) शील, उदारता
11) खाणीतील पदार्थ
13) कमळाचे तळे
15) यमाचे सेवक
16) शंखाचा नाद
17) खोदीव किंवा कोरीव शोभिवंत काम
24) हलक्या दर्जाचे कार्य
25) मोठे होण्याची इच्छा
27) एखाद्याला मुर्ख बनविणे, चेष्टा करणे
28) वात्सल्य, आपुलकी, प्रेम
29) उलटून वार करणे
32) तृष्णा
34) तेलाने केलेली हातपायाची मालीश
36) नोकरी करुन उदरनिर्वाह करणारा
38) फिकीर, पर्वा
40) बारीक सुताचे व विणीचे
42) शुर पुरूष
43) स्वयंपाकी, आचारी
44) नदीच्या प्रवाहाचे वळवून आणलेले पाणी
45) अडथळा करणे
46) एखादी गोष्ट दृष्टीच्या कक्षेबाहेर असणे
48) राखून ठेवणे
52) सरस्वती
54) निश्चयी, पक्क्या मनाचा
55) मान आणि सन्मान घेण्याचा हक्क असलेला
60) वाकडा, आडवा
61) एक तंतुवाद्य
62) अलंकार शास्त्रात वर्णिलेले नऊ रस
63) वारा भरण्याची पिशवी
65) फुलांचा हार
67) बंद केलेले पाकीट
68) पुन्हा, वापस
69) धुणे
70) दुजाभाव, भिन्नता, अलग होणे, गुप्त बातमी
71) आडवे संकेत क्र. 19 प्रमाणे
73) बाण (उत्तर इतरत्र)

### मागील महाशब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| र | ण | जी | त | दे | सा | ई | | गे | ट | वे | ऑ | फ | इं | डि | या |
| वि | | व | र | मा | य | | | स्ट | | डा | | ट | | | |
| न्द्र | | दा | | य | | चि | त्र | हा | र | | स | क | र्म | क | |
| ना | दा | न | | | दा | ता | | ऊ | र्जि | त | का | ळ | | र्म | |
| थ | र | | गो | दा | व | री | | स | | ला | ळ | | य | | ठ |
| टा | | क | पि | | | | भ | | को | ठी | | | मु | स | ळ |
| गो | पा | ळ | | | आ | ग | र | क | र | | क | | ना | ट | क |
| र | व | | | | स | व | त | | ड | र | पो | क | | वी | |
| | ली | ख | | सु | न्न | | ना | ख | वा | | ल | वा | द | | सौ |
| झो | | नि | ज | धा | म | | ट्य | | हू | ल | | य | या | ती | |
| प | रा | ज | य | | र | ह | म | त | | व | रा | त | | | जू |
| | ज | | घो | ळ | ण | | | | क | ण | व | | वि | धी | |
| ब | द | मा | ष | | | मो | र | चू | द | | ण | | धा | | |
| ग | र | ज | | स | का | र | ण | | र | स | | त | न | य | |
| | बा | व | न | क | शी | | भू | | | ल | व | | स | म | य |
| ध | र | ण | | | | हो | मी | ज | हां | गी | र | भा | भा | | |

Uday Munde - 8446302691

# राशी-भविष्य

**मेष :** आज फायदेशीर गुंतवणूक वाढेल. मोठ्या आणि प्रतिष्ठित लोकांशी संबंधांमुळे तुम्हाला फायदा होईल. वाहन मिळण्याची शक्यता आहे.

**वृषभः** आज व्यवसाय चांगला चालेल. कौटुंबिक वातावरण आनंददायी असेल. प्रवास फायदेशीर असेल. उत्पन्न अपेक्षेनुसार असेल.

**मिथून :** तुम्हाला नवीन कपडे आणि दागिने मिळतील. दिवसाची सुरुवात भक्तीने होईल. कायमस्वरूपी मालमत्ता, खरेदी-विक्रीतून नफा होईल.

**कर्क :** वेळेवर काम पूर्ण करून तुम्हाला दिलासा मिळेल. व्यवसायात अनुभव-ाचा फायदा होईल. गुंतवणुकीत यश मिळेल. वेळेचा योग्य वापर होईल. तुम्ही मित्रांसोबत देवाचे दर्शन घ्याल.

**सिंह :** व्यवसायात इतरांवर जास्त विश्व-ास ठेवू नका. वर्तणुकीतील कौशल्य आणि सहनशक्तीच्या आधारे समस्या सोडवली जाईल.

**कन्या :** आज तुम्हाला आर्थिक बाबतीत फायदा होईल. कामाच्या ठिकाणी प्रल-ोभन टाळा. इतरांवर अवलंबून राहू नका, अन्यथा तुम्ही स्वतःचे नुकसान कराल.

**तुळ :** आज अचानक पैसे मिळण्याची शक्यता आहे. याशिवाय, तुम्हाला कुटुंब आणि मित्रांकडून भेटवस्तू मिळतील. तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

**वृश्चिक :** आजचा दिवस शुभ आहे. तुम्ही सकाळपासूनच कामात व्यस्त राहाल. दिवस घरगुती कामात घालवला जाईल.

**धनु :** कामाच्या व्यस्ततेत कुटुंबाकडे दुर्लक्ष करू नका. अज्ञात व्यक्तींच्या मदतीने आत्मविश्वास वाढेल. खर्च कमी करण्याचा प्रयत्न करा.

**मकर :** आज तुम्हाला कुटुंबातील सद-स्यांसोबत सत्संगाचा लाभ मिळेल. वैयक्तिक समस्या सोडवल्या जातील. व्यावसायिक कामासाठी प्रवास केला जाऊ शकतो. सामाजिक प्रतिष्ठा लक्षात घेऊन काम करा.

**कुंभ :** अधिकारी कामावर आनंदी राहतील पण काळजी घ्या. तुम्हाला चांगले लोक भेटतील. आज तुम्ही पाहुण्यांचे स्वागत करण्यात व्यस्त असाल. मित्रांसोबत मौजमजेत वेळ घालवाल.

**मीन :** प्रेमप्रकरणात यश मिळेल. वाहन आनंद मिळेल. व्यवसायात सावधगिरी बाळगा आणि योजना काळजीपूर्वक राबवा. निष्काळजीपणे काम करू नका.

आचार्य पं. श्रीकांत पटैरिया: मो. ७८७९३७२९१३

## थोडक्यात

### कृषी अभियांत्रिकी महाविद्यालयात वृक्षारोपण




**अकोला :** डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या कृषी अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालयात तसेच राष्ट्रीय सेवा योजना एककाच्या वतीने आज ''एक पेड माँ के नाम'' या भावनिक व प्रेरणादायी उपक्रमांतर्गत वृक्षारोपण कार्यक्रम अत्यंत उत्साहात पार पडला. महाविद्यालयासमोरील परिसरात पार पडलेल्या या उपक्रमात एकूण २६० वृक्षांचे रोपण करण्यात आले. कार्यक्रमाचे नेतृत्व अधिष्ठाता डॉ. सुरेंद्र काळबांडे यांच्या मार्गदर्शनाखाली झाले. या वृक्षारोपणासाठी राजकमळ (रॉयल पाम), घंटीफुल (तेकोम), बोगनवेल, चाफा, गोल्डन डुरांटा, ब्लॅक फायकस (वड), चिकू, आंबा अशा विविध प्रजातींची निवड करण्यात आली. या वृक्षांचे निवड करताना परिसराच्या सौंदर्यीकरणासह पर्यावरणीय लाभ हेदेखील लक्षात घेण्यात आले.

कार्यक्रमास प्रा. सूचिता गुप्ता, डॉ. महेंद्र देशमुख, डॉ. शैलेश ठाकरे, डॉ. अविनाश गजाकोस, डॉ. प्रमोद बकाने, डॉ. राजेश पातोडे, डॉ. महेंद्र काळे, डॉ. भाग्यश्री पाटील, डॉ. मितल सुपे, डॉ. किशोर घरडे, डॉ. अनिल कांबळे, डॉ. संदीप कऱ्हाळे, डॉ. धीरज कराळे, डॉ. यत्नेश बिसेन, प्रशांत गावंडे, डॉ. राजेश मुरूमकार, डॉ. तळोकार, डॉ. मृदुलता देशमुख, डॉ. वैभवकुमार शिंदे, कुलदीप जाधव, श्री. काकडे, मेटांगे, श्री. महेंद्रसिंग राजपूत, डॉ. संदीप नागे, गणेश कापसे व इतर अनेक कर्मचारी उपस्थित होते.

### मुख्यमंत्री फडणवीसांनी घेतली महाराष्ट्रातील खासदारांची भेट



**अकोला :** महाराष्ट्रातील १४ कोटी जनतेच्या कल्याणासाठी सदैव तत्पर राहणारे देवा भाऊ महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिल्ली येथे भाजपा शिवसेना राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीच्या खासदारांची भेट घेऊन दिल्ली येथे त्यांच्या मतदारसंघातील समस्या जाणून घेऊन आपुलकीने मतदार संघाची परिस्थिती व व्यक्तिगत कुटुंब कुटुंबाची माहिती कार्यकर्त्यांची पदाधिकाऱ्यांची माहिती संघटनात्मक बाबीची माहिती घेऊन आपण पालक या भूमिकेत आहोत हे सिद्ध केले.

अकोला लोकसभा मतदारसंघातील खासदार सर्वात कमी वयातील महाराष्ट्रातील खासदार अनुप धोत्रे यांनी अकोला लोकसभा मतदारसंघातील समस्या केंद्र आणि राज्य सरकारच्या दरबारी असलेल्या समस्या संदर्भात मुख्यमंत्री नामदार देवेंद्र फडणवीस तसेच केंद्रीय मंत्र्यांशी पाठपुरावा करण्यासंदर्भात नामदार फडणवीस यांना साकडे, घालून अनेक समस्या बाबत चर्चा केली याबाबत सकारात्मक भूमिका घेऊन केंद्र सरकार आणि राज्य सरकारकडे असलेले प्रश्न निकाली काढण्याची अभिवचन नामदार फडणवीस यांनी खासदार धोत्रे यांना दिले खासदार धोत्रे यांनी आपुलकीने संपूर्ण मतदारसंघासह समस्या संघटनात्मक बाबी परिवारा बाबत पदाधिकाऱ्यांबाबत चर्चा करून मुख्यमंत्र्यांनी सुखद अनुभव दिला अशा शब्दात नामदार देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्राच्या पालकत्व भूमिकेतून कार्य करीत आहे सिद्ध होत आहे असेही ते म्हणाले.

### मतदार यादीत पुन्हा आलेली नावे वगळा

**अकोला :** अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघांमध्ये मोठ्या प्रमाणात २४ हजार पेक्षा जास्त मतदारांची नावे दोन दोन तीन वेळा असून ती काढण्यात यावी अशी मागणी तसेच बाळापूर शहरातील चौदाशे नावे अकोला शहरांमध्ये असून ते काढण्यात यावे यासाठी सात नंबरचा फॉर्म भरण्यात देण्यात आला असून तो काढण्यात यावा, अशी मागणी आज विजय अग्रवाल यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने निवडणूक अधिकारी तसेच जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन यासंदर्भात राज्य निवडणूक आयोग व केंद्रीय निवडणूक आयोगाकडे मागणी करून बिहारच्या धरतीवर ही नावे काढण्यात यावी अशी मागणी केली आहे. बाळापुर भागातील नावे असल्यामुळे ती त्वरित काढण्यात यावी यासंदर्भात पुरावे सुद्धा देण्यात आला आहे. २४ हजार मते दोन वेळा असून ती काढण्यात यावी अशी ही मागणी त्यांनी केली विजय अग्रवाल यांच्या नेतृत्वाखाली भाजपा शिष्ट मंडळाने मतदार यादीच्या अवलोकन करून पूर्ण पुरावे निशा यादी निवडणूक आयोगाकडे प्रस्तुत केली व त्या संदर्भात केंद्रीय निवडणूक आयोग तसेच राज्य निवडणूक आयोगाकडे सुद्धा तक्रार करण्यात आली आहे खासदार अनुप धोत्रे यांच्या माध्यमातून सुद्धा तक्रारी करण्यात आल्या. अकोला महानगरपालिका निवडणुकीच्या आधी यादी दुरुस्त करण्यात यावी अशी मागणी केली असून विजय अग्रवाल यांच्या नेतृत्वाखाली आज निवेदन देण्यात आले आहे यासंदर्भात केंद्रीय निवडणूक आयोगाकडे ही तक्रार पाठवण्यात येणार असून त्यांच्या आदेशानुसार कारवाई करण्यात येईल व १४ ००ची नावे कमी करण्यात येईल. असे अभिवचन देण्यात आले विजय अग्रवाल यांनी जिल्हाधिकारी अजित कुंभार, निवडणूक अधिकारी वाघमारे यांना निवेदन देण्यात आले यावेळी जयंत मसने, संजय बडोणे, अमोल गीते, तुषार भिरड, संदीप गावंडे, पवन महल्ले महाले नितीन राऊत, रमेश करिहार, राजेंद्र गिरी, निलेश निनोरे, दिलीप मिश्रा, अमोल मोहकार , अमोल ,गोगे,, विजय चौधरी विजय ठाकूर, प्रामुख्याने उपस्थित होते

# ५० किलो गांजासह दोन आरोपींना अटक



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**गडचिरोली, दि. २५ :** गडचिरोली जिल्ह्यात अंमली पदार्थांची विक्री करण्याच्या तयारीत असलेल्या दोन आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे. कुरखेडा तालुक्यातील दोन वेगवेगळ्या गावांमध्ये छापे टाकून, त्यांच्याकडून ५०.५ किलो गांजा जप्त करण्यात आला. जप्त केलेल्या मालाची किंमत ५ लाख रुपयांपेक्षा जास्त असून, दोन्ही आरोपींना तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

जिल्ह्यातील अवैध अंमली पदार्थ तस्करीवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांनी दिले होते. या पार्श्वभूमीवर, स्थानिक गुन्हे शाखेने गुरुवारी (दि. २४) कुरखेडा तालुक्यात ही धडक कारवाई केली. गोपनीय माहितीच्या आधारे, पोलीस निरीक्षक अरुण फेगडे यांच्या नेतृत्वातील पथकाने पहिल्यांदा धनेगाव येथे छापा टाकला. त्यानंतर कारवाई सुरू असतानाच मिळालेल्या दुसऱ्या माहितीवरून कातलवाडा येथेही छापा मारण्यात आला. या दोन्ही आरोपींविरुद्ध पुराडा पोलीस ठाण्यात आज (दि. २५) अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास मालेवाडा पोलीस मदत केंद्राचे पोलीस उपनिरीक्षक आकाश नाईकवाडे करत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक नीलोत्पल, अपर पोलीस अधीक्षक (अभियान) एम. रमेश, अपर पोलीस अधीक्षक (प्राणहिता) सत्य साई कार्तिक, अपर पोलीस अधीक्षक (प्रशासन) गोकुल राज जी. आणि उपविभागीय पोलीस अधिकारी रवींद्र भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या पथकात सपोनि. समाधान दौड, सपोनि. भगतसिंग दुलत, मपोउपनि. सरिता मरकाम, तसेच चौधरी, गरफडे, गोंगले, चव्हान, कोडापे, दुधबडे, पंचफुलीवार, लोणारे आणि छायाचित्रकार देवेंद्र पिदुरकर यांचा समावेश होता.

### धनेगावात ४० किलो गांजा जप्त

स्थानिक गुन्हे शाखेला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे, धनेगाव येथील कालिदास पांडुरंग मोहुर्ले (४०) याच्या घरी छापा टाकण्यात आला. पंचासमक्ष घराची झडती घेतली असता, दोन पिशव्यांमध्ये ४०.८२५ किलो गांजा आढळून आला, ज्याची किंमत ४ लाख ८ हजार २५० रुपये आहे. विक्री करण्याच्या उद्देशाने हा साठा केल्याची कबुली आरोपीने दिली. त्याला तात्काळ ताब्यात घेण्यात आले.

### एका छाप्यादरम्यान दुसऱ्याचा सुगावा

धनेगाव येथे कारवाई सुरू असतानाच, पोलिसांना कातलवाडा येथील तारेश्वर भुपाल चांग (३४) याच्याविषयी नवी माहिती मिळाली. पथकाने तात्काळ त्याच्या वडिलांच्या घरी छापा टाकला. तेथे एका पिशवीत ९.६७८ किलो गांजा सापडला, ज्याची किंमत ९६,७८० रुपये आहे. त्यानेही विक्रीसाठी गांजा साठवल्याचे कबूल केले. दोन्ही आरोपींविरुद्ध पुराडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

## धारणी प्रकल्प कार्यालयाच्या हलगर्जीमुळे शेकडो आदिवासींचा हक्क डावलला!

। भारत वरठे ।

**धारणी, दि. २५ :** धारणी येथील आदिवासी प्रकल्प कार्यालयाचा गलथान कारभार समोर आला असून, २०२४-२५ च्या न्यूक्लिअस बजेट आराखड्याअंतर्गत मंजूर विविध योजना अद्याप कागदावरच आहेत. अर्ज मागवून सहा महिने उलटले, तरी ना लाभार्थ्यांच्या याद्या मंजूर झाल्या, ना योजनांची अंमलबजावणी झाली. यामुळे शेकडो आदिवासी लाभार्थी शासकीय मदतीपासून वंचित राहिले आहेत.

या निष्काळजी कारभारावर बिरसा क्रांती दलाचे संस्थापक अर्जुन युवनाते यांनी प्रखर शब्दांत नाराजी व्यक्त केली आहे. त्यांनी स्पष्ट सांगितले की, ''हे केवळ दुर्लक्ष नाही, तर आदिवासी समाजाचे थेट सामाजिक शोषण आहे. काही अधिकारी हेतुपुरस्सर दिरंगाई करत आहेत.'' प्रत्येक वर्षी आदिवासींच्या सामाजिक-आर्थिक विकासासाठी वैयक्तिक लाभ योजना, बचतगट, उद्योग मदत योजना राबविल्या जातात. परंतु धारणी प्रकल्प कार्यालयाने अर्ज घेतल्यानंतर सहा महिन्यांनंतरही यादी तयार केलेली नाही, ही गंभीर बाब आहे. विशेष म्हणजे, इतर सहा प्रकल्प कार्यालयांमध्ये योजनेची अंमलबजावणी सुरू झाली असून केवळ धारणी कार्यालयातच विलंब होत आहे.

याआधीही बिरसा क्रांती दलाने अप्पर आयुक्त कार्यालय व प्रकल्प अधिकाऱ्यांचे लक्ष वेधूनही कारवाई झाली नाही. पारधी विकास आराखड्याअंतर्गत लाभ मिळू शकतो, तर न्यूक्लिअस योजनांमध्ये दिरंगाई का, असा सवाल युवनाते यांनी उपस्थित केला.

या प्रकरणातील दोषी अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई करावी आणि २०२४-२५ साठी प्राप्त अर्जांवर तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी बिरसा क्रांती दलाने केली आहे. अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.

## लाच घेताना तांत्रिक अधिकारी व रोजगार सहायकास अटक

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**वाशीम, दि. २५ :** वडीलांच्या नावावर मंजूर झालेल्या विहिरीचे बांधकामाचे प्रमाणपत्र देण्यासाठी १५०० रुपयांचे लाच स्वीकारताना तांत्रिक अधिकारी व काजळंबा ग्रामपंचायतीचे रोजगार सहाय्यकास रंगेहात अटक करण्यात आली.सदर कारवाई वाशीम लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्यावतीने २५ जुलै रोजी वाशीम पंचायत समिती कार्यालय परिसरात करण्यात आली.

प्राप्त माहितीनुसार तालुक्यातील जांभरून परांडे येथील तक्रारदार आपल्या वडिलांच्या नावावर असलेल्या मंजूर विहिरीचे प्रमाणपत्र मागणीसाठी वाशीम पंचायत समितीमधील तांत्रिक अधिकारी मयूर अंबरलाल हुमने यांच्याकडे गेला असता, यावेळी सदर कामासाठी संबंधीत अधिकायांनी रोजगार सहाय्यकाकडे १५०० रुपये देण्याचे सांगितले. दरम्यान सदर घटनेबाबत तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दिली. सदर तक्रारीवरून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा कारवाई करून तांत्रिक अधिकारी मयूर अंबरलाल हुमने व रोजगार सहाय्यक ऋषिकेश उत्तम उगले यांना २५ जुलै रोजी लाच रक्कम स्वीकारताना अटक केली. सदर आरोपीविरुद्ध वाशीम शहर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला. सदर कारवाई अमरावती परीक्षेत्र लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस अधीक्षक मारूती जगताप, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन्द्र शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस निरीक्षक अलका गायकवाड, उपअधीक्षक जगदीश परदेशी,राहुल व्यवहारे, योगेश खोटे, विनोद अवगळे, रवींद्र घरत,नाविद शेख यांच्या पथकाने केली.

## राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) गटाच्या जिल्हा उपाध्यक्षपदी गणेश सावळे

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी




**चिखली, दि. २५ :** राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) गटाच्या बुलडाणा जिल्हाउपाध्यक्ष पदी गणेश सावळे यांची बुलडाणा जिल्हाअध्यक्षा रेखाताई खेडेकर यांनी २५ जुलै रोजी अधिकृत नियुक्ती केली. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) गटाची जिल्हा कार्यकारणी जिल्हाअध्यक्षा रेखाताई खेडेकर यांनी घोषित केली. यामध्ये डोंगरशेवलीचे माजी सरपंच गणेश सावळे यांची जिल्हाउपाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली.

गणेश सावळे यांनी या पूर्वी २००२ ते २००७ या कालावधीत डोंगरशेवली गावचे सरपंच त्या नंतर ३ वर्ष गावचे तंटामुक्ती अध्यक्ष असे पदे भूषविले आहे, त्यांच्या तंटा मुक्ती अध्यक्षाच्या कालखंडात त्यांनी डोंगरशेवली गावची १८ महिने अवैध धंदे पूर्ण बंद केले होते. त्यांच्या या सामाजिक आणि राजकीय कार्याची दखल घेऊन त्यांची जिल्हा उपाध्यक्ष पदी निवड करण्यात आल्याचे सांगितले जात आहे.

पक्ष बळकटीसाठी, संघटन मजबूत करण्यासाठी तसेच पक्षाची ध्येय व धोरणे सर्वसामान्यापर्यंत पोहोचवण्यासाठी गणेश सावळे यांची निवड करण्यात आली आहे.

पक्षाची विचारधारा ही जनमानसात पोहोचवण्यासाठी मी कटिबद्ध असून येणाऱ्या काळात पक्षाच्या गाव तिथे शाखा तयार करणार असल्याचे यावेळी बोलतांना गणेश सावळे यांनी सांगितले.

## अत्याचार प्रकरणात आरोपींना २० वर्षांची सक्तमजुरी

### वरुड सत्र न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अमरावती, दि. २५ :**वरुड पोलीस स्टेशन हद्दीतील सामूहिक बलात्कार प्रकरणात दोन आरोपींना जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाने २० वर्षांची सक्तमजुरी तसेच प्रत्येकी १० हजार रुपयांचा दंड अशी शिक्षा सुनावली आहे. दंड न भरल्यास प्रत्येकी सहा महिन्यांचा अतिरिक्त कारावास भोगावा लागणार आहे.

वरुड पोलिस ठाण्यात आरोपीविरुध्द भादंविच्या कलम ३७६ (डी) सह कलम ५ (जी), ६ बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंध अधिनियम अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला होता. याप्रकरणात पोलिसांनी तपास पूर्ण करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. न्यायालयात सरकारी अभियोक्तांनी साक्षीदारांची साक्ष नोंदविली. त्यानंतर दोन्ही पक्षाच्या युक्तीवादानंतर आरोपीचा दोष सिध्द झाला. या प्रकरणात पीडितेवर लहान वयात लैंगिक अत्याचार करण्यात आले होते.

प्रकरणाची गंभीरता लक्षात घेता न्यायालयाने आरोपींना कठोर शिक्षा सुनावली. रमेश जनार्दन नारनवरे (वय ३५, रा. खडका, ता. नरखेड, जि. नागपूर) व मंगेश मोरेश्वर देशभ्रतार (वय ३१, रा. आष्टी, जि. वर्धा) अशी आरोपींची नावे आहेत. याप्रकरणात तपास अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक सुबोध वंजारी यांनी तपास पूर्ण केला. सरकारी पक्षातर्फे सरकारी वकील ॲड. घोडेस्वार यांनी बाजु मांडली. कोर्ट पैरवी अधिकारी म्हणून महिला पोलीस हवालदार पूनम डहाके यांनी कामकाज पाहिले. या निकालामुळे परिसरात समाधान व्यक्त होत असून, पीडितेला न्याय मिळवून देण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांच्या कार्यक्षमतेचे कौतुक होत आहे.

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा वाढदिवस साजरा

### आरमोरीत राकाँतर्फे विद्यार्थ्यांना छत्री व नोटबुकचे वाटप

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**गडचिरोली, दि. २५ :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा वाढदिवस राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने आरमोरी येथे विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला.

माजी आमदार डॉ. रामकृष्ण मडावी यांच्या मार्गदर्शनात गरजू नागरिक आणि शालेय विद्यार्थ्यांना विविध वस्तूंसह छत्र्यांचेही वाटप करण्यात आले. या उपक्रमांतर्गत आरमोरी शहरातील काळागोटा, बाजारपेठ, शिवाजी चौक, इंदिरानगर डोंगरी, आझाद चौक या भागांमध्ये गरजू नागरिकांना छत्र्यांचे वाटप करण्यात आले. तसेच, तालुक्यातील कुलकुली, तुलतुली, मांगदा, कोसरी, देलनवाडी, देऊळगाव या ग्रामीण आणि आदिवासी भागांतही छत्री वाटप करण्यात आले. सोबतच, आरमोरी शहरातील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना नोटबुक आणि पेनचे वाटप करून त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्यात आले. यावेळी माजी आमदार डॉ. रामकृष्ण मडावी, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सह-विधानसभा अध्यक्ष सुनील नंदनवार, तालुका अध्यक्ष अमीन लालानी, जिल्हा नियोजन समितीच्या माजी सदस्या कल्पना तिजारे, महिला जिल्हा कार्याध्यक्षा वृषाली भोयर, माजी पंचायत समिती सभापती भजन मडकाम, सोशल मीडिया जिल्हा अध्यक्ष अक्षय बोरकर, युवा नेते आकाश मडावी, तालुका सरचिटणीस रामदास दहिकर, शहर सरचिटणीस राकेश बेहरे, शहर उपाध्यक्ष प्रफुल्ल राचमलवार, युवक तालुका उपाध्यक्ष प्रवीण पोटेकर, मोहित राऊत, नीलकंठ वाटगुरे, प्रकाश लेनगुरे, उल्हास बनपूरकर, राजू किरमे इत्यादी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# 'उपजीविका विकास कार्यक्रम' गडचिरोलीत राबविण्यात येणार

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस; तब्बल पाच हजार लाभार्थी कुटुंबांचे सक्षमीकरण

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**मुंबई/गडचिरोली, दि. २५ :** गडचिरोली जिल्ह्यातील आकांक्षित तालुक्यांच्या सक्षमीकरणासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रयत्नातून 'उपजीविका विकास कार्यक्रम' राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत ४९ गावांचा समावेश असून यात ॲक्सिस बँक फाउंडेशनचा सक्रिय सहभाग असणार आहे. एक जानेवारी २०२५ पासून हा प्रकल्प राबविण्यास सुरुवात करण्यात आली असून या उपक्रमासाठी आगामी तीन वर्षांसाठी २०.३४ कोटी रुपये इतकी तरतूद करण्यात आली आहे. या माध्यमातून पाच हजार लाभार्थी कुटुंबांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होईल.

गडचिरोली जिल्ह्यातील स्थानिकांचे जीवनमान उंचावणे आणि स्थानिकांना रोजगाराच्या संधी देण्यास शासन प्राधान्य देत आहे. शासनाच्या या धोरणाला प्रतिसाद देत ॲक्सिस बँक फाउंडेशनच्या सक्रिय सहभागातून गडचिरोलीत उपजीविका विकास कार्यक्रमांतर्गत काम सुरू झाले आहे. हवामानाशी सुसंगत शाश्वत शेतीला प्रोत्साहन देऊन, उपजिविकेत सुधारणा करणे, नागरिकांचे जीवनमान उंचावून समुदायाचे कल्याण साधणे, हे प्रमुख उद्दिष्ट्ये या प्रकल्पात पूर्ण करण्यात येणार आहे. यासाठी मुख्य उपक्रमांतर्गत शेती आधारित उपजीविका, नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन, शेतीवर उपजीविका हस्तक्षेप, सामूहिक उद्योजकता, आरोग्य आणि पोषण या बाबींवर लक्ष देण्यात येईल. ३० जून २०२५ पर्यंत या उपक्रमात दो हजार कुटुंबांची नोंदणी झाली आहे. एकूण ६६ बोडींचे गाळमुक्तीकरण करून त्यांच्या जलधारण क्षमतेत वाढ करण्यात आली आहे. बोडी आधारित शेती प्रणालीत माशांचे संगोपन, त्यावर कुक्कुटपालन आणि त्याच पाण्याचा वापर पिकांना दिला जातो. ही पद्धत शेती उत्पादकतेत वाढ करून ग्रामीण कुटुंबांसाठी उत्पन्नाचे विविध मार्ग उपलब्ध करून देते.

२०२७-२८ पर्यंत या प्रकल्पांद्वारे सहभागी कुटुंबांना लाभ होईल. त्यांच्या मूळ उत्पन्नाच्या तुलनेत उत्पन्न दुगुणी होईल. तसेच शेती उत्पादकता वाढवून उपजीविकेच्या संधी उपलब्ध होतील. शेतकरी गटांच्या माध्यमांतून सामूहिक खरेदी-विक्री व्यवस्था निर्माण होईल, तसेच पोषण आणि आरोग्य विषयक जनजागृतीमुळेजीवनमानात लक्षणीय सुधारणा होण्यासही सुरुवात होईल.

## नागरिकांचे रक्षण हाच जिल्हा प्रशासनाचा 'अजेंडा'

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**वाशीम, दि. २५ :** विकासकामांना गती, अपघातांना लगाम आणि नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य हाच अजेंडा घेऊन जिल्हा प्रशासन सज्ज झालं आहे. जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस यांच्या अध्यक्षतेखाली आज दि.२५ जुलै रोजी पार पडलेल्या जिल्हा समन्वय समितीच्या बैठकीत अनेक महत्वाच्या मुद्द्यांवर सखोल चर्चा झाली. विविध विभागांच्या कामाचा आढावा घेत, नियोजनबद्धतेने व गुणवत्तेने कामे पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस यांनी दिले.

जिल्ह्यातील विविध यंत्रणांचा प्रशासकीय समन्वय व जनहिताचा आढावा घेण्यासाठी जिल्हा समन्वय समितीची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयातील राजे वाकाटक सभागृहात पार पडली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस यांची उपस्थिती होती. यावेळी त्या बोलत होत्या. बैठकीस उपवनसंरक्षक अभिजित वायकोस, अप्पर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील,निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, रोहयो उपजिल्हाधिकारी कैलास देवरे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ अनिल कावरखे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ पी.एस.ठोंबरे, जिल्हा नियोजन अधिकारी राजेश सोनखासकर , उपजिल्हाधिकारी (भुसंपादन) दादासाहेब दराडे यांच्यासह इतर विभाग प्रमुखांची उपस्थिती होती. तसेच काही यंत्रणा प्रमुख दुरदृष्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. जिल्हाधिकारी पुढे म्हणाल्या, जिल्ह्यात मागील काही दिवसांपासून झालेल्या पावसामुळे अनेक भागांमध्ये पूरपरिस्थिती निर्माण झाली होती. याचबरोबर रस्त्यांची झालेली पडझड आणि वाढती अपघातांची संख्या, शेतकऱ्यांचं झालेलं नुकसान लक्षात घेता तात्काळ पंचनामे करून आवश्यक उपाययोजना कराव्यात असे निर्देश संबंधित यंत्रणेला दिले.

# दुखापतग्रस्त खेळाडूच्या जागी संघात अष्टपैलूचा समावेश!

## कसोटी मालिकेपूर्वी मोठा बदल

नवी दिल्ली, दि. २५ प्रतिनिधी

**न्यूझीलंड क्रिकेट संघ सध्या झिम्बाब्वेच्या दौऱ्यावर असून, दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेपूर्वी संघात एका महत्त्वपूर्ण अष्टपैलू खेळाडूचा समावेश करण्यात आला आहे. झिम्बाब्वेविरुद्ध ३० जुलैपासून पहिल्या कसोटी सामन्याला प्रारंभ होणार आहे.**

न्यूझीलंडचा संघ सध्या झिम्बाब्वेमध्ये टी-२० तिरंगी मालिका खेळत आहे. या मालिकेचा अंतिम सामना २६ जुलै रोजी हरारे येथे न्यूझीलंड आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात खेळवला जाईल. या सामन्यानंतर न्यूझीलंडचा संघ यजमान झिम्बाब्वेविरुद्ध दोन सामन्यांची कसोटी मालिका खेळेल. याची सुरुवात ३० जुलैपासून होणार आहे. या महत्त्वपूर्ण कसोटी मालिकेपूर्वी न्यूझीलंडच्या संघात



एक मोठा बदल पाहायला मिळाला आहे.

न्यूझीलंडच्या संघात अष्टपैलू खेळाडू मायकल ब्रेसवेल याचा समावेश करण्यात आला आहे. झिम्बाब्वेविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यात ब्रेसवेल दुखापतग्रस्त ग्लेन फिलिप्सची जागा घेईल. यापूर्वी ब्रेसवेलला किवी संघात स्थान देण्यात आले नव्हते, कारण कसोटी मालिकेदरम्यान तो 'द हंड्रेड' या स्पर्धेत खेळणार होता.

**मायकल ब्रेसवेल एक सक्षम पर्याय :** ब्लॅककॅप्सचे (न्यूझीलंड संघाचे टोपणनाव) मुख्य प्रशिक्षक रॉब वॉल्टर यांनी सांगितले की, ब्रेसवेल हा फिलिप्ससाठी एक अत्यंत सक्षम पर्याय आहे. वॉल्टर म्हणाले, 'ग्लेनच्या दुखापतीमुळे कसोटी संघात एक जागा रिक्त झाली आहे आणि मायकल हा त्यासाठी सर्वात योग्य पर्याय आहे. मायकलचा अनुभव आणि कौशल्य संघातील संतुलन पूर्वीप्रमाणेच राखण्यास मदत करेल.' त्यांनी पुढे सांगितले, 'तो टी-२० संघासोबत येथेच उपस्थित आहे आणि पहिल्या कसोटीसाठी त्याची उपलब्धता निश्चित आहे, त्यामुळे आम्ही त्याचा संघात समावेश करत आहोत. आम्ही पहिल्या कसोटीनंतर परिस्थितीचा आढावा घेऊ आणि त्यानंतर दुसऱ्या कसोटीसाठी त्याचा संघात समावेश करण्याबाबत निर्णय घेऊ.' विशेष म्हणजे, मायकल ब्रेसवेल पहिल्या कसोटी सामन्यानंतर झिम्बाब्वेहून थेट इंग्लंडला रवाना होईल आणि तेथे 'द हंड्रेड' स्पर्धेतील आपल्या पहिल्या सामन्यापूर्वी 'सदर्न ब्रेव्ह' संघात सामील होईल.

# भारताचा टॉपर ठरला रिषभ पंत!

## हिटमॅन रोहित शर्माचा विक्रम मोडला

नवी दिल्ली, दि. २५ प्रतिनिधी



इंग्लंड विरुद्धच्या मँचेस्टर कसोटी सामन्यातील दुसरा दिवसातील तीन पैकी दोन सत्रात भारी खेळ करत इंग्लंडने बाजी मारली. पण दिवसभराच्या खेळात सर्वाधिक चर्चेत राहिला तो रिषभ पंत. पहिल्या दिवसाच्या खेळात ३७ धावांवर रिटायर्ड हर्ट होऊन मैदानाबाहेर गेलेल्या पंतनं दुसऱ्या दिवसी उजव्या पायाच्या करंगळी जवळील हाड मोडले असताना मैदानात उतरुन अर्धशतकी खेळीसह अनेक विक्रम मोडित काढले. एका कसोटी मालिकेत सर्वाधिक ५ वेळा फिफ्टी प्लस धावसंख्येच्या रेकॉर्डसह इंग्लंडच्या मैदानात सर्वाधिक ९ वेळा हा डाव साधत त्याने धोनीचा विक्रम मोडला. एवढेच नाही तर आयसीसी वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप स्पर्धेत रोहित शर्माच्या विक्रमालाही त्याने सुरुंग लावला आहे.

उजव्या पायाच्या बोटा जवळ फॅक्चर असताना डावखुऱ्या युवा बॅटरनं मँचेस्टर कसोटी सामन्यातील पहिल्या डावात ७५ चेंडूत ५४ धावांची खेळी केली. त्याच्या या खेळीत ३ चौकारांसह २ षटकारांचा समावेश होता. या खेळीसह वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप स्पर्धेत तो भारताकडून सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरला आहे. याआधी हा विक्रम रोहित शर्माच्या नावे होता.

दौऱ्याआधी कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा करणारा रोहित शर्मा या यादीत २७१६ धावांसह दुसऱ्या क्रमांकावर आहे. ४० कसोटी सामन्यात त्याने या धावा केल्या आहेत. रिषभ पंतनं ३८ व्या कसोटी सामन्यातच रोहित शर्माला मागे टाकत टॉपला पोहचला आहे. मध्ये सर्वाधिक धावा करणाऱ्या भारतीय फलंदाजांच्या यादीत विराट कोहली २६१७ धावांसह तिसऱ्या तर भारतीय संघाचा विद्यमान कर्णधार शुबमन गिल २५१२ धावांसह चौथ्या क्रमांकावर आहे. जडेजाही या यादीत टॉप ५ मध्ये असून त्याने वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप स्पर्धेत २२३२ धावा केल्या आहेत. २०१८ मध्ये कसोटी पदार्पण केल्यापासून पंत टीम इंडियाचा प्रमुख भाग राहिला आहे. आतापर्यंत त्याने ४७ कसोटी सामन्यात ८ शतकाच्या मदतीने ३४२७ धावा केल्या आहेत.



# यश दयालच्या अडचणीत भर; आणखी एका मुलीवर बलात्काराचा आरोप

नवी दिल्ली, दि. २५ प्रतिनिधी

रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूचा वेगवान गोलंदाज यश दयालविरुद्ध आणखी एका मुलीने बलात्काराचा गुन्हा दाखल केला. आयपीएल २०२५ दरम्यान दयालने पीडित मुलीला क्रिकेटमध्ये करिअर घडवण्यास मदत करण्याचे आमिष दाखवून तिच्यावर वारंवार अत्याचार केल्याचा आरोप आहे. याप्रकरणी जयपूरच्या सांगानेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी पुढील तपासाला सुरुवात केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित मुलगी १७ वर्षांची आहे. क्रिकेट खेळताना पीडिताची यशशी ओळख झाली. त्यावेळी यशने तिला क्रिकेटमध्ये करिअर घडवण्यात मदत करण्याचे अश्वासन देऊन तिच्यावर बलात्कार केला. त्यानंतर आयपीएल २०२५ दरम्यान यशने तिला एका हॉटेलमध्ये बोलावले आणि तिच्यावर पुन्हा बलात्कार केला. परंतु, मानसिक आणि शारीरिक त्रास वाढल्याने पीडिताने पोलिसांत यश विरोधात तक्रार दिली. पीडिताचा जबाब



नोंदवून पोलिसांनी यशविरोधात पॉक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला. याप्रकरणात तो दोषी आढळल्यास त्याला किमान १० वर्षांचा शिक्षा होऊ शकते, जी जन्मठेपेपर्यंत वाढू शकते. यश दयाल याच्याविरुद्ध जुलैमध्ये एका महिलेचे लैंगिक शोषण केल्याच्या आरोपाखाली गाझियाबादमधील इंदिरापुरम पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. लग्नाचे आमिष दाखवून यशने पीडिते महिलेचे आर्थिक, मानसिक आणि शारीरिक शोषण केले, असा त्याच्यावर आरोप करण्यात आला.

# भारत-इंग्लंड यांच्यातील वनडे आणि टी-२० मालिकांची घोषणा

**मुंबई :** भारतीय क्रिकेट संघ सध्या इंग्लंडच्या दौऱ्यावर असून, तिथे पाच कसोटी सामन्यांची मालिका खेळली जात आहे. यापैकी तीन सामने झाले असून, चौथा सामना मँचेस्टर येथे सुरू आहे. ही मालिका जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेअंतर्गत खेळवली जात आहे. दरम्यान, आता दोन्ही देशांमध्ये एकदिवसीय आणि आंतरराष्ट्रीय टी-२० सामन्यांच्या मालिकेचीही घोषणा करण्यात आली आहे.

इंग्लंड आणि वेल्स क्रिकेट बोर्डाने पुढील वर्षी, म्हणजेच २०२६ च्या उन्हाळी हंगामातील सामन्यांचे वेळापत्रक जाहीर केले आहे. यानुसार इंग्लंडचा संघ न्यूझीलंड, पाकिस्तान आणि श्रीलंकेव्यतिरिक्त भारतीय संघाशीही दोन हात करेल. भारत आणि इंग्लंड यांच्यात पाच टी-२० सामन्यांची मालिका होणार असून, त्यानंतर तीन एकदिवसीय सामने खेळवले जातील. याचे सविस्तर वेळापत्रकही आता समोर आले आहे.

भारतीय संघ जवळपास संपूर्ण जुलै महिना इंग्लंडमध्येच वास्तव्यास असेल. भारत आणि इंग्लंड यांच्यातील पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेला १ जुलै २०२६ पासून सुरुवात होईल. त्यानंतर ४, ७ आणि ९ जुलै रोजी पुढील सामने खेळले जातील. मालिकेतील पाचवा आणि अखेरचा टी-२० सामना ११ जुलै रोजी होईल. दोन दिवसांच्या विश्रांतीनंतर एकदिवसीय मालिकेला प्रारंभ होईल. मालिकेतील पहिला सामना १४ जुलै, दुसरा सामना १६ जुलै, तर तिसरा आणि अंतिम एकदिवसीय सामना १८ जुलै रोजी खेळवला जाईल. यासह या दौऱ्याची सांगता होईल. ही एकंदरीत मोठी मालिका असून, यात एकूण ८ सामने खेळले जातील.

# म्हात्रे नावाचे वादळ इंग्लंडमध्ये घोंघावले!

## ३२८ चेंडूंत ३४० धावांचा कहर

**लंडन :** १९ वर्षांखालील भारतीय संघाचा कर्णधार आयुष म्हात्रेने इंग्लंडविरुद्धच्या दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेत उत्कृष्ट फलंदाजीचे प्रदर्शन केले. तो या मालिकेत केवळ भारताकडूनच नव्हे, तर दोन्ही संघांमधील सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरला. आयुषने इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या आणि दुसऱ्या, अशा दोन्ही कसोटी सामन्यांमध्ये शतक झळकावले.

आयुषच्या इंग्लंडविरुद्ध ३२८ चेंडूंत ३४० धावा

आयुष म्हात्रेने इंग्लंडविरुद्धच्या दोन कसोटी सामन्यांतील चार डावांमध्ये एकूण ३२८ चेंडूंचा सामना



करत ३४० धावा वसूल केल्या. या कामगिरीदरम्यान त्याची सरासरी ८५.०० तर स्ट्राइक रेट १०३.६५ इतका प्रभावी राहिला. या चार डावांमध्ये त्याने दोन शतके आणि एक अर्धशतक झळकावले. त्याची १२६ धावांची सर्वोत्तम खेळी दुसऱ्या कसोटी सामन्याच्या दुसऱ्या डावात साकारली. आयुषने या चार डावांमध्ये अनुक्रमे १०२, ३२, ८० आणि १२६ धावांची खेळी केली. या खेळींमध्ये त्याने ९ षटकार आणि ४६ चौकार लगावले.

इतर फलंदाजांची कामगिरी

इंग्लंडविरुद्धच्या या दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेत भारताकडून सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत विहान मल्होत्रा दुसऱ्या क्रमांकावर राहिला. त्याने चार डावांमध्ये एक शतक आणि दोन अर्धशतकांसह २७७ धावा केल्या.

याच मालिकेत भारताकडून सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांमध्ये अभिज्ञान कुंडू तिसऱ्या स्थानी राहिला. त्याने दोन सामन्यांतील चार डावांमध्ये दोन अर्धशतकांसह १६६ धावा केल्या. त्याची सर्वोत्तम धावसंख्या ९० होती. दरम्यान, वैभवने या मालिकेत निराशाजनक कामगिरी केली; त्याने एका अर्धशतकाच्या मदतीने केवळ ९० धावा केल्या, ज्यात ५६ ही त्याची सर्वोत्तम धावसंख्या होती.

# मराठी माणूस म्युच्युअल फंड गुंतवणुकीतही पुढे

**मुंबई :** सामाजिक, वैचारिक आणि आर्थिक आघाडीवर सर्वांपुढे असणाऱ्या मराठी माणसाने म्युच्युअल फंडासारख्या सूज्ञ गुंतवणुकीतही आघाडी राखली आहे. महाराष्ट्र राज्याने अग्रस्थान कायम राखताना सरलेल्या जून महिन्यातील देशातील म्युच्युअल फंडाच्या सरासरी व्यवस्थापनाखालील मालमत्तेत एकट्या राज्याचा ४०.६१ टक्के वाटा आहे.इक्रा ॲनालिटिक्स'च्या अहवालानुसार, जूनमध्ये देशांतर्गत म्युच्युअल फंड उद्योगाच्या सरासरी व्यवस्थापनाखालील मालमत्तेत (एएयूएम) नवी दिल्ली, गुजरात, कर्नाटक आणि पश्चिम बंगाल यांचे प्रत्येकी योगदान १० टक्क्यांपेक्षा कमी आहे. तर देशातील पहिल्या पाच राज्यांनी जूनमध्ये देशांतर्गत म्युच्युअल फंड उद्योगाच्या मालमत्तेत ६७.६५ टक्के वाटा राखला आहे.मुंबई महानगरी ही देशाची आर्थिक राजधानीच आहे, त्यामुळे म्युच्युअल फंडांच्या देशाच्या एकूण मालमत्तेत एकट्या मुंबईचा वाटा ३३.४४ टक्क्यांचा असणेही तसे नवलाचे नाही. पण मुंबईसह महाराष्ट्राचा वाटा तब्बल सात टक्क्यांहून अधिक भर घालणारा म्हणजे ४०.६ टक्क्यांवर जाणारा आहे. 'ॲम्फी' या म्युच्युअल फंड उद्योगाच्या संघटनेकडून उपलब्ध माहितीनुसार, राज्यात सांगलीमधून वार्षिक ४३.८ टक्के अशा सर्वाधिक दराने म्युच्युअल फंडात मार्च २०२५ पर्यंत ४,५७६ कोटी रुपये गुंतविले गेले आहेत, अमरावतीतील वार्षिक वाढीचा दर ४१.८ टक्के आणि एकूण गुंतवणूक ४,५३० कोटी रुपये, मुंबईनजीक मीरा रोडमधून वार्षिक ३७.७ टक्के वाढीसह ५,८७७ कोटी रुपये गुंतविले गेले आहेत. वाढीच्या दृष्टिकोनातून, नागालँडमध्ये सरलेल्या महिन्यांत एएयूएममध्ये सर्वात वेगवान ६२.४७ टक्के वाढ नोंदवली गेली. त्यानंतर लक्षद्वीप आणि लद्दाख या प्रदेशांतून गुंतवणुकीत अनुक्रमे १९.१८ टक्के आणि १८.१७ टक्के वाढ दिसून आली. वार्षिक आधारावर, नागालँडमधून गुंतवणुकीत सर्वाधिक १००.५७ टक्के वाढ झाली, त्यानंतर दादरा आणि नगर हवेलीचा क्रमांक लागतो, ज्यांच्या गुंतवणुकीत ५६.५२ टक्के वाढ झाली आहे.

# शेअर बाजारात घसरण; सेन्सेक्स ७२१ अंकांनी तर निफ्टीमध्ये २२५ अंकांची घट

मुंबई, दि. २५ प्रतिनिधी

सप्ताहाच्या अखेरच्या ट्रेडिंग दिवशी, म्हणजे शुक्रवार (२५ जुलै) रोजी भारतीय शेअर बाजारात मोठ्या घसरणीची नोंद झाली. मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक सेन्सेक्स ७२१ अंकांनी घसरून ८१४६३ वर बंद झाला, तर नॅशनल स्टॉक एक्स्चेंजचा निफ्टी २२५ अंकांनी घसरून २४८३७ वर स्थिरावला.

विदेशी गुंतवणूकदारांनी मोठ्या प्रमाणावर शेअर्स विकल्यामुळे बाजारावर नकारात्मक परिणाम झाला. गुंतवणूकदारांनी सध्या सावध राहणे गरजेचे आहे, कारण जागतिक आणि देशांतर्गत स्तरावर अस्थिरता कायम आहे.

**सेन्सेक्समध्ये केवळ एकाच शेअरमध्ये वाढ :** सेन्सेक्समधील एकूण ३० शेअरपैकी २९ शेअर्स घसरले, तर फक्त




एका शेअरमध्ये तेजी दिसून आली. बजाज फायनान्सचा शेअर तब्बल ४.७८ टक्क्यांनी घसरला. पावर ग्रिड, टेक महिंद्रा आणि बजाज फिनसर्व या कंपन्यांचे शेअर्सही १ टक्के ते २.६ टक्केपर्यंत घसरले.

**निफ्टीमध्ये ४३ शेअर्स घसरले :** निफ्टीमधील ५० शेअर्सपैकी ४३ शेअर्समध्ये घसरण, तर फक्त ७ शेअर्समध्ये वाढ नोंदवण्यात आली. मीडिया इंडेक्समध्ये सर्वाधिक २.६१ टक्के घसरण. सरकारी बँकिंग क्षेत्रात १.७० टक्के, मेटल क्षेत्रात १.६४ टक्के, मध्ये १.४२ टक्के आणि ऑटो क्षेत्रात १.२७ टक्के घसरण नोंदली गेली. केवळ फार्मा सेक्टर ०.५४ टक्के वाढीसह बंद झाला.

जागतिक बाजारात संमिश्र व्यवहार : जपानचा निक्केई ०.८८ टक्के घसरून ४१४५६ वर बंद. कोरियाचा कोस्पी ०.१८ टक्के चढून ३१९६ वर बंद. हॉन्गकॉन्गचा हँगसेंग १.०९ टक्के घसरून २५३८८ वर, तर चीनचा शांघाय कंपोजिट ०.३३ टक्क्यांनी घसरून ३५९४ वर बंद.

**एफआयआय आणि डीआयआय यांची हालचाल :** २४ जुलै रोजी विदेशी गुंतवणूकदारांनी () २,१३४ कोटी रुपयांचे शेअर्स विकले. त्याच दिवशी घरेलू गुंतवणूकदारांनी () २,६१७ कोटी रुपयांची खरेदी केली. जुलै महिन्यात आत्तापर्यंत ने एकूण २८,५२८.७० कोटींची विक्री केली आहे. तर ने ३७,६८७.३८ कोटींची खरेदी केली आहे. जून महिन्यात ने ७,४८८.९८ कोटींची खरेदी केली होती, तर ने ७२,६७३.९१ कोटींची खरेदी केली होती.

**गुरुवारीही बाजारात झालेली घसरण :** २४ जुलै रोजी म्हणजे गुरुवारी सेन्सेक्स ५४२ अंकांनी घसरून ८२,१८४ वर बंद झाला होता. निफ्टीमध्ये १५८ अंकांची घसरण झाली होती, तो २५,०६२ वर बंद झाला. त्या दिवशी सेन्सेक्समधील फक्त ५ शेअर्समध्ये वाढ, तर २५ शेअर्स घसरले होते. अमेरिकेतील २४ जुलैच्या व्यवहारात डाऊ जोन्स ०.७० टक्के वाढून ४४६९४ वर, नॅस्डॅक ०.१८ टक्के चढून २१०५८ वर आणि ५०० ०.७० टक्क्यांनी वाढून ६,३६३ वर बंद झाला.

# सेन्सेक्स ५४२ अंकांनी घसरून बंद; वज्ञसह शेअर्समध्ये विक्री!

**वॉशिंग्टन :** आयटी () आणि एफएमसीजी () शेअर्समधील जोरदार विक्रीमुळे भारतीय शेअर बाजार गुरुवारी (दि.२४ जुलै) घसरला. सेन्सेक्स ५४२ अंकांनी घसरून ८२,१८४ वर बंद झाला. तर निफ्टी ५० निर्देशांक १५७ अंकांच्या घसरणीसह २५,०६२ वर स्थिरावला. तर बँक शेअर्समध्ये तेजी दिसून आली.

सेन्सेक्सवर ट्रेंटचा शेअर्स ३.९ टक्के घसरला. टेक महिंद्राचा शेअही ३ टक्के खाली आला. बजाज फिनसर्व्ह, रिलायन्स, एचसीएल टेक, इन्फोसिस, कोटक बँक, आयटीसी, एनटीपीसी, एशियन पेंट्स हे शेअर्स १ ते १.५ टक्क्यांपर्यंत घसरले. तर दुसरीकडे इटरनलचा शेअर्स ३.४ टक्के वाढून बंद झाला. टाटा मोटर्स, सन फार्मा, टाटा स्टील, टायटन हे शेअर्सही वाढून बंद झाले.

सेक्टरलमध्ये निफ्टी एमएफसीजी निर्देशांक १.१ टक्के घसरला. यावर नेस्ले इंडियाचा शेअर्स ५.५ टक्के घसरून टॉप लूजर ठरला. निफ्टी आयटी २.२ टक्के घसरला. यावर शेअर्स ९ टक्के घसरला. तर पर्सिस्टंटचा शेअर्स ७.६ टक्के, टेक महिंद्राचा शेअर्स ३.२ टक्के घसरला.

कमकुवत कमाई आणि सावध जागतिक संकेतांचे पडसाद आज शेअर बाजारात दिसून आले. भारत आणि ब्रिटन यांच्यातील मुक्त व्यापार कराराबद्दलच्या आशावाददेखील बाजारातील उत्साह वाढवू शकला नसल्याचे विश्लेषकांचे म्हणणे आहे. विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांची विक्रीही बाजारातील घसरणीसाठी कारणीभूत ठरली आहे. विदेशी गुंतवणूकदारांनी गुरुवारी एका दिवशी ४,२०९ कोटी रुपयांच्या शेअर्सची विक्री केली. यामुळे विशेषतः लॉर्जकॅप शेअर्सवर दबाव दिसून आला. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या दरात वाढ झाली आहे. ब्रेंट क्रूडचा दर ०.३ टक्के वाढून प्रति बॅरल ६८.७२ डॉलरवर पोहोचला आहे.

# दरडोई उत्पन्नाच्या बाबतीत देशातील १० अग्रणी राज्ये; २०१४ नंतर महाराष्ट्राची मात्र झाली मोठी पिछेहाट

वॉशिंग्टन, दि. २५ प्रतिनिधी

चालू आर्थिक वर्षात भारताचे दरडोई उत्पन्न १,१४,७१० रुपये झाले आहे. अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी यांनी लोकसभेत यासंबंधी माहिती दिली. २०१४-१५ मध्ये स्थिर किमतींवर दरडोई निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न (एनएनआय) ७२,८०५ रुपये होते. गेल्या दशकात ४१,९०५ रुपयांनी वाढ झाली आहे. राज्यमंत्री पंकज चौधरी यांनी आपल्या उत्तरात म्हटले की, राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालय () ने जाहीर केलेल्या च्या तात्पुरत्या अंदाजानुसार, २०२४-२५ साठी स्थिर किमतींवर दरडोई निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न () १,१४,७१० रुपये आहे. दहा वर्षांपूर्वी हेच प्रमाण ७२,८०५ रुपये एवढे होते.

**'सबका साथ, सबका विकास'मुळे शक्य :** भारताच्या अनेक राज्यांचे आणि केंद्रशासित प्रदेशांमध्येही दरडोई उत्पन्नामध्ये वाढ झाली आहे, असेही त्यांनी सांगितले. सरकारने 'सबका साथ, सबका विकास' हे धोरण अवलंबले असून यामाध्यमातून सर्वसमावेशक विकासाला प्राधान्य देण्यात येत आहे. गरीबी कमी करण्यासाठी आणि समाजातील आर्थिक असमानता घालविण्यासाठी सरकारने विविध योजना आखल्या असल्याचीही माहिती त्यांनी दिली. या माध्यमातून देशभरातील वंचित घटकांना चांगल्या दर्जाचे जीवनमान प्रदान करण्यात सरकार प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले.

संसदेत सादर केलेल्या आकडेवारीनुसार, देशातील सर्वाधिक दरडोई उत्पन्न असलेल्या राज्यांमध्ये कर्नाटकचा प्रथम क्रमांक लागतो. कर्नाटकचे दरडोई उत्पन्न २,०४,६०५ रुपये इतके आहे. त्याखालोखाल तमिळनाडू १,९६,३०९ रुपये, हरियाणा १,९४,२८५ रुपये, तेलंगणा १,८७,९१२ रुपये आणि पाचव्या क्रमांकावर १,७६,६७८ रुपयांच्या दरडोई उत्पन्नासह महाराष्ट्राचा क्रमांक लागतो.

**महाराष्ट्राची पिछेहाट :** २०१३-१४ साली महाराष्ट्र सर्वाधिक दरडोई उत्पन्नाच्या यादीत हरियाणा नंतर दुसऱ्या स्थानावर होता. त्यावेळी महाराष्ट्राचे दरडोई उत्पन्न १,०९,५९७ इतके होते. तर दुसऱ्या वर्षी त्यात वाढ होऊन दरडोई उत्पन्न १,१५,०५८ रुपयांवर पोहोचले होते. २०१४-१५ साली कर्नाटकचे दरडोई उत्पन्न १,०५,६९७ रुपये, तमिळनाडूचे १,०७,११७ रुपये आणि तेलंगणाचे १,०१,४२४ रुपये इतके उत्पन्न होते. महाराष्ट्राच्या मागे असलेली ही तीनही राज्य आता पुढे गेली आहेत. महाराष्ट्राची मात्र म्हणावी तशी आर्थिक प्रगती आकडेवारीनुसार तरी झालेली दिसत नाही.

# निवडणूक यंत्रणांचा आयुक्तांतर्फे आढावा

## राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारेंची उपस्थिती, मनुष्यबळ नियुक्तीला प्राधान्य देण्याची सूचना

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २५ : जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच महानगर पालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकीत मतदारांना मतदानाचा हक्क सूलभपणे बजावता यावा. तसेच निवडणूक प्रकिया पारदर्शक व निर्भयपणे पार पाडण्यासाठी आवश्यक नियोजन करण्याच्या सूचना राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी यंत्रणांना दिल्या. यावेळी मनुष्यबळ, मतदानयंत्र व मतदान केंद्रनिहाय आढावा घेण्यात आला.**



नागपूर विभागात चार जिल्हा परिषद, ५५ नगर परिषद व नगर पंचायतींची सार्वत्रिक निवडणूक प्रस्तावित आहे. नागपूर विभागातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पूर्वतयारीचा आढावाप्रसंगी ते बोलत होते. राज्य निवडणूक आयोगाचे सचिव सुरेश काकाणी, विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिदरी, नागपूर विभागातील सर्व जिल्हाधिकारी, नागपूर व चंद्रपूर महानगरपालिका आयुक्त, जिल्हा उपनिवडणूक अधिकारी तसेच निवडणूसंबंधी यंत्रणांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. नागपूर विभागातील नागपूर, वर्धा, चंद्रपूर व गडचिरोली जिल्हा परिषद, ५५ नगर परिषद व नगर पंचायतींची सार्वत्रिक निवडणूक तसेच नागपूर व चंद्रपूर महानगर पालिका सार्वत्रिक निवडणूक प्रस्तावित आहे निवडणुकीसाठी आवश्यक मनुष्यबळ, इलेक्ट्रॉनिक्स मतदान यंत्र, एकूण मतदारांची संख्या त्यानुसार केंद्रांची रचना करताना मतदारांना सुलभपणे मतदान करता यावे, यादृष्टीने मतदान यादी तयार करण्यास प्राधान्य द्यावे, असे दिनेश वाघमारे यांनी नमूद केले. विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिदरी म्हणाल्या, की जिल्हा परिषदेसाठी १ जुलै २०२५ च्या मतदार यादीनुसार ४० लाख २३ हजार २९ मतदार असून, ६ हजार ४४१ मतदान केंद्र प्रस्तावित करण्यात आली आहेत. मतदानासाठी ७ हजार २८० कंट्रोल युनिट व १६ हजार २८८ बॅलेट युनिटची आवश्यकता आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ५५ नगर परिषद व नगर पंचायतीमध्ये १८ लाख १२ हजार १६७ मतदार आहेत. यासाठी २ हजार ३७८ केंद्र राहतील. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी जिल्हा प्रशासनाकडून निवडणूक पूर्वतयारीला सुरुवात करण्यात आली आहे. यावेळी जिल्हाधिकारी यांनी जिल्हानिहाय सादरीकरण करून स्थानिक स्वराज्य संस्थांचे निवडणुकीसाठी करण्यात येत असलेल्या पूर्वतयारीचे सादरीकरण केले.

### नागपुरात ३,१५० मतदान केंद्र

**नागपूर महानगर पालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी १ जुलै २०२५ च्या यादीनुसार २४ लाख ८४ हजार २५० मतदार संख्या असून, यासाठी ३ हजार १५० मतदान केंद्र प्रस्तावित आहे. केंद्रांवर आवश्यक सुविधा उपलब्धतेसाठी उपाययोजना करण्याला प्राधान्य देण्यात आले आहे. मतदानाची प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडण्यासाठी मतदान यंत्राची उपलब्धता तसेच आवश्यक मनुष्यबळ नियुक्त करण्याला प्राधान्य असल्याचे महानगर पालिका आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी सांगितले.**

## कागदपत्रे जमा करण्याचे आवाहन

**नागपूर, दि. २५ :** महाराष्ट्र शासनाव्दारे विशेष सहाय्य योजनेअंतर्गत राज्य पुरस्कृत संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना या वैयक्तीक लाभाच्या योजना नागपूर शहर मनपा क्षेत्रामध्ये राबविण्यात येत आहे. अशा लाभार्थ्यांना सुचित करण्यात येते की. यापूढे मिळणारे अनुदान हे फक्त डि.बि.टी. प्रणालीव्दारेच पाठविण्याबाबत कळविले आहे. तसेच नागपूर महानगरपालिका येथे शिबीर आयोजित करुन सुद्धा ब-याच लाभार्थींनी आजपावेतो मंजुरी आदेश टोकन, आधार कार्ड, बँक पास बुक, मोबाईल क्रमांक, विधवांसाठी पतीचे मृत्युचा दाखला इतर बिमारीसाठी वैद्यकीय प्रमाणपत्र व दिव्यांग लाभार्थी प्रमाणपत्र जमा केलेले नाही तरी आपण तात्काळ आपले जवळचे मनपा झोन कार्यालय निहाय नियुक्त तलाठी यांचेकडे किंवा बचत भवन जिल्हाधिकारी कार्यालय येथे दिनांक २८ जुलै ते १६ ऑगस्टपर्यंत कागदपत्र जमा करावे.

## थोडक्यात

### गृहपालाविरुद्ध कारवाई

**नागपूर :** इतर मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह आयसीचौक हिंगणा रोड, नागपूर या वसतिगृहात मुलीचा विनयभंग व चोरीबाबत घडलेल्या घटनेच्या अनुषंगाने चौकशी करून संबंधित वसतिगृहाच्या गृहपाल व पहारेकरी यांना कंत्राटी सेवेतून मुक्त करण्यात आलेले आहे. अशा घटना भविष्यात टाळण्यासाठी विभागाकडून सर्व वसतिगृहांच्या सुरक्षिताबाबत आढावा घेवून आवश्यक त्या सर्व उपाययोजना इतर मागास बहुजन कल्याण विभागाकडून करण्यात येत असल्याचे इतर मागास बहुजन कल्याण (प्रादेशिक) विभाग नागपूरचे प्रादेशिक उपसंचालक विजय वाकुलकर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

### लेखी निवेदन सादर करा

**नागपूर :** राष्ट्रीय विश्वस्त अधिनियम १९९९ अंतर्गत दिव्यांग व्यक्तींना कायदेशीर पालकत्वासाठी स्थानिकस्तर समितीपुढे १० पालकांचे अर्ज प्राप्त झाले आहेत. या यादीतील पालकत्व घेणाऱ्याचे नाव व मतिमंद पाल्यांच्या नावांची यादी यांच्या परिवारातील आप्त-स्वकीय, नातेवाईकांचे वाद, हरकती, तक्रारी वा आक्षेप असल्यास आक्षेपकर्त्यांनी आठवडाभरात जिल्हा परिषद नागपूर येथील जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी यांच्या कार्यालयात प्रत्यक्ष भेटीत हरकतीसाठी अर्ज सादर करावेत. जिल्हा परिषद येथील जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी कार्यालयाच्या नोटिस बोर्डवर तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नोटिस बोर्डवर पालकत्वासाठी अर्ज करणाऱ्या १० अर्जदारांच्या नावांची यादी लावण्यात आली आहे. अधिक माहितीसाठी दूरध्वनी क्रमांक ०७१२-२५६४३२४ यावर संपर्क साधावा.

### शेतकऱ्यांची नोंदणी करावी

**नागपूर :** नागपूर जिल्ह्यात सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजनेला शेतकऱ्यांचा प्रतिसाद कमी असल्याने जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी प्रशासनाला धारेवर धरले. शुक्रवारी (दि. २५) आयोजित आढावा बैठकीत त्यांनी नोंदणी वाढवण्यासाठी अधिकाऱ्यांना जबाबदारीने काम करण्याचे निर्देश दिले. कृषी विभाग, बँका व विमा कंपनीने गावोगावी जाऊन शेतकऱ्यांशी थेट संवाद साधावा, असे ते म्हणाले. तसेच प्रत्येक सहायक कृषी अधिकाऱ्याला पुढील सहा दिवसांत ३०० शेतकऱ्यांच्या नोंदणीचे कडक लक्षांक देण्यात आले आहे. विमा कंपनीने तात्काळ तालुका कार्यालये स्थापन करावीत, असेही त्यांनी बजावले. यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रवींद्र मनोहरे हे देखील उपस्थित होते.

## CAPTION येथे धावतात 'यम'....



**नागपूर : मानेवाडा चौक हा रिंगरोडवरील अतिशय महत्त्वाचा चौक़ आता तो अतिशय धोकादायक बनल्याचे दिसून येते हा चौक 'एक्स' आकारात असल्याने वाहने तिरप्या दिशेत धावत असतात याशिवाय चौकाच्या दोन बाजू (रस्ते) अरुंद आहेत काही अतिशय बेजबाबदार वाहनचालक 'यमा'च्या रुपात आपली वाहने दामटवत असतात सध्या याठिकाणी उड्डाणपुलाचे बांधकाम सुरू असल्याने वाहनधारक वा पादचाऱ्यांच्या जीवाला सातत्याने धोका असतो.**

## एड्डसन फाऊंडेशनतर्फे वृक्षारोपण

**नागपूर, दि. २५ :** एड्डसन फाऊंडेशनच्या वतीने वृक्षसंवर्धन दिनानिमित्त भय्याजी पांढरीपांडे नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सोशल वर्क महाविद्यालय येथे वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमात प्राचार्य डॉ. सुनिल कोडापे यांनी विद्यार्थ्यांना वृक्षसंवर्धनाचे महत्त्व पटवून दिले. तसेच, विविध वृक्ष लागवडीच्या उपक्रमाची माहिती दिली. एड्डसन फाऊंडेशनचे संचालक डॉ. निलेश काळे यांनी वृक्षरोपणासह वृक्षसंवर्धन नितांत गरजेचे असून, जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी चळवळीत सहभाग घ्यावा, असे आवाहन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राध्यापक कमलाकर ढबाले, जीवन वागदे, मोहन धापोडकर यांच्यासह महाविद्यालयीन विद्यार्थी उपस्थित होते.

## तलाठी, ग्रामसेवकांवर 'जिओ-फेन्सिंग'चा वॉच

### जिल्हाधिकाऱ्यांनी गावातच समस्या सोडविण्यास बजावले

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २५ :** जिल्हा प्रशासनाकडून तलाठी, ग्रामसेवक, कृषी सेवक यांच्या गावातील उपस्थितीबाबत जिओ फेन्सिंगद्वारे खातरजमा

होणार आहे गावकऱ्यांच्या विविध समस्या गावपातळीवरच सोडविण्यात याव्यात, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी दिले आहेत. लोकाभिमुख प्रशासनाच्या दृष्टीने दर बुधवारी समाधान दिवस, मंगळवारी शिबीर व इतर उपक्रम तालुका पातळीवर घेतल्या जात आहेत. प्रत्येक तहसीलदाराने पाच गावांना भेटी दिल्या पाहिजेत. या भेटीच्या वेळी तालुक्यातील सर्व विभाग प्रमुख उपस्थित राहून नागरिकांच्या ज्या



काही तक्रारी असतील त्याचे निराकरण तेथेच करतील, असे त्यांनी तालुका अधिकाऱ्यांना बजावून सांगितले. ज्या गावात तहसीलदार जाणार असतील, त्यासंबंधीची माहिती जाण्यापूर्वी कळविणे अपेक्षित आहे. याबाबत प्रत्येक तहसील कार्यालयाची तपासणी करू, असेही त्यांनी स्पष्ट केले. प्रत्येक तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहाय्यक, मंडळ अधिकारी यांनी त्यांना नेमून दिलेल्या गावात उपस्थित असलेच पाहिजे. याबाबत जिओ फेन्सिंगद्वारे काटेकोर खातरजमा करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**पट्टे वाटप मोहीम**

सर्व सामान्यांना त्यांच्या हक्काचे घर मिळावे, यासाठी पट्टे वाटप मोहिमेस अधिक गती मिळावी यासाठी पात्र व्यक्तींचे सर्वेक्षण करून, जे पात्र ठरतील त्यांच्याबाबत तत्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी यांनी दिले.

## प्रहार मिलिटरी स्कूलमध्ये 'ऑपरेशन सिंदूर' कार्यक्रम

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २५ :** कारगिल विजय सप्ताहानिमित्ताने प्रहार मिलिटरी स्कूल, रवी नगर येथे 'ऑपरेशन सिंदूर'या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, शौर्य आणि लष्करी जाणीव उदयासाठी हा उपक्रम अत्यंत प्रेरणादायी ठरला.

कार्यक्रमाला ब्रिगेडियर सुहास कुलकर्णी (निवृत्त) यांची विशेष उपस्थिती होती अध्यक्षस्थानी प्रहार मिलिटरी शाळेचे उपाध्यक्ष भालचंद्र कागभट, एमबीए विभागाचे प्रमुख श्री भावे, मुख्याध्यापिका वंदना कुलकर्णी होते मान्यवरांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना शिस्त, देशप्रेम आणि जबाबदारीची जाणीव करून दिली. प्रमुख आकर्षण ब्रिगेडियर सुहास




कुलकर्णी (निवृत्त) यांनी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधला 'ऑपरेशन सिंदूर'सारख्या लष्करी मोहिमांचा संदर्भ देत भारताच्या सर्जिकल क्षमतांबद्दल विद्यार्थ्यांना अत्यंत प्रभावीपणे मार्गदर्शन केले. त्यांच्या अनुभवसमृद्ध संवादातून विद्यार्थ्यांच्या मनात देशसेवेची प्रेरणा जागी झाली. विद्यार्थ्यांनी उपस्थित मान्यवरांना प्रश्न विचारून संवाद अधिक समृद्ध केला.कारगिल विजय सप्ताहाच्या निमित्ताने आयोजित केलेला 'ऑपरेशन सिंदूर' कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी माहितीपर जीवनमूल्यांची प्रेरणा देणारा ठरल्याची भावना उपस्थितांनी दिली.

## शहरातील ऑटोरिक्षा चालक, संघटनांसाठी कार्यशाळा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २५ :** वाहतूक नियमांचे पालन, सेवा सुधारणा आणि व्यवसायाच्या वाढीसाठी मार्गदर्शन करण्याच्या उद्देशाने शुक्रवारी वाहतूक चिल्ड्रन पार्क येथे ऑटो-रिक्षाचालक आणि संघटनांसाठी एका विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

वाहतूक विभागाचे पोलिस उप आयुक्त लोहीत मतानी, सहाय्यक पोलिस आयुक्त माधुरी बाविस्कर यांच्या उपस्थितीत कार्यशाळा पार पडली. वाहतूक विभागाचे पोलिस निरीक्षक श्री. कदम, पुरी, मिराशे, खांदाळे, पोरे, पांडे, वासेकर, मोहनकर आणि पोलिस निरीक्षक श्रीमती



देशमुख उपस्थित होते. कार्यशाळेत ऑटो-रिक्षा चालकांना भेडसावणाऱ्या अडचणी समजून घेण्यात आल्या. वाहतूक नियमांचे काटेकोरपणे पालन करणे, गणवेश परिधान करणे, प्रवाशांना चांगल्या सेवा पुरवण्याबद्दल समजावून सांगण्यात आले. ई-रिक्षा आणि कॅबसंबंधी वाढत्या स्पर्धेच्या युगात उत्कृष्ट सेवा देऊन आपली प्रतिमा सुधारून योग्य मार्गाने व्यवसाय कसा वाढवावा, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. पोलिस उप आयुक्त लोहीत मतानी यांनी ऑटोरिक्षा आणि संघटना पदाधिकाऱ्यांचे म्हणणे ऐकून घेत त्यांच्या अडचणी दूर करण्याचे आश्वासन दिले. रस्ता सुरक्षा दलाचे अतुल आगरकर यांनी वाहतूक नियमांबद्दल विस्तृत मार्गदर्शन केले.

## उपजीविका पुलक मंच परिवारातर्फे वृक्षारोपण

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २५ :** मानेवाडा बेसा मार्गावरील मुद्रा नगरात उपजीविका पुलक मंच परिवार आणि श्री रुद्रावतार हनुमान मंदिर कमिटीच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण करण्यात आले.

कार्यक्रमाला कबाड से जुगाडचे संचालक मनोज बंड, पुलक मंच परिवारचे कार्यवाहक सचिन नखाते, माजी नगरसेविका मंगला खेकरे, रुद्रावतार संकटमोचन हनुमान मंदिर कमिटीचे अध्यक्ष अरुण घोलपे, दाक्षिणेश्वरी दुर्गा मंदिराचे अध्यक्ष श्री. त्रिपाठी, उपजीविकाचे अध्यक्ष धीरज गलगले यांची प्रमुख उपस्थिती होती.धीरज गलगले यांनी वृक्षारोपणाचे महत्त्व प्रतिपादित



केले तसेच, उपजीविकाच्या विविध उद्देशांची माहिती दिली. कार्यक्रमाचे संचालन मनीषा गलगले, प्रास्ताविक संजय मार्कंडे यांनी केले विलास कडू यांनी उपस्थिांचे आभार मानले. संस्थेचे उपाध्यक्ष जयंत तुळणकर, स्वप्नील बाराहाते, मनीष पाठराबे, अतिष गोरे, अनिल जवाडे, करुणा गलगले, माधवी तुळणकर यांनी विशेष सहकार्य केले.

# सकारात्मक दृष्टिकोन ठेवल्यास अपेक्षित ध्येय गाठता येते

## प्रशांत वावगे यांचे प्रतिपादन, 'यशवंत' आयएएस अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना दिला कानमंत्र

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २५ : विद्यार्थ्यांनी आपला दृष्टिकोन सकारात्मक ठेवला तर अपेक्षित ध्येय गाठता येते. त्यासाठी त्यांनी आत्मविश्वास वाढविणे गरजेचे आहे. आपले ज्ञान मांडण्याचे कौशल्य आपल्या ठिकाणी निर्माण केले पाहिजे, असे प्रतिपादन 'महाज्योती'चे प्र. महाव्यवस्थापक प्रशांत वावगे यांनी केले.**



नागपूर येथील श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या धनवटे नॅशनल कॉलेजमध्ये आयोजित मराठा भिशी ग्रुप आयोजित विद्यार्थ्यांच्या सत्कार प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मिशन आयएएसचे संचालक प्रा. डॉ. नरेशचंद्र काठोळे होते. नागपूर मराठा भिशी ग्रुपचे अध्यक्ष डॉ. प्रदीप घोरपडे, नागपूर विद्यापीठाचे संचालक संभाजी भोसले, मराठा विद्या प्रसारक समाजाचे माजी अध्यक्ष तथा नागपूरचे राजे श्री संग्रामसिंग महाराज भोसले,डॉ. मोहनदास गाडबैल आदी उपस्थित होते. प्रारंभी दीप प्रज्वलनानंतर आयएएस म्हणून निवडण्यात आलेले श्रीरंग कावरे, अपूर्व बालपांडे, भाग्यश्री नैकळे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. चंद्रूशेखर आसोले, शंकर पत्रे संजय काशिवार, मुनीराम कुथे, श्रीकांत कुकडे, श्रीधर जाधव, कुणाल देशमुख, हर्ष यादव, अभिजीत मानकर, विलास वानखडे यांनी संवादात सहभाग घेतला याप्रसंगी शशिकला देविदास किरपाणे, प्रा.डॉ. काठोळे यांचा सन्मान करण्यात आला. देवरी, तुमसर, भंडारा, ब्रह्मपुरी, किनखेडा, काटोल, खामगाव, कारंजा येथील मिशन आयएएसचे पदाधिकारी व विद्यार्थी यांनी उपस्थिती लावली.प्रास्ताविक डॉ. प्रदीप घोरपडे, संचालन डॉ. हंबीरराव मोहिते यांनी केले. बाळासाहेब गायकवाड यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मराठा भिशी ग्रुपचे सर्वश्री गजेंद्र जाधव, हेमंत शिर्के, डॉ. श्रीकांत जाचक, प्रदीप कान्हेरे, सतीश मराठे, हेमंत भोसले, दिलीप मामुलवार, मनीष चवले, सुरेश वाघ, विठ्ठल जवळकर, महिला सदस्यांनी सहकार्य केले.

### यांचा सत्कार ...

**श्रीरंग कावरे, अपूर्व बालपांडे, भाग्यश्री नैकळे, सौरभ यावले यांच्यासह त्यांच्या आई-वडिलांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच, तेजस प्रकाश भोसले, अथर्व संभाजी भोसले, शांकरी किशोर जाधव या गुणवंतांचाही सत्कार करण्यात आला.**

## थकबाकीधारकांची मालमत्ता जप्त होणार

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २५ :** नागपूर महानगरपालिका अंतर्गत मौजा हुडकेश्वर (बु.) भागातील मालमत्ता कर न भरणाऱ्या थकबाकीधारकांवर मालमत्ता जप्तीची कारवाई केली जाणार आहे.

नागपूर महानगरपालिकेच्या हनुमान नगर क्षेत्रीय कार्यालयाच्या नियंत्रणातील कर निर्धारण वार्ड क्र. ७६ मौजा हुडकेश्वर (बु.) या परिसरातील मिळकतीवरील मालमत्ता कर थकबाकी वसूल करण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे प्रकरण ८ नियम ३९, ४० नुसार मौक्यावरील सूचना फलकावर मालमत्ता कर देयके चष्मा करण्यात आलेले आहे.मनपाद्वारे या मिळकतीचे मिळकतदार / सोसायटी मालक यांना सूचित करण्यात आले



आहे संबंधित मालमत्ताधारकांनी १५ दिवसांच्या आत मालमत्ता कराचा भरणा कार्यालयात करावा, अन्यथा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या अनुसूचिप्रकरण ८ च्या नियम ४५ पोटनियम (१) व (२) तसेच मनपा स्थायी आदेशातील तरतुदी अन्वये स्थावर / जंगम मालमत्तेचा ताबा घेवून मालमत्ता जप्त होईल तसेच, मालमत्ता विक्रीची कार्यवाही करण्यात येईल, अशी माहिती हनुमान झोनचे सहायक आयुक्त नरेंद्र बावनकर यांनी दिली.

अजिंक्य भारत

# आपलं अकोला

अकोला, शनिवार, दि. २६ जुलै २०२५

## थोडक्यात

### राज्य निवडणूक आयुक्तांनी केली जिल्हाधिकारी कार्यालयातील सुविधांची पाहणी



**अकोला** : राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त दिनेश वाघमारे यांनी आज अकोला येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नूतन इमारतीची पाहणी केली. जिल्हाधिकारी अजित कुंभार यावेळी उपस्थित होते. आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पूर्वतयारीचा आढावा वाघमारे यांनी अमरावती येथे विभागीय कार्यालयात आयोजित बैठकीत गुरुवारी घेतला. त्यानंतर आयोगाच्या सुनावणी कामकाजासाठी त्यांचे आज अकोला जिल्हाधिकारी कार्यालय येथे आगमन झाले. सुनावणी कामकाजानंतर त्यांनी नूतन इमारतीची पाहणी केली. इमारतीतील आनंदी कक्ष, आवश्यक दस्तऐवज तत्काळ मिळण्यासाठी किऑस्क सुविधा, हिरकणी कक्ष, सूचनाफलक आदी विविध सुविधांची पाहणी वाघमारे यांनी केली. जिल्हाधिकारी कुंभार यांच्यासह निवासी उपजिल्हाधिकारी विजय पाटील, जिल्हा माहिती विज्ञान अधिकारी अनिल चिंचोले आदी उपस्थित होते.

### एमआयएमच्या कार्यकर्त्यांचे मनपा स्वागत कक्षावर चढून आंदोलन



**अकोला** : पंतप्रधान आवास योजनेतून अकोला शहरातील काही भागांना वगळण्यात आल्याचा आरोप करीत एम.आय.एम.च्या पदाधिकाऱ्यांनी थेट महापालिका आयुक्तांच्या कार्यालयाच्या समोर असलेल्या स्वागत कक्षाच्या टिन शेडवर चढून आंदोलन छेडले.वगळलेल्या भागांचा तातडीने योजनेत समावेश करावा, असा इशारा आंदोलकांनी दिला. या प्रकारामुळे महापालिकेच्या परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. पोलीस घटनास्थळी दाखल होताच आंदोलनकर्त्यांना खाली उतरवून ताब्यात घेतले. या आंदोलनाच्या पद्धतीवर आयुक्तांनी नाराजी व्यक्त करीत सांगितले की, अशा पद्धतीने आंदोलन करणे हे चुकीचे असून, यावर कायदेशीर मार्गाने चर्चा केली पाहिजे.

### वीज वापरली आहे तर बिल भरलेच पाहिजे

**अकोला** : वितरण हानी कमी करा, कायमस्वरूपी वीज पुरवठा खंडित असलेल्या वीज ग्राहकांची तपासणी करा,फिडर इंडेक्सिंगनुसार बिलींग करा,ग्राहकांनी वापरलेल्या विजेच्या बिलाची १००% वसुली करा आणि ग्राहकांना नियमित आणि वेळेत वीज बिल भरण्याची सवय लावा ,असे निर्देश देताना महावितरणमध्ये काम करताना 'चलता है कल्चर' यापुढे कदापी सहन केल्या जाणार नाही, असा स्पष्ट इशारा प्रादेशिक संचालक नागपूर तथा कार्यकारी संचालक मुंबई परेश भागवत यांनी दिला.

# प्रदूषणाला आळा घालण्यात नियंत्रण मंडळ 'फेल'

## नागरिकांचे आरोग्य धोक्यात: कारवाई शून्य

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २५ :** कारखान्याद्वारे हवा, पाणी अथवा ध्वनिप्रदूषण होणार नाही, याची खबरदारी घेण्याची जबाबदारी संबंधित कंपनी व्यवस्थापनाची आहे. या कारखान्यामुळे होणारे प्रदूषण रोखण्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या कारखान्यांवर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून करवाई होणे अपेक्षित आहे; परंतु प्रदूषण मंडळाकडून जिल्ह्यात कारवाया होताना दिसत नाहीत.

कोणताही कारखाना सुरू करायचा असेल तर प्रदूषण नियंत्रण मंडळाचा परवाना घेणे संबंधित कारखान्यांना बंधनकारक आहे. एवढेच नव्हे तर कारखान्यामुळे होणारे प्रदूषण रोखण्यासाठी प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नियमांचे पालन करणे आवश्यक असते. कारखान्यातील रसायनयुक्त पाणी थेट नदी, नाल्यात सोडता येत नाही. एवढेच नव्हे तर हे पाणी जमिनीत झिरपणार नाही, याची खबरदारी कारखान्याने घेणे आवश्यक असते. यासाठी पाणी प्रक्रिया युनिट उभारणे कंपन्यांना बंधनकारक असते, तसेच कारखान्याच्या बॉयलरमधून निघणारा धूर हवेत सोडण्याचीही एक पद्धत आहे. कारखान्यांना विशिष्ट उंचीची चिमणी उभारणे बंधनकारक असते. शिवाय कारखान्याच्या धुरामुळे हवेचे प्रदूषण कमीत कमी होईल, याची खबरदारी घेण्याची जबाबदारी कंपनीची असते. बहुतांश कंपन्यांकडून याकडे दुर्लक्ष करण्यात येते. मंडळाच्या निरीक्षकाकडून कंपनीला भेट दिली जाते, तेव्हा आणि कंपनीविरोधात तक्रार आल्यानंतर असे प्रकार उघडकीस येतात. मग एमपीसीबीकडून कंपनीला प्रदूषण रोखण्यासंदर्भात नोटीस बजावण्यात येते; मात्र या विभागाकडून किती जणांना अशा नोटीस देण्यात आल्या, हे कोडेच आहे.



### अधिकाराचा वापर का नाही?

या प्रकरणी प्रथम कारणे दाखवा नोटिसा बजावण्यात येतात. यानंतरही कंपनी व्यवस्थापनाने काहीही न केल्यास तसेच प्रदूषण रोखण्यासाठी विशेष कार्यवाही न केल्यास या कंपन्यांविरोधात कडक कारवाई करण्याचा निर्णय घेणे गरजेचे आहे. या उपरही कंपन्यांना त्यांचे कारखाने बंद करण्याचा अधिकार प्रदूषण नियंत्रण मंडळाला आहे.

### नाल्यातून वाहते दूषित पाणी

अकोला औद्योगिक वसाहतमध्ये अनेक कारखाने आहेत. यामध्ये ऑईल मिल, केमिकल कंपनी, औषध कंपनी, डाळ मिल याशिवाय अनेक उत्पादन करणाऱ्या कंपन्या आहेत. या कंपन्यांना महाराष्ट्र प्रदूषण मंडळाचा परवाना आवश्यक आहे. हवेतील व कारखान्यातून निघणाऱ्या पाण्यातील प्रदूषण रोखणे बंधनकारक आहे; मात्र औद्योगिक वसाहतीतून वाहत येणारे नाले दुर्गंधीयुक्त असल्याची परिस्थिती आहे. सदर नाले नागरी वस्तीतून वाहत असून, याचा परिणाम नागरिकांच्या व प्राण्यांच्या आरोग्याला होत आहे.

### 'मुख्यमंत्री बाल आशीर्वाद' नावाची योजनाच नाही

**अकोला** : मुख्यमंत्री बाल आशीर्वाद योजना अशा योजनेच्या नावाने समाजमाध्यमांतून काही संदेश प्रसारित होत आहेत. प्रत्यक्षात या नावाची कुठलीही योजना नाही. त्यामुळे नागरिकांनी सतर्कता बाळगावी, असे आवाहन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी गिरीश पुसदकर यांनी केले. सध्या सोशल मीडियावरून 'मुख्यमंत्री बाल आशीर्वाद' नावे योजना असून, १ मार्च २०२० नंतर ज्यांचे दोन्ही पालक अथवा एक पालक मृत्यू झाला आहे व बालकांचे वय १८ वर्षे पेक्षा कमी आहे, अशा कुटुंबातील २ मुलांस बाल सेवा योजना अंतर्गत दरमहा ४ हजार रुपये मिळणार आहेत व याचे फॉर्म तहसील कार्यालयात उपलब्ध आहेत', अशी चुकीची माहिती प्रसारित करण्यात येत आहे. अशा नावाने कोणतीही योजना अस्तित्वात नसून सदर बाब अफवा आहे.

# अखेर अकोला ते महान रुंदीकरणाचा मार्ग मोकळा

## प्रकल्पाचा खर्च ४०४ कोटी रुपये : निविदा प्रक्रिया सुरू

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २५ :** अकोला ते महान ३० किमी मार्गाच्या रुंदीकरणाची निविदा प्रक्रिया सुरू झाली आहे. एप्रिल महिन्यात या कामाला राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाची मंजुरी मिळाली असून, महामार्गाच्या रुंदीकरणासह ४०४ कोटी रुपये खर्च करून या मार्गावर बार्शीटाकळी येथे रेल्वे ओव्हर ब्रिज उभारण्यात येणार आहे. या मार्गाच्या रुंदीकरणाचा प्रश्न मार्गी लागल्याने नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

वाहतुकीने व्यस्त असलेल्या अकोला ते महान मार्गाचा रुंदीकरणाचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित होता. अकोला शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या दोन मोठ्या जलवाहिन्या मार्गाच्या लगत असल्याने रुंदीकरणात मोठा खोडा निर्माण झाला होता; परंतु या मार्गावरील वाढते अपघात व वाहतुकीची होणारी कोंडी लक्षात घेता राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने ४०४ कोटी रुपये खर्चाच्या प्रकल्पाला मान्यता दिली आहे. या कामाची टेंडर प्रक्रिया सुरू झाली असून, दिवाळीनंतर प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार असल्याचे एनएचआयचे कार्यकारी अभियंता यांनी सांगितले. सिंधी कॅम्प ते खडकी बायपासपर्यंत हा मार्ग चारपदरी होणार असून, २० मीटर रुंद असलेल्या या मार्गावर दुभाजक उभारण्यात येणार आहेत. खडकी बायपासपर्यंत रस्त्याच्या कडेला असलेल्या दोन्ही जलवाहिनीच्यावर पेवर्स ब्लॉक लावण्यात येणार आहेत. खडकी बायपास ते महानपर्यंत मार्गाची रुंदी १० मीटर राहणार असून, रस्त्याच्या दोन्ही कडेला साईड शोल्डर असणार आहे. त्यामुळे भविष्यात जलवाहिनीला कुठलीही क्षति पोहोचल्यास रस्ता खोदावा लागणार नाही, अशी माहिती कार्यकारी अभियंता अश्विन चव्हाण यांनी दिली.

> अकोला ते महान मार्गाच्या रुंदीकरणास मंजुरी मिळाली असून, टेंडर प्रक्रिया राबविण्यात येत आहे. बार्शीटाकळी आरोबी संदर्भात रेल्वे विभागासोबत पत्रव्यवहार करण्यात आला आहे. ३० किमी असणाऱ्या मार्गाची डांबरीकरण करण्यात येणार आहे.
>
> - **अश्विन चव्हाण,** कार्यकारी अभियंता, एनएचआय

> या मार्गावरील वाहतूक पाहता महानपर्यंत हा मार्ग चारपदरी होणे अपेक्षित होते; परंतु जलवाहिनी शिफ्टिंगचा खर्च अधिक असल्याने मार्गाच्या रुंदीकरणाचा कायमस्वरूपी तोडगा न काढता केवळ तीन मीटर रुंदी वाढविण्यात आली आहे. खडकी बायपास पर्यंत वाहतुकीस दिलासा मिळत असला तरी पुढे मार्गाची रुंदी कमी असल्याने वाहतूक कोंडीची समस्या कायम राहणार आहे.
>
> - **पंकज गावंडे,** माजी नगरसेवक

# कार आणि दुचाकीच्या अपघातात दुचाकीवरील दोघे ठार

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २५ :** २४ जुलै २०२५ रोजी सायंकाळी पिंजर ते बार्शीटाकळी रोडवरील उजळेश्वर अजनी फाट्यावर दुचाकी व चारचाकी वाहनाच्या जोरदार धडकेत दुचाकीवरील दोघांचा दुर्दैवी मृत्यू झाला. अपघात इतका भीषण होता की दुचाकीस्वारांना वाहनाने जोरदार धडक दिल्यामुळे ते रस्त्याच्या कडेला फेकले गेले.

अवघ्या २० मिनिटांतच पथकाचे जवान ज्ञानेश्वर जाधव व अंकुश सदाफळे रुग्णवाहिकेसह घटनास्थळी दाखल झाले. यावेळी बार्शीटाकळी पोलीस स्टेशनचे ठाणेदार धुमाळ व पोलीस कर्मचारी यांनीही घटनास्थळी धाव घेत बचावकार्यात मदत केली. अपघातातील एक जखमी व्यक्तीला १०८ रुग्णवाहिकेद्वारे उपचारासाठी पाठविण्यात आले, तर इतर मृत व्यक्तींना मानव सेवेच्या रुग्णवाहिकेद्वारे अकोला जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले. या अपघातात कुमार विजय जाधव (२५), रा. मोझरी खुर्द अपघातस्थळीच मृत्यू, गोवर्धन राठोड (५५), रा. महागाव, लोहगाव उपचारादरम्यान मृत्यू ,कारचालक अश्विन ठाकरे, रा. जनुना हे किरकोळ जखमी झाले असून, त्यांच्यावर प्राथमिक उपचार करण्यात आले आहेत.

# बेकायदा बांधकामांना चाप लावण्यासाठी कंत्राटदाराची नियुक्ती करणार

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २५ :** अनधिकृत बांधकामांना आळा घालण्यासाठी मनपा प्रशासनाने मालमत्तांची मोजणी करण्यासाठी कंत्राटदाराची नियुक्ती केली. या कामाचा कालावधी संपुष्टात आला असून, नव्याने काम देण्यासाठी पुन्हा निविदा प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. तोपर्यंत सोमकुवर नामक अभिकर्ताला मुदतवाढ देण्यात आली आहे.

शहरात दीड लाखाहून अधिक मालमत्ता असून, अनधिकृत बांधकामांना चाप लावण्यासाठी महापालिका प्रशासनाने जुलै २०२२ मध्ये तीन वर्षांसाठी नागपूर येथील सोमकुवर नामक कंत्राटदाराची नियुक्ती केली. तीन वर्षात अकोला महापालिका क्षेत्रातील शेकडोर निवासी व व्यावसायिक मालमत्तांचे मोजमाप करण्यात आले. तत्कालिन आयुक्त कविता द्विवेदी यांनी शहराच्या भल्यासाठी व महापालिकेला महसुल प्राप्त करुन देण्यासाठी कंत्राटदाराची नियुक्ती केली. या कामाचा कालावधी जुलै २०२५ मध्ये संपुष्टात आला आहे. गत तीन वर्षात कंत्राटदाराने चारही झोनमध्ये तीन हजाराहून अधिक मालमत्तांचे मोजमाप केले असुन संपूर्ण अहवाल नगर नियोजन विभागाला सादर केला आहे. यामुळे शहरातील बेकायदेशीर बांधकामांना नियमानुकूल करण्यास महापालिकेला मदत झाली असून मोठ्या प्रमाणात महसूल प्राप्त झाला आहे. मंजूर नकाशापेक्षा अधिक बांधकाम केलेल्या इमारत मालकांना दुप्पट दंड लावून विकास शुल्क वसूल करण्यात आले. एका मालमत्तेवर अभिकर्ताला ६०० ते ६५० रु. प्रमाणे रक्कम महापालिकेने अदा केली असून अद्याप तीन हजाराहून अधिक मालमत्तांचे मोजमाप करण्यात आले आहे.

## ट्रॅक्टरद्वारे डवरणीचा फेर...



दिवसेंदिवस बैल जोडीचे प्रमाण कमी होत असून, आता नवीन तंत्रज्ञानाने चक्क ट्रॅक्टरलाच डवरणी यंत्र तयार केले आहे. जिल्ह्यातील पळसो बढे येथील एक शेतकरी आपल्या शेतातील सोयाबीनच्या पिकात ट्रॅक्टरद्वारे डवरणी करताना दिसत आहे.
(छाया. संजय ताथुरकर)

# जिल्ह्यातील वनक्षेत्र केवळ ७ टक्के

## यंदा ३० लाख वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट; मात्र पूर्णतेचे मोठे आव्हान

। शरद शेगोकार ।

**अकोला, दि. २५:** भारतीय वन सर्वेक्षणाच्या च्या आकडेवारीनुसार अकोला जिल्ह्यातील वनक्षेत्र केवळ ७ टक्क्यांवर आले आहे. २०२१ ते २०२३ या दोन वर्षांत वनक्षेत्रात तब्बल ११.५४ टक्क्यांची घट नोंदली गेली. जिल्ह्याचे एकूण ५४३१ चौ. किमी क्षेत्रफळ असताना त्यापैकी फक्त ३७७.८७ चौ. कि.मी. जंगल उरले आहे, ही बाब पर्यावरणासाठी धोक्याची घंटा मानली जात आहे.

या पार्श्वभूमीवर यंदा जिल्ह्यासाठी ३० लाख झाडांची लागवड करण्याचे महत्वाकांक्षी उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्यापैकी उपवनसंरक्षण प्रादेशिक अकोला वन विभाग आणि सामाजिक वनीकरण विभाग यांना प्रत्येकी ३ लाख झाडांची जबाबदारी देण्यात आली आहे, अशी माहिती आय.एफ.एस. सुमंत सोळंके, उपवनसंरक्षक, प्रादेशिक अकोला यांनी दिली.



गेल्या पाच वर्षांत राज्य शासनाच्या 'हरित महाराष्ट्र', 'माझे झाड माझी जबाबदारी', 'वनमहोत्सव' या मोहिमांतर्गत जिल्ह्यात ६ ते ७ लाख झाडांची लागवड झाली. मात्र त्यातील फक्त ६० टक्के झाडेच जिवंत राहिली, असे अधिकृत स्तरावर मान्य करण्यात येत आहे. वाढते अतिक्रमण, गवताळ प्रदेशांची नासधूस, गायरान जमिनींचा अनधिकृत वापर, तसेच सिंचन-देखभालीतील त्रुटी यामुळे टिकावाचा प्रश्न अजूनही गंभीरच आहे.

> गवताळ प्रदेश म्हणजे जैवविविधतेचे मूळ आहेत. गायरान जमिनी गायरानच राहाव्यात, त्यांचे योग्य मेंटेनन्स होणे अत्यावश्यक आहे. अतिक्रमणामुळे स्थानिक परिसंस्था कोलमडते, म्हणून या नैसर्गिक क्षेत्रांचे रक्षण काळाची गरज आहे.
>
> - **सुमंत सोळंके,** उपवनसंरक्षक, प्रादेशिक अकोला

> फक्त झाडे लावणे नव्हे, तर ती जगवणे हे अधिक महत्त्वाचे आहे. 'एक पेड माँ के नाम' योजनेतून नागरिकांनी निसर्ग संवर्धनासाठी पुढे यावे, ही काळाची गरज आहे.
>
> - **नम्रता शां. ताले,** सहाय्यक वनरक्षक

वन विभागाने यावर्षी दीर्घकालीन संगोपन, जलसिंचन व्यवस्था आणि लोकसहभाग यांवर विशेष भर देण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, तज्ज्ञांचे मत आहे की लागवडीपेक्षा 'झाडे जगवण्याच्या' धोरणात्मक कृती आराखड्याला प्राधान्य, अतिक्रमणांवर कठोर कारवाई आणि गवताळ/गायरान भूभागांचे संरक्षण केल्याशिवाय वनक्षेत्रातील घसरण रोखता येणार नाही. वनसंवर्धन हे केवळ सरकारी यंत्रणांचे काम नाही नागरिकांनीही प्रत्यक्ष पुढाकार घेऊन जबाबदारी स्वीकारली तरच आकडेवारी हिरवीगार होईल असे पर्यावरणतज्ज्ञांचे एकमत आहे.

# मनपाला आली जाग; अतिक्रमण हटविले

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २५ :** अतिक्रमण निर्मूलन कारवाईचा पुन्हा मुहूर्त निघाला असून गुरुवारी महापालिकेने चौपाटीवरील अतिक्रमितांना हुसकावण्यात आले. अतिक्रमण विभागाने कारवाई करीत चौपाटी परिसर, गांधी रोडवर बेकायदेशीरपणे दुकाने थाटणाऱ्या व्यावसायिकांना हटवले.

महापालिका परिसरातील रस्तेआणि चौक अतिक्रमणांनी वेढले आहेत. किरकोळ व्यावसायिकांची संख्या सतत वाढत आहे. अतिक्रमण हटाव विभाग जाग येईल, त्यावेळी कारवाई करीत असल्याने ; रस्ते आणि चौक काही काळासाठी अतिक्रमणमुक्त दिसतात. मात्र, परिस्थिती जैसे थे होते. परिणामी वाहतुकीची समस्या उग्ररूप धारण करत आहे. अतिक्रमण हटाव विभागाच्या दुर्लक्षामुळे वाहनधारकांचा त्रास वाढत असून अतिक्रमणही वाढले आहे. शहरातील मुख्य रस्त्यांवर व्यावसायिकांनी केलेल्या अतिक्रमणमुळे रहदारीस अडचणी येत आहेत. विशेष म्हणजे महापालिकेच्या भिंतीलगतच अतिक्रमण करून व्यावसायिक बेकायदा व्यवसाय करत आहेत. राज्य सेवा हक्क सेवा आयोगाच्या अकोला भेटीच्या एक-दोन दिवस पूर्वी व्यावसायिकांना येथून हटवण्यात आले होते.

शहरातील अतिक्रमण कमी करण्यासाठी किरकोळ व्यावसायिकांसाठी फेरीवाला झोन तयार करण्यात आले असले तरी, या फेरीवाला झोनमध्ये व्यवसाय सुरू करण्यास व्यावसायिक उदासीन असल्याचे दिसून येत आहे, ज्यामुळे एकीकडे शहरात अतिक्रमण करून व्यवसाय केले जात आहेत, तर दुसरीकडे लाखो रुपये खर्च करून बांधलेले फेरीवाला झोन ओसाड पडले आहे. परंतु आता महापालिकेने अतिक्रमण हटवण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.

# थोडक्यात

## सोमवारी जिल्ह्यातील डाक सेवा बंद

**बुलडाणा :** भारतीय डाक विभाग आपल्या सेवा प्रणालीत आमूलाग्र सुधारणा घडवून आणण्यासाठी 'आय.टी. २.०' या महत्वाकांक्षी उपक्रमांतर्गत एपीटी अप्लिकेशन ही नवीन डिजिटल प्रणाली कार्यान्वित करत आहे. या नव्या प्रणालीच्या अंमलबजावणीमुळे डाक व्यवहार अधिक जलद, अचूक आणि ग्राहकाभिमुख होणार असून, यामुळे पोस्ट ऑफिसमधील सेवा आणखी सक्षम होणार आहेत. बुलढाणा जिल्ह्यातील सर्व शाखा टपाल कार्यालये व उपडाकघरांमध्ये ही प्रणाली मंगळवार दि. ५ ऑगस्ट २०२५ पासून लागू करण्यात येत आहे. या संक्रमणासाठी आवश्यक असलेल्या डेटाच्या स्थलांतराची प्रक्रिया सोमवार दि. ४ ऑगस्ट २०२५ रोजी पार पडणार असल्याने त्याा दिवशी (दि. ४ ऑगस्ट रोजी) बुलढाणा जिल्ह्यातील कोणत्याही पोस्ट ऑफिसमध्ये व्यवहार करता येणार नाहीत. त्याामुळे महत्त्वाची कामे ४ ऑगस्टपूर्वीच पूर्ण करावीत, जेणेकरून व्यवहारात अडथळा येणार नाही, अशी माहिती अधिक्षक डाकघर, बुलढाणा यांनी प्रसिद्धी पत्रकाव्दारे दिली आहे.

## अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतिदिनानिमित्त गायनाचा कार्यक्रम

**लाखनवाडा :** येथून जवळच असलेल्या घारोड येथे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या ५६ व्या स्मुर्ति दिना निमित्त लहूजी साळवे कला संच घारोड यांचा गायनाचा व प्रबोधनाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यामध्ये मुख्य गायक शाहिर निवृत्ती बोचरे तबला व नाल वादक किसन कांबळे हार्मोनियम वादक संताराम तायडे सह गायक व टाळ वादक निर्मलाबाई कांबळे रेखाबाई तायडे शांताराम वैतकार कौशालबाई कांबळे मिराबाई घोडे या कलावंतांनी आपली कला सादर केली. कार्यक्रमाला गावातिल नागरिक बहूसंखेने उपस्थित होते.

## शेतकऱ्यांनो, ई-केवायसी, आधार सीडिंग करा : कृषी विभागाचे आवाहन

**बुलडाणा :** केंद्र शासन पुरस्कृत प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा २० व्या हप्त्याचा लाभ लवकरच वितरीत करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील ३ हजार ९९ शेतकऱ्यांची ई केवायसी आणि ४ हजार ४३३ शेतकऱ्यांचे आधार सीडिंग प्रलंबित आहे. शेतकऱ्यांनी प्रलंबित ई केवायसी, आधार सीडिंग व बँक खात्याला डिबीटी इनेबल करणे किंवा इंडिया पोस्ट पेमेंट बँक मध्ये खाते उघडून त्याा खात्याला आधार संलग्न करून डिबीटी इनेबल करण्याचे आवाहन कृषि उपसंचालक अनुराधा गांवडे यांनी केले आहे. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेसाठी केंद्र आणि शासनाकडून वार्षिक प्रत्योकी सहा हजार आणि नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेमार्फत वार्षिक प्रत्योकी सहा हजार रुपये शेतकरी कुटुंबांना दिले जात आहेत. त्याासाठी ई-केवायसी आणि आधार सीडींग करणे अत्याावश्यक आहे, नसल्यास शेतकरी लाभापासून वंचित राहतील. त्याासाठी शेतकऱ्यांनी संबंधित तालुका कृषि कार्यालय व तालुक्यातील कृषी सहाय्यक किंवा गाव नोडल अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा म्हणजे लाभापासून कोणीही वंचित राहणार नाही, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी मनोजकुमार ढगे यांनी केले आहे

## कृषी महाविद्यालयाच्या कृषीकन्यांनी घेतली शेतकरी सभा



**जळगाव जा. :** डॉ.पंजाबराव देशमुख विद्यापीठ अकोला संलग्रित स्वातंत्र्यवीर गणपतराव इंगळे कृषी महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी १० जुलै रोजी ग्रामीण कार्यानुभव कार्यक्रम अंतर्गत वडगाव पाटण येथे घेतली शेतकरी सभा. महाविद्यालयाचे कर्तव्यदक्ष प्राचार्य गवई सर, प्रा.आमले सर, प्रा.अटोळे सर, आणि प्रा.डव्हळे सर यांच्या देखरेखीखाली हि सभा पार पडली. या सभेत कृषीकन्यांनी शेतकऱ्यांना उत्पादन वाढीसाठी सुधारित पीक पद्धती, आधुनिक तंत्रज्ञान व उपाय, सरकारी योजना, शेतीविषयी मोबाईल अँप, आर्थिक योजनांविषयी मदतीबद्दल सविस्तर माहिती तसेच बाजारभाव याविषयी मार्गदर्शन केले. यावेळी गावातील शेतकरी सहदेव जाणे, दशरथ धर्माळ, महादेव घुले, सुपडाजी जाधव, अर्जुन वाघ, पुंजाजी वेरूळकर, सारंग वाघ, राधेश्याम घुले, दगडु जाधव, पंजाब घुले इत्यादी शेतकऱ्यांची उपस्थिती होती.

# रायमुलकर यांच्या प्रयत्नातून ग्रामपंचायत भवन मंजूर

## सात कोटी खर्चातून ३८ ग्रामपंचायत भवनाचे बांधकाम पूर्ण

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**मेहकर दि. २५ :** राष्ट्रीय ग्राम स्वराज्य अभियान अंतर्गत ग्राम विकास विभागाकडून वढव ,हिवरा खुर्द, उकळी येथे नवीन ग्रामपंचायत भवन बांधकाम माजी आमदार संजय रायमुलकर यांच्या प्रयतातून मंजूर झाले आहे. ७५ लाख रुपये खर्च अद्ययावत ग्रामपंचायत भवन आणि नागरी सुविधा केंद्र बांधकाम करण्यात येणार आहे.

संजय रायमुलकर यांच्या कार्यकाळात मागील वर्षी लोणार तालुक्यात १३ तर मेहकर तालुक्यात २५ ग्रामपंचायत भवनाचे बांधकाम त्यांनी मंजूर करून आणले होते. सात कोटी रुपये खर्चून ही बांधकामे पूर्ण करण्यात आल्याने ३८ ग्रामपंचायतींना स्वतःचे सुंदर ग्रामपंचायत भवन उपलब्ध झाले आहे. लोणार तालुक्या-



तील धानोरा , शारा , वडगाव तेजन, गोत्रा, बागुलखेड, देऊळगाव वायसा, नांद्रा कोयाळी, गंधारी, येवती, मातमळ ,शिवनी पिसा तर मेहकर तालुक्यातील सारशिव, बदनापूर, अंत्री देशमुख, चायगाव ,हिवरा साबळे, सावंगी वीर, वडाळी, पांगरखेड, घुटी,लोणी (लव्हाळा), वरुड , मांडवा समेत डोंगर, लव्हाळा, पेनटाकळी , गणपुर , घाटनंद्रा ,शहापूर, उसरण, नायगाव देशमुख, बाह्ई, कळपविहीर ,पारखेड, चिंचोली बोरे, कंबरखेड येथे ग्रामपंचायत भवनाचे बांधकाम काही ठिकाणी पूर्ण झाले आहे, तर काही गावांमध्ये प्रगतीपथावर आहे.

संजय रायमुलकर यांच्या प्रयत्नातून नवीन मंजूर झालेल्या वढव, हिवरा खुर्द ,उकळी येथील ग्रामपंचायत भवन बांधकामासाठी ग्राम स्वराज्य अभियानाअंतर्गत प्रत्येकी २५ लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत. वीस लाख रुपयांचे ग्रामपंचायत भवन बांधकाम आणि ५ लाख रुपये खर्चून नागरी सुविधा केंद्र खोलीचे बांधकाम करण्यात येणार आहे.

मेहकर लोणार तालुक्यातील उर्वरित गावांमधील ग्रामपंचायत भवनासाठी निधी उपलब्ध करून देण्याचा महायुती शासनाच्या माध्यमातून प्रयत करण्यात येत आहे, असे संजय रायमुलकर यांनी सांगितले.

# बीएलओ आणि बीएलओ पर्यवेक्षक यांचे प्रशिक्षण संपन्न

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**मंगळूर नवघरे दि.२५ :** भारत निवडणूक आयोगचे मार्गदर्शक सुचनेनुसार मा तहसीलदार चिखली यांनी आज ०२३चिखली विधानसभा मतदारसंघातील बिएलओ आणि बिएलओ पर्यवेक्षक यांचे प्रशिक्षण वर्ग श्री शिवाजी महाविद्यालयाच्या सभागृहात आज दि २५जुलैला आयोजित करण्यात आला होता. भारत निवडणूक आयोग यांच्या आय आय आया डी एम येथून प्रशिक्षण घेऊन आलेले. संजय चौधरी मंडळ अधिकारी तथा बिएलओ पर्यवेक्षक व श्री राजेंद्र राजपूत शिक्षक तथा बिएलओ यांनी उत्तम रित्या प्रशिक्षण दिले ह्यावेळेस श्री राजेंद्रजी पोळ उपजिल्हाधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी, कडू नायब तहसीलदार व सर्व पर्यवेक्षक तथा बिएलओ उपस्थित होते.

सर्वप्रथम चौधरी यांनी दिल्ली येथील निवडणूक आयोगाच्या प्रशिक्षणाची माहिती देऊन येथे घेतलेल्या विविध विषयांच्या प्रशिक्षणावर प्रस्तावना केली आणि भारत निवडणूक आयोगाची स्थापना व कामकाज त्याअनुषंगाने संविधानाच्या विविध कलमे,



लोक प्रतिनिधित्व कायदा १९५०, मतदार नोंदणी अधिनियम १९६० याबाबत तसेच निवडणूक आयोगाचे दिल्ली येथिल प्रशिक्षण बाबत माहिती दिली बिएलओ यांचे नियुक्ती, कामकाज टप्पे, नविन मतदार नोंदणी,वगळणी, दुरुस्ती ई बाबत अनुसरायची कार्यपद्धती विशद केली. मतदार नोंदणी अधिकारी पोळ यांनी सर्व बीएलओ यांनी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून अचूक पद्धतीने मुदतीत काम करणे बाबत सविस्तर मार्गदर्शन केले. राजपूत यांनी बिलओ एपबाबत, नविन सुधारणा बाबत,मतदान टक्केवारी वाढविण्यासाठी विविध उपक्रम, विविध अर्ज भरणे ई बाबत सविस्तर मार्गदर्शन केले. शेवटी सर्व बिएलओ आणि पर्यवेक्षक यांची आयोगाने निर्देश दिल्याप्रमाणे ऑनलाईन टेस्ट घेण्यात आली.

# रस्ता सुरक्षा अभियान अंतर्गत विद्यार्थी यांना वाहतूक नियमांबाबत जनजागृती

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**डोणगाव दि.२५ :** येथून जवळच असलेल्या ग्राम लोणी गवळी येथील दे. भ. हि. सो. उर्फ बाबुराव पाटील विद्यालय लोणी गवळी येथे पलसिध्द कन्स्ट्रक्शन कंपनी प्रा. लि. च्या वतीने रस्ता सुरक्षा अभियान अंतर्गत वाहतूक नियमांबाबत जनजागृती करण्यात आली.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळेचे प्राचार्य सुरेश हिवरकर- हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून पलसिध्द कन्स्ट्रक्शन प्रोजेक्ट मॅनेजर हितेश मानमोडे पर्यावरण अधिकारी विनय महावरकर सुरक्षा अधिकारी सुशांत महावरकर




पर्यावरण सल्लागार अधिकारी प्रभासिनी मलीक अश्विनी डाळे कु. प्रृथ्वी दुतोंडे भारती श्रीतापे सौ. रेखा वानखेडे संदेश देशमुख लक्ष्मण यादव रजनीश गोस्वामी अकाश नरवाडे आदी उपस्थित होते. यावेळी पर्यावरण अधिकारी विनय महावरकर व प्रभासिनी मलीक यांनी रस्ता सुरक्षा व वाहतूक नियमांबाबत विद्यार्थी यांना सखोल मार्गदर्शन केले व त्यानंतर रस्ता सुरक्षा व नियम यावर एक प्रश्नमंजुषा घेऊन प्रथम पाच विद्यार्थी यांना पारीतोषिक देण्यात आले.

यावेळी लोणी गवळी येथून जाणारा अमडापुर ते केनवड मार्ग हा वाहतूकीचा होणार असून नियम पाळून अपघात कसे टाळता येतील याबाबत प्राचार्य हिवरकर यांनी माहीती दिली व त्याांनंतर व्रूक्ष भेट देऊन व अल्पोपाहार विद्यार्थी यांना देऊन कार्यक्रमाचे सांगता करण्यात आली.

# मेसरे कुटुंबातील द्वीपुत्ररत्नांचा अभिष्टचिंतन व नामकरण सोहळा संपन्न

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**मलकापूर दि.२५ :** माता महाकाली देवीच्या कृपा आशीर्वादाने तसेच स्व.सौ लीलाबाई मेसरे यांच्या देवरुपी वात्सल्यपूर्ण आशीर्वादाने मेसरे कुटुंबात द्वीपुत्ररत प्राप्ती झाली. या आनंदाला अधिक द्विगुणित करण्यासाठी बाळाच्या नामकरण व अभिष्टचिंतन सोहळासह अन्नदान सोहळा उपस्थित हजारोंच्या आशीर्वादाने पार पडला.

मलकापूर शहरातील राजकीय,सामाजिक, व व्यापारी क्षेत्रात मेसरे कुटुंबीयांनी वेगळे अस्तित्व निर्माण केले आहे.मानवी जीवनात सुख आणि दुःख यांचे चक्र सातत्याने सुरू असते. असंख्य दुःखानंतर एखाद्या छोट्या सुखाचाही अनुभव हा आठवणीत राहतो. असेच काहीसे मेसरे कुटुंबात



घडले. संसारिक नियमानुसार दुःखानंतर सुख आले. आई माता महाकालीची कृपा झाली आणि अॅड कृष्णा व भाग्यश्री तसेच विष्णू व रुपाली या दोघी दाम्पत्यांच्या पोटी पुत्र जन्माला आले. त्या आनंदाच्या निमित्ताने अन्नदान करता यावं असे कुठेतरी मेसरे कुटुंबियांना वाटले. म्हणून या आनंदाचे कौटुंबिक स्वरूप न ठेवता सार्वजनिक स्वरूपात प्रगटीकरण करून एक वेगळी आठवण रूढ केली.त्याकरता शहरातील व माता महाकाली नगरातील आई-वडील स्वरूप तसेच नातेसंबंधातील वडीलधाऱ्यांना बाळांच्या नामकरण व अभिष्टचिंतन सोहळ्याला आमंत्रित केले. आमंत्रित सर्वांनी मोठ्या संख्येने सदर कार्यक्रमाला उपस्थिती लावली. सदर कार्यक्रमात उपस्थित आई-बहीण स्वरूप महिलांनी नामकरण व अभिष्टचिंतन सोहळ्याला शोभतील अशा पारंपारिक ओव्या गाऊन प्रसंगी भक्ती मार्गातून नृत्या सुद्धा सादर केले. दरम्यान अॅड कृष्णा व भाग्यश्री यांच्या पुत्राचे ''सूर्यांश'' तर विष्णू व रुपाली यांच्या पुत्राचे ''विरांश'' नामकरण हजारोंच्या साक्षीने कृपा, आशीर्वाद देऊन करण्यात आले. सदर कायकम नंतर उपस्थितांनी भोजनाचा आनंद घेतला. अशाप्रकारे पुत्ररत्नांच्या प्राप्तीची आठवण ऐतिहासिक ठरली आह.

मेसरे कुटुंबीयांचे सस्नेह आमंत्रण स्वीकारून शहरातील माजी नगराध्यक्ष अॅड हरीश रावळ, माजी नगरसेवक सुहास चवरे, माजी नगरसेवक अनिल गांधी,अॅड दिलीप बगाडे,अॅड योगेश पाटील,अॅड स्नेहल तायडे,अॅड सचिन देशमुख,अॅड सूरज भोपळे,अॅड महेंद्र राजपूत, अॅड निता डोस,अॅड दर्शना दिवे,अॅड फुरकान, राहुल तायडे, शहजाद खान, विजय साठे, हरीभाऊ गोसावी, विरसिंह राजपूत, गोपाल बोरखेडे,समाधान सुरवाडे,मनोज पाटील, अनिल गोठी,नागेश सुरंगे, करण झनके आदी सन्माननीय व स्नेही उपस्थित होते.

# शेतकरी दाम्पत्यांची गळफास लावून आत्महत्या

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**अंढेरा दि.२५ :** चिखली तालुक्यातील भरोसा गावातून एक हृदयद्रावक घटना समोर आली आहे. येथील पती-पती-ने आपल्या शेतातच लिंबाच्या झाडाला साडीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना आज बुधवार, (दि.२४) जुलै रोजी दुपारी ३ वाजेदरम्यान घडली. गणेश श्रीराम थुट्टे (वय ५५) व रंजना गणेश थुट्टे (वय ५०) यांचा असे या दाम्पत्याचे नांव आहे. पती आणि पती दोघांनी एकाच वेळी आत्महते सारखे टोकाचे पाऊल उचलण्याची ही पहिलीच घटना असावी.

दोघेही शेती करून आपला उदरनिर्वाह करत होते. त्यांच्या नावावर भरोसा शिवारातील गट नं. ३१७ मध्ये सुमारे ५ एकर शेती आहे. यंदा अल्प पावसामुळे सोयाबीन व कपाशी पिकांवर हुमणी अळीचा प्रचंड प्रकोप झाला होता. यामुळे पिके हातून जाण्याची शक्यता व कर्जाचा वाढता बोजा यामुळे त्यांनी नैराश्येतून टोकाचे पाऊल उचलल्याची माहिती आहे. घटनेची माहिती मिळताच भरोसा येथील उद्धव थुट्टे यांनी अंढेरा पोलीस ठाण्याचे ठाणेदार रुपेश शक्करगे यांना कळवले. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन दोन्ही मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी चिखली ग्रामीण रुग्णालयात पाठवले.

मृत दाम्पत्यास एक मुलगा, दोन मुली असून सर्वांची लग्न झालेली आहेत. पुढील तपास ठाणेदार रुपेश शक्करगे यांच्या मार्गदर्शनाखाली सिद्धार्थ दा. सोनकांबळे करीत आहेत. या घटनेमुळे भरोसा गावात शोककळा पसरली असून, कर्जबाजारीपणामुळे शेतकऱ्यांचे होणारे बळी ही गंभीर चिंतेची बाब ठरत आहे.

# सहकार मंत्री ना.बाबासाहेब पाटील यांचा जिल्हा दौरा

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.२५ :** राज्याचे सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील हे शुक्रवार व शनिवार दि. २५ व २६ जुलै २०२५ रोजी शेगाव व खामगाव जि. बुलढाणा जिल्हा दौऱ्यावर येत आहेत.त्याांच्या दौरा कार्यक्रमानुसार दि. २५ जुलै रोजी रात्री ९.१५ आनंद विसावा, शेगाव जि.बुलढाणा येथे आगमन व राखीव.शनिवार दि.२६ जुलै २०२५ रोजी सकाळी ७ वाजता श्री गजानन महाराज समाधीचे दर्शन. सकाळी ७.३० वाजता आनंद विहार येथे कार्यकर्त्यांशी भेट. सकाळी ९.३० वाजता खामगावकडे प्रयाण, सकाळी १० वाजता ब्रिटिश कालीन विश्रामगृह, खामगाव येथे सहकार विभागाच्या अधिकाऱ्यासमवेत आढावा बैठक. सकाळी ११.३० वाजता भारतरत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार व अभिवादन. सकाळी ११.४५ वाजता शहर पोलीस स्टेशन येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुतळ्याला पुष्पहार व अभिवादन. दुपारी १२ वाजता टॉवर चौक येथे महाराणा प्रतापसिंह



यांच्या पुतळ्याला पुष्पहार व अभिवादन, दुपारी १२.१५ वाजता सानंदा निकेतन येथे सदिच्छा भेट व राखीव.

दुपारी १.१५ वाजता एकबोटे चौक, अग्रसेन चौक येथे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष जनसंपर्क कार्यालयास भेट. दुपारी १.३० वाजता शिवाजी महाराज स्टेडीअम समोर राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या शाखेचे उद्घाटन. दुपारी १.४० वाजता छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारुड पुतळ्यास पुष्पहार व अभिवादन. दुपारी १.५० वाजता केशवराव कापले यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट. दुपारी २ वाजता मस्तान चौक येथील मस्तानशाह बाबा दर्गा येथे चादर चढविणे, दुपारी २.१५ वाजता मोहन चौक येथे देवेंद्र देशमुख यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट. दुपारी २.३० वाजता सुटाळा येथे छत्रपती संभाजी महाराज व संताजी महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार व अभिवादन. दुपारी २.४५ वाजता घाटपुरीनाका येथे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या शाखेचे उद्घाटन, दुपारी ३ वाजता घाटपुरी ग्रामपंचायत समोर राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या शाखेचे उदघाटन. दुपारी ३.१५ वाजता जळका भडंग गाव येथे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या शाखेचे उद्घाटन. दुपारी ४ वाजता भारत लॉन येथे शेतकरी मेळावा व कार्यकर्ता मेळाव्यास उपस्थिती. सायंकाळी ६ वाजता पिंपळगाव राजा येथे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या शाखेचे उदघाटन, सायंकाळी ७.३० वाजता राखीव व रात्री ८ वाजता नांदुरा रेल्वेस्टेशनकडे प्रयाण व आगमन. रात्री ९.४५ वाजता नांदुरा रेल्वे स्थानकावरुन मुंबईकडे प्रयाण करतील.

# जिल्हा कॉँग्रेस किसान विभागाची बैठक उत्साहात; नवीन नियुक्त्या जाहीर

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**चिखली दि.२५ :** किसान कॉँग्रेसमधील नवीन पदाधिकारी ही संघटनेची ताकद आहेत. त्यांच्यामार्फत शेतीसंबंधी समस्या अधिक प्रभावीपणे शासनदरबारी मांडल्या जातील याचा आम्हाला ठाम विश्वास आहे. शेतकऱ्यांचे प्रश्न , त्याांच्या अडचणी आणि हक्क यासाठी ते आवाज उठवतील. पक्ष संघटना मजबूत करण्यासोबतच, जनतेशी थेट संपर्कात राहून संघर्षाची भूमिका त्यांनी पार पाडावी, अशी अपेक्षा जिल्हा कॉँग्रेस कमिटीचे अध्यक्ष तथा माजी आमदार राहुल बोंद्रे यांनी व्यक्त केली.

जिल्हा कॉँग्रेस कमिटीच्या किसान विभागाच्या जिल्हाभर बैठका सध्या सुरू असून, त्यााचाच एक भाग म्हणून गुरुवार २५ जुलै रोजी चिखली येथे एक महत्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत राहुल बोंद्रे बोलत होते. बैठकीत किसान कॉँग्रेसच्या



विविध पदांवर नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या. जिल्हा कॉँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राहुल बोंद्रे, जिल्हा किसान कॉँग्रेस अध्यक्ष संभाजी शिर्के, चिखली तालुकाध्यक्ष रामभाऊ जाधव , शहराध्यक्ष राहुल सवडतकर यांच्या हस्ते समाधान आकाळ , गणेश ठेंग (खंडाळा) , मिलिंद पालवे , चिखली यांना नियुक्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

या बैठकीस ज्ञानेश्वर डांबरे, सिद्धांत इंगळे, शेखर देशमुख, व्यंकटेश रिंढे, शुभम बुरकुले यांच्यासह शेकडो कॉँग्रेस पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. बैठकीदरम्यान पक्ष संघटन मजबूत करण्याबरोबरच शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आवाज उठविण्याच्या दृष्टीने आगामी कार्ययोजना ठरविण्यात आली.

## वाहतुकीस अडथळा ; ऑटो चालकाविरूध्द गुन्हा

**खामगाव दि.२५ :** स्थानिक बसस्थानक ासमाोर २३ जुलै २५ रोजी सायंकाळी ६ वा.च्या सुमारास नितीन गजानन सावनेकर (वय ३२ रा.शंकर नगर) याने आपल्या ताब्यातील ऑटो क्र. एमएच-१९-बीयु-१८२९ हा नो पार्कंग झोन मध्ये लोकांच्या जीवीतास धोका निर्माण होईल अशा पध्दतीने रस्त्याच्या मधोमध उभा करून रहदारीस अडथळा निर्माण केला. याप्रकरणी पोकों नितीन निळे यांनी शहर पोस्टेला फिर्याद दिली. फिर्यादीवरून पोस्टेमध्ये उपरोक्त ऑटो बालकाविरुध्द कलम १२५ भान्यासं, सहकलम १२२/१७७ मोवाका नुसार गुन्हा दाखल केला आहे.

## थोडक्यात

### ठाणेदार पोहेकरांनी जाणून घेतल्या विद्यार्थिनींच्या अडीअडचणी



**मनोरा :** विठोली येथील जिल्हा परिषद वसंतराव नाईक विद्यालय येथे नवनियुक्त ठाणेदार नयना पोहेकर यांनी दिनांक २५ जुलै रोजी भेट देऊन विद्यार्थ्यां व विद्यार्थीनी सोबत संवाद साधला. शिक्षण आणि करिअर विषयी मार्गदर्शन केले.तसेच विद्यार्थिनिस काही त्रास आहे का ? असल्यास स्वतः माझ्या सोबत संपर्क करावा असे सांगितले. . तसेच विध्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम निर्माण व्हावं या विषयावर शिक्षकांशी चर्चा केली.या वेळी शिक्षक ए.डी.मेहरे,आर.जी. बारसे, आर. व्ही. सूर्यवंशी, एस.आर. देशमुख, जी.के. वर्मा, पी.जी.राठोड आदी उपस्थित होते.

### वाशिम जिल्ह्यात रविवारपर्यंत सतर्कतेचा इशारा

**वाशिम :** मुंबई येथील हवामान विभागाच्या अंदाजानुसार, वाशिम जिल्ह्यात २७ जुलैपर्यंत जोरदार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली असून, प्रशासनाने सतर्कतेचा इशारा जारी केला आहे. जिल्ह्यात या वर्षी पावसाने सुरुवातीला उशीर केल्यामुळे शेतीकामे खोळंबली होती. २२ जुलै रोजी सकाळच्या सुमारास झालेल्या पावसामुळे काही प्रमाणात शेतकऱ्यांना दिलासा मिळाला. मात्र, सलग दडी मारणाऱ्या पावसामुळे दुपारच्या वेळेस हलक्या जमिनीवरील पिके सुकण्याच्या मार्गावर होती. २२ जुलै रोजी काही भागांत चांगला पाऊस झाला असला तरी काही भागांत केवळ तुरळक पावसाची नोंद झाली. हवामान विभागाने येत्या काही दिवसांत दमदार पावसाची शक्यता व्यक्त केल्याने, शेतकऱ्यांनी संभाव्य पावसामुळे होणाऱ्या नुकसानीपासून बचावासाठी योग्य ती काळजी घ्यावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

### आपले सरकार वेबसाइटमध्ये तांत्रिक अडचणी: प्रक्रियेत दिरंगाई

**मानोरा :** आपले सरकार संकेत स्थळावरून प्राप्त शैक्षणिक व महसुली दाखल्यांच्या अर्जावर कार्यवाही करताना तांत्रिक अडचणी उद्भवत असून त्यामुळे प्रक्रिया रखडत असल्याचे तहसील प्रशासनाने स्पष्ट केले आहे. प्रमाणपत्रासाठीचे अर्ज सेतू सुविधा केंद्र तसेच आपले सरकार पोर्टलद्वारे ऑनलाइन सादर केले जातात. तहसीलदार कार्यालयाव्दारे सर्व अर्ज विहित कालमर्यादेत निकाली काढण्याचा प्रयत्न केला जातो; मात्र काही अर्जावर प्रक्रिया करताना प्लिज ट्राय अगेन असा संदेश मिळतो. त्यामुळे त्या अर्जावर तातडीने कार्यवाही करता येत नाही. ही तांत्रिक बाब असल्याने ती तहसील कार्यालयाच्या कार्यकक्षेत येत नाही, असेही स्पष्ट करण्यात आले आहे, तसेच, प्राप्त अर्जावर प्राधान्यक्रम ठरवून कार्यवाही करण्यात येत असल्याचेही सांगण्यात आले.

### गोंडेगाव येथील किराणा दुकानातून दारू जप्त!

**मानोरा :** मानोरा पोलिस स्टेशन अंतर्गत असलेल्या गोंडेगाव येथे एका किराणा दुकानातून मोठ्या प्रमाणात देशी दारू जप्त करण्यात आली. रेखा रामेश्वर आडे (वय ३२) या महिलेकडे किराणा दुकान आणि घराची झडती घेतली असता तिच्या घरातील एका खोलीत देशी दारूचा साठा आढळून आला. किराणा दुकान आणि घराच्या झडतीदरम्यान ९० मि.लि. क्षमतेच्या २२८ बाटल्या मिळून आल्या. एका बाटलीची किंमत ३५ रुपये असून, एकूण ७,९८० रुपये किमतीचा दारूसाठा अवैधरीत्या साठवलेला होता.

### मुगाचे भाव साडे सहा हजार

**वाशिम:** यंदाच्या हंगामातील मुग बाजारात दाखल होण्यास अवघा महिनाभराचा कालावधी असताना जिल्ह्यातील बाजार समित्यांमध्ये या शेतमालाच्या दरात वाढ होऊ लागली आहे. गुरुवार २४ जुलै रोजी कारंजा कृषी उत्पन्न बाजार समितीत या शेतमालास किमान ६ हजार ५०० रुपये ते कमाल ६ हजार २०० रुपये प्रती क्विंटलपर्यंतचे दर मिळाले होते.

# जुगार अड्ड्यावर छापे; २६ जणांवर गुन्हे

## दोन्ही घटनेत साडे बारा लाखांचा मुद्देमाल जप्त

**दै. अजिंक्य भारत** । प्रतिनिधी



**वाशिम, दि. २५ :** मंगरूळपीर शहरातील भगतसिंह चौक येथील राजधानी गेस्ट हाऊस व मरीमाता मंदिराजवळील टिन शेड येथे सुरू असलेल्या जुगारावर उपविभागीय पोलीस अधिकारी नवदीप अग्रवाल यांच्या पथकाने २४ जुलै रोजी धाड टाकून १२ लाख ४२ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून १९ जणांवर रात्री गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार तक्रारदार पोलीस हवालदार हरीभाऊ कालापाड वय ४०, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय मंगरूळपीर यांनी तक्रार दिली की,२४ जुलै रोजी दुपारी तीन ते सहा वाजता चे दरम्यान भगतसिंह चौक येथे मरीमाता मंदिराजवळील टिन शेड येथे जुगारावर धाड टाकली असता ६,३०,४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच राजधानी गेस्ट हाऊस येथुन ६,१२,१०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात येऊन आरोपी नामदेव गजानन उमाळे वय ३४ वर्ष रा. सवासनी ता. मंगरूळपिर, सूमित दिपक माहूरे वय २७ वर्ष रा. शिंदे नगर मंगरूळपिर, महादेव केशव कवर वय ५९ वर्ष रा. नविन खोनखास, पवन सूधाकर खाडे वय ३६ वर्ष रा.शहापूर मंगरूळपिर, योगेश राजाभाऊ बंगाळे वय ५० वर्षे रा.जि.प हायस्कूलमागे मंगरूळपिर, विजय शांतीलाल दावडा वय ७० वर्ष रा. कल्याणी चौक मंगरूळपिर, विनोद सत्यनारायण वर्मा वय ४२ वर्ष रा.जि.प शाळेमागे मंगरूळपिर, रमजान अन्नू परसूवाले. वय ४२ वर्षे रा. कोळंबी, संतोष शामराव वानखडे वय ४० वर्ष रा. मंगलधाम मंगरूळपिर, हनिफ अशरफ शेख वय ३८ वर्ष रा. अशोक नगर मंगरूळपिर, गूलाबराव जयसिंगराव खैरे वय ७० वर्षे रा. वार्ड क्र १ मंगरूळपिर, साबीर अय्यूब मोहनावाले वय ४२ वर्ष रा. कोळंबी, दिपक दत्तात्रय वाघ वय २० वर्ष रा. कल्याणी चौक मंगरूळपिर, सागर डिगांबर लूंगे वय २२ वर्ष रा. पारवा ता. मंगरूळपिर, अशोक महादेवराव परळिकर वय ५२ वर्ष रा. मंगरूळपिर, भागवत शामराव लांबाळे वय ५२ वर्ष रा.पार्डी ताड ता. मंगरूळपिर, शेख जावेद शेख सत्तार वय ४३ वर्ष रा. मानोरा चौक , मंगरूळपिर, रहीम तूकडया नानगीवाले वय ३४ वर्ष रा. गवळीपूरा मंगरूळपिर, गणेश नारायण मोरे वय ३४ वर्ष रा. संभाजी नगर मंगरूळपिर यांचेवर कलम ४,५ महाराष्ट्र जुगार कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे.

### शेलूबाजारात जुगारावर छापा: सात जणांवर गुन्हा

**वाशिम :** मंगरूळपीर तालुक्यातील शेलुबाजार येथे पोलिसांनी २४ जुलै रोजी सायंकाळी धाड टाकून सात जणांवर गुन्हा दाखल केला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार सरकार तर्फे तक्रारदार स.पो.नी.गणेश एकनाथ काळे वय ३९ वर्ष,पोलीस स्टेशन मंगरूळपिर यांनी तक्रार दिली की,२४ जुलै चे सायंकाळी सहा वाजता चे दरम्यान शेलुबाजार येथे दौलतराव इंगोले यांच्या दुमजली इमारतीचे पहिल्या मजल्यावर जुगारावर धाड टाकली असता रोख ९०२० रुपये व जुगार साहित्य असा एकूण २५,२०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून आरोपी प्रकाश विश्वनाथ डहाके ( वय ५२ वर्ष रा मसोला ता मंगरूळपिर,) नारायण सहदेव इंगळे (वय ५७ वर्ष रा.आठवडी बाजाराच्या पाठिमागे शेलूबाजार ता. मंगरूळपिर), नारायण लक्ष्मण तिवाले (वय ५५ वर्ष रा . जनूना खूर्द ता मंगरूळपिर), बेबिचंद तूकाराम राठोड (वय ३७ वर्ष रा. माळशेलू ता. मंगरूळपिर, ) सतिश रामकृष्ण मूखमाले (वय ३८ वर्ष रा. वनोजा ता मगरूळपिर, ) फरार आरोपी दौलतराव इंगोले (वय ५० वर्ष रा.शेलूबाजार ता. मंगरूळपिर,) व सदानंद चक्रनारायण ( वय ५७ वर्ष रा शेलूबाजार ता. मंगरूळपिर) यांचेवर कलम ४,५ महाराष्ट्र जुगार कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## युवकाने पेट्रोल प्राशन केल्याची धक्कादायक घटना

**दै. अजिंक्य भारत** । प्रतिनिधी

**कारंजा, दि. २५ :** कारंजा तालुक्यातील वाल्हई शिवारात २४ जुलै रोजी एका युवकाने पेट्रोल प्राशन केल्याची धक्कादायक घटना घडली असून, त्याची प्रकृती गंभीर आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, युवकाने पेट्रोल प्राशन केल्याचे लक्षात येताच कुटुंबीयांनी तातडीने त्याला कारंजा उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र, उपचारादरम्यान त्याची प्रकृती चिंताजनक असल्याचे लक्षात आल्याने, पुढील वैद्यकीय उपचारासाठी अकोला येथील रुग्णालयात हलवण्यात आले. युवकाने टोकाचे पाऊल उचलण्यामागचे नेमके कारण स्पष्ट झालेले नाही. या घटनेची पोलिस स्टेशनला नोंद नसल्याने युवकाचे नाव कळू शकले नाही.

## कन्या भ्रूणहत्या रोखण्यासाठी माहिती दिल्यास १ लाखाचे बक्षीस



**दै. अजिंक्य भारत** । प्रतिनिधी

**वाशिम, दि. २५ :** जिल्ह्यात कन्याभ्रूणहत्येचा धोका रोखण्यासाठी जिल्हा प्रशासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचललं असून, लिंग निदान प्रतिबंधक कायदा (पीसीपीएनडीटी) व वैद्यकीय गर्भपात कायदा (एमटीपी) अंतर्गत अनधिकृत गर्भलिंग तपासणीविरोधात माहिती देणाऱ्यांना १ लाखाचं बक्षीस जाहीर करण्यात आलं आहे. ही माहिती जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अनिल कावरखे यांनी दिली.

२४ जुलै रोजी जिल्हा सामान्य रुग्णालयात झालेल्या जिल्हा सल्लागार समितीच्या बैठकीत डॉ. कावरखे बोलत होते. या बैठकीस समिती अध्यक्षा डॉ. अल्का मकासरे, डॉ. जे.एस. बाहेती, डॉ. जया बिबेकर, ॲड. जी.डी. गंगावणे, डॉ. उज्वला गिऱ्हे, डॉ. शिवनंदा आमले, विधी सल्लागार ॲड राधा नरवलीया आदींची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. कावरखे यांनी सांगितले की, लिंगनिवड चाचण्या थांबवण्यासाठी डिकॉय केस योजनेअंतर्गत गर्भवती महिलेस किंवा खात्रीशीर माहिती देणाऱ्या नागरिकाला बक्षीस देण्यात येईल. ही माहिती गोपनीय ठेवली जाईल व संबंधितांची ओळखही सुरक्षित राहील. गर्भधारणेपूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्रज्ञान (लिंगनिवडीस प्रतिबंध) कायदा किंवा वैद्यकीय गर्भपात कायद्यान्वये राबविण्यात आलेल्या यशस्वी कारवाईबाबत माहिती देणाऱ्याला सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत ₹१ लाखाचं बक्षीस देण्यात येणार आहे.

### जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस म्हणाल्या...

कन्याभ्रूणहत्या ही केवळ कायद्याचा विषय नसून, ती सामाजिक जागृतीची गरज आहे. अशा कृत्यांविरोधात नागरिकांनी माहिती दिल्यास एका चिमुकल्याचे प्राण वाचू शकतात. समाजाचा दृष्टिकोन बदलण्यासाठी ही योजना प्रभावी ठरेल.

## गवळी समाज संघटनेच्या प्रदेश उपाध्यक्षपदी मुकेश चौधरी



**वाशिम :** महाराष्ट्र गवळी समाज संघटनेचे राज्यस्तरीय अधिवेशन नुकतेच जालना येथे संपन्न झाले. यामध्ये वाशिम शहरातील सामाजिक कार्यकर्ते मुकेश चौधरी यांची महाराष्ट्र गवळी समाज संघटनेच्या प्रदेश उपाध्यक्ष पदावर नियुक्ती करण्यात आली. यावेळी माजी केंद्रीय मंत्री हंसराज अहिर यांनी चौधरी यांचे नावाची घोषणा केली. यावेळी मंचावर प्रदेशाध्यक्ष हिरामण गवळी, उपाध्यक्ष वसंत गवळी आदी उपस्थितीत होते. मुकेश चौधरी हे विविध सामाजिक उपक्रमात सदैव तत्पर असतात. यामुळे विविध सामाजिक संघटना आणि राजकीय पक्षांमध्ये त्यांची कारकिर्द स्वच्छ प्रतिमेची आहे. चौधरी यांच्यावर विविध क्षेत्रातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## जीवितहानी झाल्यावरच महामार्गामधील भेग बुजविणार काय?

**दै. अजिंक्य भारत** । प्रतिनिधी



**मानोरा, दि. २५ :** शहरापासून जवळपास एक किलोमीटर अंतरावर असलेल्या भोयर इंटरप्रायजेश पासून देवठाणा या गावाकडे जिथे फाटा फुटतो त्या उतारावर राष्ट्रीय महामार्ग विकास प्राधिकरण द्वारा निर्मित महामार्गाच्या मध्यभागी पडलेली भेग दिवसेंदिवस धोकादायक बणत असून अनेक दुचाकी, तीन चाकी स्वारांचे यामुळे पडून अपघात झाले असून जीवित हानी झाल्यावरच या धोकादायक भेगेची दुरुस्ती सबंधित विभाग करेल काय ? असा प्रश्न व विचारणा स्थानिक शहरवासी व बाहेरगावावरून येजा करणाऱ्या वाहन चालकांकडून करण्यात येत आहे.

अकोला आर्णी राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६१ ए मानोरा शहराच्या मध्यभागातून गेलेला असून मानोरा मंगरूळनाथ रस्त्यावर देवठाणा फाट्यालगत उतारावर या महामार्गाच्या उजव्या आणि डाव्या मार्गीकेच्या मधोमध मोठी भेग पडलेली आहे ज्यामुळे मंगरूळनाथ कडे जाणाऱ्या व मानोराकडे येणाऱ्या दुचाकी स्वारांसाठी आणि प्रवासी वाहतूक करणाऱ्या तालुक्यातील रिक्षांसाठी सुद्धा ही भेग अपघातास निमंत्रण देऊन धोक्याची ठरत आहे. महामार्गाच्या मधोमध पडलेल्या या भेगेमुळे अनेक दुचाकी स्वार आतापर्यंत पडून जखमी झालेले आहे.

## ४३ उमेदवारांना मिळाला तत्काळ रोजगार!

### रोजगार मेळावा: १५६ उमेदवारांचा सहभाग

**दै. अजिंक्य भारत** । प्रतिनिधी





**वाशिम, दि. २५ :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून २२ जुलै २०२५ रोजी संपूर्ण महाराष्ट्रात १०० रोजगार मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले. त्याचाच एक भाग म्हणून वाशिम येथे जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि सन्मती इंजिनिअरिंग कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला.

या मेळाव्याचे उद्घाटन विधानसभा सदस्य आ. श्याम खोडे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुकुंद एज्युकेशन सोसायटीच्या सचिव तसेच वैशाली बायो फ्युएल प्रा. लि., वाशिमच्या संचालक वैशाली पवार होत्या. यावेळी सहाय्यक आयुक्त प्रवीण खंडारे, कौशल्य विकास अधिकारी जितेंद्र गायकवाड, वैशाली पवार, आणि सन्मती इंजिनिअरिंग कॉलेजचे संचालक प्रसन्ना वालचाळे उपस्थित होते.यावेळी पुरुषोत्तम चितलांगे, अशोक हेडा व महिला पदाधिकारी उपस्थित होते.

या मेळाव्यात ९ नियोक्ते सहभागी झाले होते. जिल्हाभरातून १५६ उमेदवारांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला. त्यापैकी ४३ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दीपक भोळसे यांनी केले आणि उपस्थितांचे आभार कौशल्य विकास अधिकारी वैशाली पवार यांनी मानले.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रदीप नेमाडे, संजय उगले, आकाश जयस्वाल, सिद्धेश्वर खेडेकर, हिम्मत राऊत, अमोल मरेवाड, दयानंद घोडके आणि मनीष पवार यांनी मेहनत घेतली.

## अपघात नियंत्रणासह पूरस्थिती हाताळण्यास प्रशासन सज्ज

### जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक

**दै. अजिंक्य भारत** । प्रतिनिधी



**वाशिम, दि. २५ :** जिल्ह्यातील पूरपरिस्थिती, रस्त्यांची झालेली पडझड आणि वाढती अपघातांची संख्या या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस यांच्या अध्यक्षतेखाली आज जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक पार पडली.

या बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता शुभम जोशी, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी संग्रामकुमार जगताप तसेच विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. बैठकीत जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस म्हणाल्या, जिल्ह्यातील अपघातांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून हे चिंतेचे कारण आहे. अपघात कमी करण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी एकत्रितपणे काम करावे. वाहतुकीचे योग्य नियोजन, रस्त्यांची दुरुस्ती, संकेतस्थळांवर सूचना फलक लावणे, व जनजागृती मोहिमा राबवणे आवश्यक आहे. बैठकीत पूरग्रस्त भागात तातडीने मदत पोहोचवण्याच्या सूचना देण्यात आल्या. नागरिकांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर, अन्न व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, आरोग्य सुविधा व तात्पुरती निवास व्यवस्था यासाठी आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेला सज्ज ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. सार्वजनिक बांधकाम विभागाने जिल्ह्यातील नुकसानग्रस्त रस्त्यांचा अहवाल सादर केला असून, तातडीच्या दुरुस्ती कामांकरिता निधीची मागणी करण्यात येणार आहे. परिवहन विभागाने अपघातप्रवण ठिकाणी विशेष तपासणी मोहिम राबवावी, असे सांगण्यात आले. बैठकीदरम्यान जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस यांनी बांधकाम विभाग व एनएचआय विभागाला निर्देश दिले की, जिल्ह्यातील अपूर्ण पुलांचे काम तात्काळ पूर्ण करावे. काही भागात नागरिकांना दरवर्षी पावसाळ्यात मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागते. पुलांचे काम लांबणीवर टाकणे हे सार्वजनिक हिताच्या विरोधात आहे, असेही त्यांनी नमूद केले. त्या पुढे म्हणाल्या, जिल्ह्यात अपघातांचे प्रमाण वाढत असून अनेक ठिकाणी रस्त्यांची दुरवस्था आणि अपूर्ण पायाभूत सुविधा हे त्यामागील प्रमुख कारणे आहेत. संबंधित विभागांनी तात्काळ कृती आराखडा सादर करून कामे युद्धपातळीवर पूर्ण करावीत. बैठकीत पूरग्रस्त भागात आपत्ती व्यवस्थापनाच्या तयारीवरही सविस्तर चर्चा झाली. प्रशासनाचे नागरिकांना आवाहन: पूर किंवा अपघातप्रवण भागात अत्यावश्यक कारणांशिवाय प्रवास करू नये. प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे. मदतीसाठी नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा. बैठकीच्या शेवटी नागरिकांना सुरक्षिततेसंबंधी सूचना देत सांगितले की, आपत्ती काळात अफवांपासून दूर राहा, प्रशासनाशी सहकार्य करा आणि नियंत्रण कक्षाशी संपर्कात रहा असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले.

## फुले दाम्पत्यांचे स्मारक उभारण्यासाठी सावता परिषदेची स्वाक्षरी मोहीम

**दै. अजिंक्य भारत** । प्रतिनिधी

**वाशिम, दि. २५ :** स्त्रीयांना समानतेचे अधिकार देवून स्त्री जनशक्तीला शिक्षीत व साक्षर करणारे क्रांतीसुर्य महात्मा ज्योतीबा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे भव्यदिव्य स्मारक दिघेवाडी येथील नगर परिषद शाळेत बांधण्याकरीता माळी समाजासह सर्व समाजबांधवांनी पुढाकार घ्यावा यासाठी सावता परिषदेच्या वतीने स्वाक्षरी मोहीम सुरु केल्याची माहिती सावता परिषदेचे जिल्हा उपाध्यक्ष रवि वानखेडे व शहराध्यक्ष चेतन संतोषराव इंगोले यांनी दिली.

स्त्री शिक्षणाच्या पुरस्कर्त्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी पुण्यात मुलींची पहिली शाळा उघडून स्त्रियांना खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य व समानतेचा अधिकार दिला. तसेच आपल्या कालखंडामध्ये फुले दाम्पत्यांनी शहरातील जुन्या नगर परिषद जवळील दिघेवाडी येथे मुलामुलींची पहिली शाळा सुरु केली होती. आपल्या हयातीत त्यांनी स्त्रीयांना समानतेचे अधिकार देवून स्त्री जनशक्तीला शिक्षीत व साक्षर केले आहे. त्यांच्या या महान कार्याला कायमस्वरुपी अभिवादन व आदरांजली म्हणून जिल्हयातील माळी समाज व इतर सर्व समाजबांधवांच्या सहयोगातून दिघेवाडी येथील नगर परिषद शाळेत फुले दाम्पत्यांचे भव्यदिव्य स्मारक उभारण्याकरीता पुढाकार घ्यावा. तसेच ही जागा स्मारकाकरीता राखीव करुन स्मारक बांधकामाकरीता सरकारकडून निधी मिळावा याकरीता सावता परिषदेच्या वतीने स्वाक्षरी मोहीम हाती घेण्यात आली आहे.

अजिंक्य भारत

# आपला जिल्हा

अकोला । शनिवार, दि. २६ जुलै २०२५



## थोडक्यात

### अण्णाभाऊ साठे जयंतीदिनी मद्यविक्री बंद करा: पालकमंत्र्यांना निवेदन

**देवरी** : संपूर्ण देशामध्ये डॉ. लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची जयंती जनमानसांपासून तर विविध क्षेत्रांमध्ये साजरी करण्यात येते. आणि याच दिवशी अकोला जिल्ह्याच्या ठिकाणी ग्रामीण व शहरी भागातील विविध जाती-धर्मांची मंडळी प्रामुख्याने अण्णाभाऊ साठे जयंती महोत्सवाला हजर असतात. अकोला शहरांमधून रॅलीचेसुद्धा आयोजन करण्यात येते व अण्णाभाऊ साठे चौक रेल्वे स्टेशन या ठिकाणी समारोप करण्यात येतो. त्याच चौकात अनेक मद्यविक्रीची दुकाने आहेत, त्यामुळे अण्णाभाऊ साठे चौक रेल्वेस्टेशन परिसरातील दुकाने बंद ठेवावी आणि विविध ठिकाणी दारू विक्रीचे व्यवसाय नियमितप्रमाणे चालू राहतात. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त मद्य विक्री दुकाने बंद ठेवावीत, असे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अकोला जिल्हा सचिव ग्रामीण शंकरराव कंकाळ यांनी पालकमंत्री अकोला यांना निवेदन देऊन मागणी केली आहे.

### शिवपूर येथे नागपंचमीनिमित्त चैनुजी महाराज यात्रा महोत्सव



**अकोट** : तालुक्यातील ग्राम शिवपूर येथील नागपंचमीनिमित्त चैनुजी महाराज यांची यात्रा २९/७/२०२५ रोजी साजरी होणार आहे. या दिवशी सकाळी गावातून वाजत गाजत भक्तिमय वातावरणात श्री चैनुजी महाराजांच्या मूर्तीची पालखीत मिरवणूक निघणार आहे. पालखी मंदिरात आल्यावर पूजा -अर्चना, आरती होईल व गोपालकाला होईल.तसेच दुपारी २ वाजतापासून भक्तांसाठी महाप्रसाद सुरू होईल. पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी श्रींच्या दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा.तसेच दिंड्या,भजनी मंडळ, बँडवाले ,डफडेवाले, हॉटेलवाले, दुकानदार यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून यात्रेची शोभा वाढवावी.यात्रा २९व ३० जुलै असे दोन दिवस राहील. यात्रेनिमित्त अकोट ते शिवपूर ज्यादा बसेसची व्यवस्था अकोट आगाराने केलेली आहे, अशी माहिती गावकऱ्यांच्यावतीने कळविण्यात आली आहे.

### संत सावता महाराज पुण्यतिथी

**आलेगाव** : येथील कानिफनाथ महाराज मंदिरामध्ये ह.भ.प.कानिफनाथ महाराज भजनी मंडळातर्फे श्री संत सावता महाराज यांची पुण्यतिथी संपन्न करण्यात आली. श्री संत सावता शिरोमणी महाराज हे वारकरी संप्रदायातील एक संत होते. त्यांचा जन्म १२ व्या शतकामध्ये झाला. ते एक शेतकरी होते. ते विठ्ठलाचे निस्सीम भक्त होते.कर्म हेच ईश्वरपूजा यावर त्यांचा अगाध विश्वास असल्यामुळे ते शेतीकाम करताना विठ्ठलाच्या भक्तीमध्ये तल्लीन होऊन जायचे. ते उत्तम मराठी कवी व अभंग रचनाकार होते. त्यांनी आपल्या ज्ञानातून सर्वसामान्यांना आत्मोन्नतीचा मार्ग दाखविला. अशा श्री संत शिरोमणी सावता महाराज यांचे विचार तेवत रहावे, या अनुषंगाने येथील श्री कानिफनाथ भजनी मंडळाने २३ जुलै त्यांच्या पुण्यतिथी निमित्त कानिफनाथ महाराज मंदिरामध्ये त्यांच्या प्रतिमेचे भाविक भक्तांनी पूजन केले व पालखीसह गावातून मिरवणूक काढण्यात आली असता, चौकाचौकामध्ये महिलांनी पालखीचे स्वागत करून पूजा-अर्चा केली. मिरवणुकीमध्ये भजनी मंडळ यांनी श्री संत सावता महाराज यांचा जयजयकार करून त्यांच्या अभंगाचे काव्य वाचन केले.

## निधन वार्ता

### प्रमिला दहीभात



**मुंडगाव** : येथील प्रतिष्ठित नागरिक शरद रामदास दहीभात यांच्या आई प्रमिला रामदास दहीभात यांचे दीर्घ आजाराने निधन झाले.त्यांच्यावर मुंडगाव येथील स्मशानभूमीत अंत्य संस्कार २५ जुलै रोजी करण्यात आला. त्यांच्या पश्चात पती, मुलगा, मुलगी, सून, जावाई, नातवंडे असा बराच मोठा आप्त परिवार आहे.

### ज्ञानदेव फोकमारे



**देवरी:** ह. भ .प. ज्ञानदेव रामराम फोकमारे हे अनंतात विलीन झाले असून, त्यांचे ८० वर्षांचे वय होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगी व तीन मुलं, नातवंड असा आप्तपरिवार आहे.

### मधुकर पिंपळे



**मुंडगाव:** येथील प्रतिष्ठित नागरिक व वारुळा जि. प.शाळेचे शिक्षक अनिल मधुकर पिंपळे यांचे वडील मधुकर मिराजी पिंपळे यांचे वयाच्या ८० व्या वर्षी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा २५ जुलै रोजी मुंडगाव येथील स्मशानभूमीत पार पाडण्यात आली. त्यांच्या पश्चात दोन मुले, मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा बराच मोठा आप्त परिवार आहे.

# घरकुल योजनेचे अनुदान देण्यासाठी ऑपरेटर नाही

## लाभार्थ्यांना धनादेश येत नसल्याची तक्रार उपमुख्यमंत्र्यांकडे !

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**बाळापूर, दि. २५ :** पी.एम आवास योजना, रमाई आवास योजनेच्या लाभार्थ्यांना घरकुल संपूर्ण बांधकाम होईपर्यंत टप्याटप्याने अनुदानाचे धनादेश जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडून गट विकास अधिकाऱ्यांमार्फत दिले जातात. त्यामध्ये पहिला टप्पा प्लिंथ लेवलवर दिला जातो तर दुसरा टप्पा हा संपूर्ण भिंती उभ्या झाल्यावर दिला जातो आणि शेवटी अत्यावश्यक असलेल्या संडास, बांधरूम बांधणे झाल्यावर दिला जातो; मात्र तालुक्यातील लाभार्थ्यांना ७ ते ८ महिन्यानंतर अजूनही धनादेश किंवा टप्पा मिळत नसल्याच्या तक्रारी ग्रामपंचायतकडे येत असल्यामुळे ग्रामपंचायत वाडेगावने गट विकास अधिकारी कार्यालयाकडे संपर्क केला असता, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणाकडून ऑपरेटर उपलब्ध झाला नसल्याने अनुदानाचे टप्पे लाभार्थ्यांना देणे शक्य नसल्याचे कारण देत जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणाकडून ऑपरेटर उपलब्ध होताच अनुदानाचे धनादेश सोडण्यात येतील. असे उत्तर बाळापूर पंचायत समितीचे गट विकास अधिकारी बंडू पजई यांनी सांगितले. त्यामुळे ग्रामपंचायत वाडेगावने उपमुख्यमंत्री यांच्याकडे तक्रार केली आहे.

पी.एम.आवास योजना, रमाई आवास योजनेच्या लाभार्थ्यांना घरकुल अनुदानाचा काहींना पहिला टप्पा मिळला तर काहींना दुसरा टप्पा मिळाला तर काहींना अजूनही पहिला टप्पा मिळून ६ ते ७ महिने उलटून गेल्यावरही आतापर्यंत टप्प्याची रक्कम मिळाली नसल्याने घरकुल बांधावे तरी कसे? असे प्रश्न अनेकांसमोर उपस्थित झाल्यामुळे लाभार्थी ग्रा.पं. कार्यालयात येवून सचिव व सरपंचाला विचारणा करीत आहेत. घरकुल लाभार्थ्यांची पंचायत समिती अभियंता पवन माथरमारे (पाटील) यांनी जिओ टॅकींग केल्यावरही बाळापूर पंचायत समिती टप्पे टाकत नसल्यामुळे ग्रामपंचायतने उप-मुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे तक्रार केल्याचे पत्र प्राप्त झाले. तर गावामध्ये गरीब लोकांच्या घरकुलाची संख्या मोठी आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने लोकांना राहण्याकरिता घरे नाहीत व पैसे नसल्याने घरकुलसुद्धा पूर्ण करता येत नाही, तर काहींचे घरकुले पूर्ण होत आले तरीसुद्धा बाळापूर पं.स. टप्पे टाकत नसल्याची तक्रार ग्राम पंचायतने केली आहे.

> जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणांकडून नेमलेले ऑपरेटर काही कारणास्तव निघून गेल्याने लाभार्थ्यांची मोठ्या प्रमाणात आर्थिक अडचण झाली आहे आणि आता जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणांकडून येणारा ऑपरेटर उपलब्ध झाल्यावर आम्ही लवकरात लवकर हप्ते सोडू.
>
> **- बंडू पजई**
> गटविकास अधिकारी
> पंचायत समिती, बाळापूर.

### शेतरस्त्याच्या समस्या सोडविण्यासाठी स्थळ पाहणीचे आदेश: तहसीलदार चव्हाण



**अकोट** : आज पोपटखेड रोडवरील अकोट तहसील कार्यालय येथे शेतरस्त्याच्या संदर्भात सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेमध्ये शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन करून तलाठ्यांना शेतरस्त्याबाबत स्थळ पाहणी करण्याचे आदेश देण्यात आले आहे. यावेळी व्यासपीठावर उपविभागीय अधिकारी मनोज लोणारकर, तहसीलदार डॉ.सुनील चव्हाण,नायब तहसीलदार,शिवपांदन रस्ता समिती प्रमुख प्रा.अरुण हिंगणकर,बंडू बोरोकार यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.आजच्या सभेत एकूण ४४ शेतकऱ्यांनी शेतरस्त्यासंदर्भात आपल्या तक्रारी नोंदविल्या होत्या. त्यापैकी काही समस्या सोडविण्यासाठी स्थळ निरीक्षण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तर काही शेतकऱ्यांना शेतरस्ताबाबत योग्य असे मार्गदर्शन करण्यात आले आहे. तसेच शेतरस्त्याच्या समस्या सोडविण्यासाठी गावकऱ्यांनी सहकार्य करावे, असे आवाहन अकोट उपविभागीय अधिकारी मनोज लोणारकर यांनी केले. या कार्यक्रमासाठी अकोट तालुक्यातील सर्व समस्याग्रस्त शेतकरी बांधव, मंडळ अधिकारी, तलाठी, रस्ता समितीचे पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

## जि. प. ऊर्दू प्राथ. शाळेत पाण्याची टाकी बांधून दिली दान!

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**मुंडगाव, दि. २५ :** अकोट तालुक्यातील संत नगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंडगाव येथील बालेखान अब्दुलाखान यांच्या स्मरणार्थ येथील सामाजिक कार्यकर्ता अजिज अहेमद यांनी मुंडगाव येथील जिल्हा परिषद ऊर्दू प्राथ. शाळेच्या आवारात विद्यार्थींना पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध व्हावी, यासाठी दान म्हणून १ हजार लिटर पाणी साठवण असलेली पाण्याची टाकी बांधून दिली. त्यामुळे आता येथील लहान लहान विद्यार्थ्यांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागणार नाही. मुंडगाव येथे १५ दिवसानंतरच नळांना पाणी मिळते व जेव्हा पाणी पुरवठा योजनेचे पाणी येते त्यावेळी शाळा बंद असते व शाळेत पाणी नसल्याने विद्यार्थी पाण्यासाठी वणवण भटकत होते, ही विद्यार्थ्यांची समस्या पाहून येथील सामाजिक कार्यकर्ता अजिज अहेमद यांनी आपल्या आजोबांच्या स्मरणार्थ स्वखर्चाने पाण्याची टाकी बांधून दिली व विद्यार्थ्यांना पिण्यासाठी पाण्याची व्यवस्था करून दिली, यासाठी येथील शिक्षक ऐजाजअली, मुख्याध्यापक महम्मद शफीक,अबरार शाह, महम्मद इजाज, अफजल शाह, जाकीर हुसेन, आसिफ खान, नुसरत अली यांचेसुद्धा मार्गदर्शन लाभले तसेच येथील प्रभारी सरपंच तुषार पाचकोर, सदस्यपती इम्रान खान, सदस्य नितीन गाडगे, सुभाष इंगळेसह असंख्य नागरिकांच्या उपस्थितीत हे पाण्याच्या टाकी बांधून शाळेला दान दिल्याने विद्यार्थ्यांची पिण्याच्या पाण्याची समस्या कायमची सुटली आहे.

## सर्रासपणे बसविल्या जात असलेल्या स्मार्ट मीटरला विरोध

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अडगाव बु., दि. २५ :** स्मार्ट मीटरच्या नावाखाली कंत्राटदाराच्या माणसांकडून सर्रासपणे मीटर लावण्याचा सपाटा अडगाव बु. ३३ केव्ही उपकेंद्रांतर्गत सुरू असल्याने विद्युत ग्राहकांमध्ये असंतोषाचे वातावरण पसरले आहे. अडगाव बु. ३३ केव्ही उपकेंद्रांतर्गतच्या १४ गावात साडेअकराशे पेक्षा जास्त स्मार्ट मीटर लावण्यात आले आहेत. व्यवस्थितपणे सुरू असलेले मीटर काढून त्या ठिकाणी सर्रासपणे स्मार्ट मीटर लावण्याचे काम जीनस कंपनी बिनधास्तपणे करीत आहे. याबाबत विद्युत ग्राहक अन्याय निवारण मंचच्यावतीने स्मार्ट मीटरला नकारची भूमिका घेऊन कार्यकारी अभियंता अनिल उइके याची भेट घेऊन सक्तीने बसविल्या जात असलेल्या स्मार्ट मीटरबाबत तक्रार केली असता, सर्वसामान्य ग्राहकांकडे स्मार्ट मीटर लावल्या जाणार नाही, यात फक्त शासकीय कार्यालये, नवीन विद्युत कनेक्शन, सौर ऊर्जा युनिट बसविलेल्या ठिकाणी व दोषपूर्ण मीटर (फॉल्टी) असलेल्या ठिकाणीच स्मार्ट मीटर लावले जातील, ही बाब स्पष्ट केली. विद्युत विभागाकडून स्मार्ट मीटरच्या कंत्राटदाराला त्यांनी ठरलेल्या पॉलिसीशिवाय कुठेही चुकीच्या पद्धतीने स्मार्ट मीटर बसवू नये, अशी स्पष्ट ताकीद द्यावी, अन्यथा कंत्राटदारावर कारवाई केल्या जाईल, याची त्यांना जाणीव करून द्यावी, अशी मागणी विद्युत ग्राहक अन्याय निवारण मंचच्यावतीने दिलेल्या निवेदनातून केली आहे. ठरलेल्या पॉलिसीशिवाय चुकीच्या पद्धतीने लावलेले सर्व स्मार्ट मीटर त्वरित न काढल्यास विद्युत ग्राहक अन्याय निवारण मंचच्यावतीने विद्युत कार्यालयासमोर आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा विद्युत ग्राहक अन्याय निवारण मंचच्यावतीने सरपंच अशोक घाटे, माजी जि. प. सदस्य मनमोहन व्यास, माजी सभापती गोपाल कोल्हे, पत्रकार माणिक घाटे, तंटामुक्ती अध्यक्ष शहिदखा पठाण, उपसरपंच गुलाम आरीफ, अजय धाके, राहुल घोडेस्वार यांनी कनिष्ठ अभियंता प्रशांत पाटील यांना दिलेल्या निवेदनातून दिला आहे.

> कुठेही सर्वसामान्य ग्राहकांकडे स्मार्ट मीटर लावल्या जाणार नाहीत. फक्त नवीन विद्युत कनेक्शन, सौर ऊर्जा युनिट बसविलेल्या ठिकाणी, शासकीय कार्यालये व दोषपूर्ण मीटर असेल तिथेच स्मार्ट मीटर लावल्या जातील, याशिवाय चुकीचे ठिकाणी सर्रासपणे स्मार्ट मीटर लावले असतील त्याची चौकशी करून योग्य ती कार्यवाही केली जाईल.
>
> **- अनिल उइके**
> कार्यकारी अभियंता (ग्रामीण) अकोट.

## शिर्ला ग्रामपंचायतीतील रोजगार हमी योजनेत दोन कोटींचा गैरव्यवहार?

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**पातूर, दि. २५ :** पातूर तालुक्यातील शिर्ला ग्रामपंचायत अंतर्गत सुरू असलेल्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या (मनरेगा) ७ शेतरस्त्यांच्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार झाल्याची गंभीर तक्रार समोर आली आहे. या कामांमध्ये जवळपास २ कोटी रुपयांहून अधिक शासकीय निधीच्या अपहाराचा आरोप करण्यात आला आहे. या संदर्भात सुरेंद्र रामदास उगले (रा. मंडळी ता. पातूर) यांनी सविस्तर तक्रार अर्ज जिल्हा प्रशासनाकडे सादर केला होता.

उपजिल्हाधिकारी (रोहयो), अकोला यांच्या पत्रानुसार संबंधित तक्रारीची सखोल चौकशी करून योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देश गटविकास अधिकारी, पंचायत समिती पातूर यांना देण्यात आले आहेत. तक्रारीत गंभीर आरोप करण्यात आले असून, अनेक खोट्या जॉबकार्ड्स तयार करण्यात आले असून, हे जॉबकार्ड श्रीमंत, अपंग, वयोवृद्ध आणि काम करण्यास अक्षम व्यक्तींच्या नावाने बनवले गेले असल्याचे नमूद करण्यात आले आहे. वास्तविक मजुरांना काम देण्याऐवजी जेसीबी व अन्य यंत्रसामग्रीद्वारे कामे पूर्ण करून शासनाच्या उद्दिष्टांना हरताळ फासल्याचा आरोपही करण्यात आला आहे. या प्रकरणात संबंधित ग्रामपंचायतीकडून किंवा विभागाकडून आजतागायत कोणतीही अधिकृत माहिती किंवा खुलासा देण्यात आलेला नसल्याने तक्रारदारांनी ही बाब अधिक गंभीर मानली जात आहे. या प्रकरणाचा सखोल तपास होऊन दोषींवर तत्काळ कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी ग्रामस्थांतून होऊ लागली आहे. ग्रामविकास योजनांची सर्रास लूट होत असल्याने जिल्हा प्रशासनाने लक्ष घालण्याची गरज निर्माण झाली आहे.

## कालवाडी येथे किसान गोष्टी कार्यक्रम संपन्न

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोट, दि. २५ :** कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा अंतर्गत आत्मा प्रकल्प संचालक अकोलाचे डॉ.मुरली इंगळे, उपसंचालक डॉ.प्रेमसिंग मारग,उपविभागीय कृषी अधिकारी अकोट तुषार ढंगारे,अकोट तालुका कृषीधिकारी कु.अश्विनी बिराजदार यांच्या मार्गदर्शनात सेवा सहकारी सोसायटी सभागृह, कालवाडी येथे कापूस, सोयाबीन,तूर पीक लागवड तंत्रज्ञान व कीड रोग व्यवस्थापन या विषयावर क्षेत्रिय दीन/किसान गोष्टी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

प्रास्ताविक व सूत्रसंचालन मंडळ कृषी अधिकारी जी.बी. निगुडे यांनी केले. आभार सहायक तंत्रज्ञान व्यवस्थापक (आत्मा) राहुल अडाणी यांनी मानले. कृषी विज्ञान केंद्र अकोला येथील कुलदीप देशमुख (विषय विशेषज्ञ कृषी विद्या) यांनी कापूस,सोयाबीन,तूर,पीक लागवड तंत्रज्ञानबाबत सविस्तर माहिती दिली.डॉ.चारुदत्त ठिपसे (विषय विशेषज्ञ कीटकशास्त्र) यांनी कापूस सोयाबीन,तूर पीक किड रोग व्यवस्थापन,जैविक खते वापर व महत्त्व इत्यादी विषयावर मार्गदर्शन केले. उपविभागीय कृषी अधिकारी तुषार ढंगारे व तालुका कृषी अधिकारी कु.अश्विनी बिराजदार यांनी कृषी विभागाच्या विविध योजनांबाबत सविस्तर माहिती दिली व तसेच शेतकऱ्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांबाबत उत्तरे दिलीत. तालुक्यातील प्रगतशील शेतकरी सुरेंद्र जायले (मक्रमपूर), जगन बगाडे (खापरवाडी) यांनी शेतीमध्ये करीत असलेले शेती विषयक प्रयोग, नैसर्गिक शेती इत्यादी विषयांवर शेतकऱ्यांना माहिती दिली. संचालक-अमृततीर्थ फार्मर प्रोड्युसर कंपनी अकोलखेड येथील सुहास तेल्हारकर व अध्यक्ष श्री लक्ष्मीमाता शेतकरी उत्पादक गट अडगाव बु.चे रमेश धुळे यांनी कंपनी व गटामार्फत राबविलेले उपक्रम तसेच राबविण्यात येत असलेले उपक्रम याबाबत माहिती दिली. श्री संत तुकाराम महाराज शेतकरी उत्पादक गट कालवाडी या गटाचे अध्यक्ष प्रा.अरुण हिंगणकर यांनी देखील मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाला आत्मा समिती अकोट अध्यक्ष अशोक गावंडे, उपकृषी अधिकारी जी. आर. मुकुंदे, सहायक कृषी अधिकारी एस. एस. करवते, आर. एस. गरबडे, ओमप्रकाश मोहोड, पाणी फाउंडेशन तालुका समन्वयक जीवन गावंडे, आर. एन. उबरहंडे (उमेद अभियान, पंचायत समिती,अकोट)निखिल लाहे (लोकसंचालित साधन केंद्र, अकोट) डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन सन २०२३२४ अंतर्गत स्थापित गटाचे अध्यक्ष/सदस्य शेतकरी उत्पादक कंपनी संचालक,कृषी सेवा केंद्र प्रतिनिधी व कालवाडी तसेच तालुक्यातील विविध गावातील शेतकरी महिला, पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री संत तुकाराम महाराज शेतकरी उत्पादक गट कालवाडी या शेतकरी गटाचे अध्यक्ष प्रा.अरुण हिंगणकर व गटातील सदस्यांनी सहकार्य केले.सदर क्षेत्रीय दीन किसान गोष्टी कार्यक्रम समाप्तीनंतर सभागृहाच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

## हिरपूर येथे स्मशानभूमी मार्गावर लवकरच बांधण्यात येणार पूल!

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



अजिंक्य भारत
आपला जिल्हा
अकोला । गुरुवार, दि. १० जुलै २०२५
स्मशानभूमीकडे जाण्यासाठी करावे लागते नाल्याचे पाणी पार!
गावात मृत्यू म्हणजे केवळ शोक नाही, तर एक त्रासदायक प्रवासाची सुरुवात
दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**हिरपूर, दि. २५ :** मूर्तिजापूर तालुक्यातील हिरपूर गावातील स्मशानभूमीकडे जाणाऱ्या रस्त्याची दुरवस्था ही ग्रामस्थांसाठी गेल्या अनेक वर्षांपासूनची गंभीर समस्या बनली होती. विशेषतः पावसाळ्यात नाल्याच्या पुरामधून प्रेतयात्रा घेऊन जाणे हे ग्रामस्थांसाठी मानसिक व शारीरिक त्रासाचे कारण ठरत होते. ही बाब दै.अजिंक्य भारतने १० जुलै रोजी सचित्र वृत्त प्रकाशित करून अधोरेखित केली.

अजिंक्य भारत इम्पॅक्ट

या बातमीची आणि ग्रामस्थांच्या निवेदनाची दखल घेत आमदार हरीश पिंपळे यांनी सकारात्मक भूमिका घेत येणाऱ्या उन्हाळ्यापर्यंत पूल बांधण्याच्या कामास प्रारंभ केला जाईल, असे आश्वासन दिले. ग्रामस्थांनी २३ जुलै रोजी आमदारांची भेट घेऊन स्मशानभूमी रस्त्यावरील अडचणींबाबत सविस्तर निवेदन दिले. यावर आमदार पिंपळे म्हणाले, ''मी निवडणुकीत या स्मशानभूमीच्या कामाचे वचन दिले होते. लाडकी बहीण योजनेमुळे सध्या निधीअभावी नवीन कामे रखडली आहेत; मात्र हिरपूरसारख्या गरजू गावासाठी हे काम मी लवकरात लवकर सुरू करणार आहे.'' याप्रसंगी ग्रामस्थ प्रवीण धामणे, गजानन चौढाळे, अनिल ढगे, सागर वानखडे, मनोज ढगे, विनोद राजगुरे, संजय बुटे, मुकेश गुप्ता, अरुण फुलंब्रीकर, रामचंद्र गणेशपुरे, संजय चौढाळे, अक्षय गणोरकर, संतोष भालेराव, बाळू भालेराव, प्रवीण ढगे, अथर्व राजगुरे, विनोद गावंडे, विनोद पांडे आदी उपस्थित होते.

### दै.अजिंक्य भारतने पुन्हा एकदा जनतेच्या आवाजाला दिला मंच

मूर्तिजापूर तालुक्यातील हिरपूर गावातील स्मशानभूमीकडे जाणाऱ्या रस्त्याची दुरवस्था ही ग्रामस्थांसाठी गेल्या अनेक वर्षांपासूनची गंभीर समस्या बनली होती. विशेषतः पावसाळ्यात नाल्याच्या पुरामधून प्रेतयात्रा घेऊन जाणे हे ग्रामस्थांसाठी मानसिक व शारीरिक त्रासाचे कारण ठरत होते. ही बाब दै.अजिंक्य भारतने १० जुलै रोजी सचित्र वृत्त प्रकाशित करून अधोरेखित केली होती . त्यावर आमदारांनी हे काम लवकरात लवकर करण्याचे आश्वासन दिले आहे; मात्र हे काम लवकरात लवकर सुरू व्हावे, अशी अपेक्षा गावकरी व्यक्त करीत आहेत. गावातील ही अतिमहत्वाची असलेली समस्या दै.अजिंक्य भारतने प्रकाशित करून पुन्हा एकदा जनतेच्या आवाजाला मंच मिळवून दिला आहे.ग्रामविकासासाठी जनतेच्या प्रश्नांना प्रसार माध्यमातून प्राधान्य दिल्यास प्रशासनाचीही दिशादर्शक जबाबदारी बजावली जाते, हे यानिमित्ताने स्पष्ट झाले आहे.

अजिंक्य भारत
आपलं बुलडाणा
बुलडाणा, शनिवार २६ जुलै २०२५ www.ajinkyabharat.com


## थोडक्यात

### हंसराज नगरातील पथदिवे सुरु करा : मागणी

**खामगाव** - खामगाव शेगाव रस्त्यावरील हंसराज नगर जवळील पथदिवे बंद असल्यामुळे रात्री अंधाराचे साम्राज्य निर्माण होत आहे. ३० जुलै रोजी शहरातील मुक्कामानंतर ३१ जुलै २५ रोजी पहाटे श्रींच्या पालखीचे शेगावकडे प्रस्थान होणार आहे.या भागात पालखीचे प्रस्थान होतांना मोठया प्रमाणात गर्दी होते. या गर्दीत अनुचित प्रकार घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे या रस्त्यावरील पथदिवे त्वरीत सुरू करावे, अशी मागणी होत आहे.

### महिला महाविद्यालयात लिपिकास मारहाण

**खामगाव** : स्थानिक सु.रा. मोहता महिला महाविद्यालयातील लिपिक जयेश चंद्रकांत नागडा (५२) यांनी काल २४ जुलै २५ रोजी शहर पोस्टेला फिर्याद दिली. त्याामध्ये अशा आशयाचे नमुद केले आहे की, महाविद्यालयातील सेवानिवृत्त महिला शिपाई श्रीमती विमल गजानन तराळे (६२) व त्यांच्या सोबत विशाल गजानन तराळे (४०), वैशाली विनोद धोरपडे (३८) तिघे रा. बाळापुर फैल व चेतन ठोंबरे (४५) हे २४ जुलै २५ रोजी दुपारी ३.१५ वाजताच्या सुमारास महाविद्यालयात आले. यावेळी श्रीमती विमल तराळे यांनी जयेश नागडा यांना मेडिकल बिल न मिळाल्याने त्याबाबत अमरावती शिक्षण अधिकारी यांच्याकडे सादर केलेल्या प्रस्तावाच्या प्रतची मागणी केली यासाठी जयेश नागडा यांनी अर्ज करण्यास सांगीतले असता उपरोक्त चौघांनी वाद घातला व चेतन ठोंबरे यांनी चापटांनी गालावर मारहाण केली. तसेच चौधांनी शासकीय कामकाजात अडथळा निर्माण केला. जयेश नागडा यांच्या फिर्यादीवरून शहर पोस्टेमध्ये उपरोक्त चौघांविरूध्द गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास पीएसआय दिपक इलामे करीत आहेत.

### शास्ती माफीसाठी अभय योजनेला ३१ जुलैपर्यंत मुदतवाढ

**खामगाव** : खामगाव राज्य शासनाने नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ च्या कलम १५०अ (४) मध्ये सुधारणा करून मालमत्ता करावरील शास्ती अंशतः किंवा पूर्णतः माफ करण्यासाठी अभय योजना लागू केली आहे. यासाठी थकित मालमत्ताधारकांनी शास्ती वा व्याजाची रक्कम वगळून केवळ मूळ थकीत कराचा भरणा करावा. व शास्ती माफीसाठी ३१ जुलै २५ पर्यंत कर विभागात अर्ज सादर करावा,

### कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगाव बाजार भाव

| वान | भाव |
|---|---|
| ज्वारी | १४५० - २४२५ |
| गहू | २२५० - २५५० |
| तुर | ३३०० - ६६५० |
| हरभरा | ५१०० - ६३०० |
| सोयाबीन | ३३०० - ४४७५ |
| भुईमुग | ५००० - ५७०० |
| उडीद | ५४२५ - ५४२५ |
| मुंग | ५४०० - ६५५० |
| मक्का | २१५१ - २१५१ |
| तीळ | ८००० - ८२०० |
| बाजरी | १७०० - २१०० |

# अतिक्रमणधारकांना पर्यायी जागा द्या

## मागणीसाठी मनसेचे न.प.समोर एकदिवसीय धरणे आंदोलन

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**खामगाव दि.२५ :** मागील काही दिवसापुर्वी खामगाव शहरात नगर परिषदेकडून अतिक्रमण निर्मुलन मोहिम राबविण्यात आली होती. यावेळी शहरातील गोरगरीब अतिक्रमणधारकांच्या दुकानांवर बुल्डोजर चालविण्यात आला होता.

त्यामध्ये अनेक गोरगरीब अतिक्रमणधारकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. व ज्या भागातून सदरचे अतिक्रमण काढण्यात आले. तिथे तार कंपाउड करण्यात आल्याने अतिक्रमण धारकांवर उपासमारीची वेळ आल्याने शहरातील सर्व अतिक्रमणधारकांना त्यांच्या जुन्या जागेवरच गाळे/दुकाने अल्पदरात बनवून द्यावे किंवा त्यांना पर्यायी जागा उपलब्ध करुन द्यावी यासह अतिक्रमणधारकांच्या विविध मागण्यांसाठी आज



२५ जुलै रोजी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने नगर परिषदेसमोर एकदिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी अतिक्रमणधारकांनी तसेच शहरातील विविध राजकीय पक्षांनी व त्यांच्या पदाधिकाऱ्यांनी या धरणे आंदोलनास पाठींबा दर्शविला.

यावेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पदाधिकारी संजय पळसकार सहकार सेना राज्य उपाध्यक्ष, अशोक पाटील जिल्हा उपाध्यक्ष, जयसराम सातव तालुकाध्यक्ष, आनंद गायगोळ शहराध्यक्ष, आकाश पाटील शहर उपाध्यक्ष, आकाश वानखडे तालुका उपाध्यक्ष, सागर भोपळे तालुका उपाध्यक्ष, सागर हरसुले विद्यार्थी सेना, सोनु खपसे तालुका संघटक, करण दिक्षित शहर उपाध्यक्ष, कामगार सेनेचे विनोद इंगळे, नरेंद्र म्हस्के, विजय मांडवेकर, निलेश श्रीनाथ, गजानन घ्यार, दिपक सुलताने, भागवत उगले, सागर जगदाळे आदि मनसे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपसथित होते.

तसेच अतिक्रमणधारकांमध्ये देवा उबाळे, अण्णा नागेश्वर, प्रितम माळवंदे, विक्की जैन, पियुष चव्हाण, रवि माळवंदे, निलेश बिबे, संतोष काकडे,सोनु चव्हाण,पवन माळवंदेसह मोठ्या संख्येने अतिक्रमणधारक बांधवांनी आंदोलनात सहभाग घेतला होता.

## ना.अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी



**खामगाव दि.२५ :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे लाडके उपमुख्यमंत्री अजिता पवार साहेब यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून शनिवार दि.२६ जुलै २०२५ रोजी खामगाव शहरामध्ये महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री लोकनेते मा.ना.बाबासाहेब पाटील व विधान परिषद सदस्य अमोल मिटकरी, सिंदखेडराजा विधानसभा मतदार संघाचे आ.मनोज कायंदे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष ॲड.नाझेर काझी यांच्यासह बुलढाणा जिल्हयातील राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, पदाधिकारी यांची प्रमुख उपस्थिती लाभाणार आहे.

शनिवार दि.२६ जुलै रोजी सकाळी १० वाजता मंत्री महोदयांचे खामगाव येथे आगमन झाल्यानंतर ब्रिटीशकालीन विश्रामगृह येथे बुलढाणा जिल्हा सहकार विभागाची आढावा बैठक घेणार आहे. तद्नंतर मंत्री महोदयांच्या हस्ते खामगाव शहरातील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, राष्ट्रपिता महात्मा गांधी, हिंदुसुर्य महाराणा प्रतापसिंह, छत्रपती शिवाजी महाराज, शहिद भगतसिंग,लोकमान्य टिळक, सुटाळपुरा भागातील संताजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज या थोर महापुरुषांच्या पुतळयाला माल्यार्पण करुन अभिवादन करणार आहे. दुपारी १२ वाजता मत्री महोदय माजी आमदार सानंदा यांच्या सानंदा निकेतन येथे सदिच्छा भेट देणार आहेत. दुपारी १ वाजता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जनसंपर्क कार्यालय गांधी चौक येथे भेट देणार असुन तद्नंतर बर्डे प्लॉट, छत्रपती शिवाजी नगर स्टेडियम,मस्तान चौक, सुटाळपुरा,घाटपुरी नाका यासह अनेक ठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शाखेचे उद्घाटन करण्यात येणार आहे. दुपारी ३ वाजता पिंपळगाव राजा येथील वसाडी मार्गावरील भारत लॉन्स येथे प्रसिध्द किर्तनकार तथा शिवचरित्रकार हभप कबीर महाराज अत्तार सातारा यांचे बळीराजाला प्रबोधनपर किर्तन तसेच दुपारी ४ वाजता आंतरराष्ट्रीय केळीतज्ञ व जळगाव खांदेश येथील जैन ऐरिगेशनचे उपाध्यक्ष के.बी.पाटील यांचे केळी उत्पादनासंदर्भात मार्गदर्शन व भव्य शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

## शेतकरी कर्जमाफीसाठी प्रहारचे चक्का जाम आंदोलन

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**संग्रामपूर दि.२५ :** शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसह दिव्यांगाच्या प्रश्नावरुन प्रहार संघटना आक्रमक झाली आहे. शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करा, अशी मागणी करत बच्चू कडूंनी विदर्भात पदयात्राही काढली होती. आता बच्चू कडू यांनी सरकारला घेरण्यासाठी रस्त्यावरील लढाईला सुरुवात केली आहे.

प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांच्यावतीने शेतकऱ्यांच्या आणि दिव्यांगाच्या विविध मागण्यांसाठी राज्यभर विविध पक्षाच्या वतीने ठिकठिकाणी आंदोलन करण्यात आले. संग्रामपूर तालुका प्रहारचे वतीने आज सकाळी ८ वाजेदरम्यान



संग्रामपूर शहरात रास्ता रोको करून चक्का जाम आंदोलन करण्यात आले. तसेच संग्रामपूर तालुका प्रहारच्यावतीने संग्रामपूर- जळगांव जामोद रस्त्यावरील धामणगाव रस्ता चौकात चक्का जाम आंदोलन करण्यात आले. जो पर्यंत मागण्या पूर्ण होत नाही तोपर्यंत आंदोलन सुरूच राहणार असल्याचा इशारा यावेळी देण्यात आला. यावेळी तामगाव पोलिसांनी कार्यकर्त्यांना स्थानबध्द केले. आंदोलनात नगरपंचायतचे गटनेते शंकर पुरोहित, सौरव बावस्कर, हरि तायडे, संतोष सावतकार,सिद्धार्थ सोनोने, विजय वानखडे यासह प्रहारचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शेतकरी बहुसंख्येने उपस्थित होते.

## जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.बिराजदार यांची सदिच्छा भेट व सत्कार

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**खामगाव दि.२५ :** सामान्य रुग्णालयात डॉक्टर दत्तात्रय बिराजदार यांची सदिच्छा भेट व सत्कार दि. २४ जुलै २०२६ रोजी अ. भा. ग्रा.पत्रकार संघ संलग्रित आरोग्य समिती विदर्भ प्रमुख व एकनिष्ठा फाउंडेशन संस्थापक सुरजभैया यादव यांच्यासह अ. भा. ग्रा. प. संघ जिल्हाध्यक्ष राजु पाटील घाटे, गोविंदा फाटे, प्रदीप शमी, सिद्धेश्वर निर्मळ आदि लोकांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार केला व तसेच रुग्णाच्या आरोग्य विषयी चर्चा रुग्णाच्या समस्या लवकरात लवकर मार्गी लावू असे आश्वासन सुद्धा डॉ. दत्तात्रय बिराजदार यांनी दिले.



यावेळी सामान्य रुग्णालय येथे वैद्यकीय अधीक्षक डॉ. निलेश टापरे, निवासी वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रदीप सोनटक्के, डॉ. जयंत सोनोने, डॉ. गौरव गोयनका आदि उपस्थित होते.

## निवासी नायब तहसीलदार प्रांजल पवार यांचा पत्रकारांकडून सत्कार

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**शेंदुर्जन दि.२५ :** सिंदखेड राजा तहसील अंतर्गत निवासी नायब तहसीलदार म्हणून कार्यरत असलेल्या प्रांजल पवार यांचा पत्रकारांनी पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. सिंदखेड राजा तालुक्यापासून सुमारे ५० ते ६० किलोमीटर अंतरावर असलेल्या सवडत, मोहाडी, गुंज, वरुडी, साखरखेर्डा, शेंदुर्जन, दरेगाव, नागझरी, कंडारी, भंडारी, आंबेवाडी यांसारख्या अनेक गावांमध्ये राहणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक कागदपत्रांसाठी तहसील कार्यालयात जावे लागत होते. यासाठी अनेकदा चार-पाच फेऱ्या माराव्या लागत असल्याने विद्यार्थ्यांचा वेळ आणि पैसा दोन्ही वाया जात असे. या समस्येवर तोडगा काढण्यासाठी तहसीलदार अजित दिवटे यांच्या मार्गदर्शनाखाली निवासी नायब तहसीलदार प्रांजल पवार आणि महसूल कर्मचारी संजय सोनवणे यांनी पुढाकार घेतला. त्यांनी विद्यार्थ्यांची जात प्रमाणपत्रे, नॉन-क्रिमीलेअर , केंद्रीय जात प्रमाणपत्रे , अधिवास , उत्पन्न प्रमाणपत्रे आणि इतर आवश्यक शालेय कागदपत्रे वेळेवर उपलब्ध करून देण्याचे काम मोठ्या प्रमाणावर केले. यामुळे विद्यार्थ्यांचा मौल्यवान वेळ आणि पैसा यांची बचत झाली. विशेष म्हणजे, पावसाळ्याचे दिवस असताना अनेकदा तीन-तीन तास विद्युत पुरवठा खंडित होत असे. अशा परिस्थितीतही विद्यार्थ्यांच्या कामात अडथळा येऊ नये याची दक्षता घेत, प्रांजल पवार व संजय सोनवणे यांनी आपल्या



मोबाईलवरून ऑनलाईन प्रक्रिया पूर्ण करून विद्यार्थ्यांना वेळेत कागदपत्रे उपलब्ध करून दिली. त्यांच्या या कर्तव्यदक्ष कारभारामुळे विद्यार्थ्यांकडून त्यांचे मोठ्या प्रमाणावर अभिनंदन करण्यात आले. त्यांच्या याच कामगिरीची दखल घेत, पत्रकारांनी त्यांना पुष्पगुच्छ देऊन सन्मानित केले.

## अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वार गंभीर जखमी

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**चिखली दि.२५ :** चिखली ते जालना शहरातील महाबीज दि. २३ जुलैच्या रात्री १० च्या सुमारास दुचाकीस्वाराला अज्ञात वाहनाने धडक दिल्याने दुचाकी चालक गंभीर जखमी झाल्याची घटना घडली. याबाबत सविस्तर वृत असे की, प्रकाश नारायण गीतेहे आपल्या स्प्लेंडर दुचाकीने चिखली वरून त्यांच्या हिवरा आश्रम या गावी रात्री १० च्या सुमारास जात असताना त्यांच्या दुचाकीला महाबीज समोर अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिली, या धडकेत प्रकाश गीते हे गंभीर झाले. त्यांना स्थानिक नागरीकांनी जवंजाळ हॉस्पिटल मध्ये भरती केले. परंतु त्यांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना छत्रपती संभाजी नगर येथे उपचारार्थ हलविण्यात आले. अपघात घडल्यानंतर अज्ञात वाहन चालक घटनास्थळावरून पसार झाला. या अपघाताचा पुढील तपास चिखली पोलीस करीत आहेत.




## गजानन महाराज पालखीचे बिबी येथे भव्य स्वागत

**अजिंक्य भारत**/ प्रतिनिधी

**बीबी दि.२५ :** पंढरपूर स्वगृही येताना विदर्भात बुलढाणा जिल्ह्यातील दुसरा मुक्काम बिबी येथे असतो. त्यामुळे बीबी हद्दीमध्ये पालखीचे आगमन होताच फटाक्याचे आतषबाजी, रांगोळी,पुष्पदृष्टी करत श्री च्या पालखीचे व सोबत असणाऱ्या वारकऱ्यांचे जंगी स्वागत करण्यात आले. श्री च्या पालखीसोबत ७०० वारकरी सहभागी आहे. गण गण गणात बोते विठ्ठल नामाचा जयघोष करत वारकरी व हजारो भक्त दंग होऊन गेल्याचे पाहायला मिळाले.

विदर्भाची पंढरी म्हणून ओळख असणाऱ्या श्री क्षेत्र शेगांव येथील श्री संत गजानन महाराज यांची पालखी दरवर्षी विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरपूरला मार्गस्थ होत असते,श्री ची पालखी सध्या परतीच्या मार्गावर असून पालखीचे बिबी हद्दीमध्ये २४ जुलै रोजी दुपारनंतर ५ वाजेच्या दरम्यान आगमन झाले. यावेळी बीबी पोलीस स्टेशन ठाणेदार संदीप पाटील यांनी सपतीक पूजा विधी करून महाराजांची पालखी किनगाव



राजा पोलीस स्टेशन चे ठाणेदार नरवाडे यांना शाल श्रीफळ देऊन बीबी पोलीस स्टेशन हद्दीत प्रवेश करून जबाबदारी स्वीकारली तसेच बीबी पोलीस स्टेशनच्या वतीने सर्व वारकरी भक्तांना टोपी रुमाल देऊन वारकऱ्यांचे स्वागत करण्यात आले.

यावेळी बिबी सह परिसरातील विविध मान्यवर यांच्यासह हजारो भाविकांची उपस्थिती होती. दुसरबिड च्या हद्दीपासून शेकडो भाविक पायदळ बिबी शहरापर्यंत दिंडी सोबत दाखल झाले होते. ठिकठिकाणी श्री च्या पालखीचे मोठ्या उत्साहामध्ये स्वागत करण्यात आले.

श्री च्या पालखीसोबत असणाऱ्या वारकऱ्यांची व भक्तांची भोजनाची उत्तम व्यवस्था बीबी ग्रामस्थांनी केली होती, सतत पडणाऱ्या पावसामुळे भक्तांची गैरसोय होऊ नये यासाठी गावकऱ्यांच्या वतीने वॉटरप्रूफ मंडपाची व्यवस्था करण्यात आली

वसंतराव नाईक कनिष्ठ महा विद्यालयांमध्ये पालखी मुक्कामासाठी थांबली होती. यावेळी भक्तांसाठी सर्व सोयी सुविधा युक्त राहण्याची व्यवस्था विद्यालयाचे अध्यक्ष अभय चव्हाण यांनी स्वखर्चाने करून दिली होती. वसंतराव नाईक महाविद्यालयामध्ये पालखीचे आगमन होताच परिसरातील हजारो भक्तांनी दर्शनासाठी गर्दी केली होती.जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे,अपर जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल गायकवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार संदीप पाटील,पोलीस उपनिरीक्षक परमेश्वर शिंदे, नापोका अरुण सानप, यांच्यासह पोलीस कर्मचाऱ्यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. दुसरे दिवशी२५ जुलै रोजी सकाळी श्री ची पालखी किनगाव जटटू मार्गे लोणार साठी प्रस्थान करणार आहे.

# अजिंक्य भारत
# आपलं अमरावती

शनिवार, दि. २६ जुलै २०२५



डॉ. पांडेस् मेड. रेमेडीज (OPC) प्रा.ली.

डॉ. रविराज पांडे (एम.डी.)

वात, दमा, अस्थमा, वजन वाढविणे, कमी करणे, त्वचा रोग, वंधत्व, लैंगिक समस्या, स्त्री रोग, सर्व प्रकारच्या व इतर रोगांवर उपचार व मार्गदर्शन केल्या जाईल.

व्यंकटेश कॉलनी, शंकरनगर जवळ, अमरावती. ( दर सोमवारी )

C/o राईकवार हॉस्पिटल जयस्तंभ चौक परतवाहा ( दर महिन्याचा 3 रा. शनिवार )

C/o महाराष्ट्र मेडिकल बनोसा रोड, दर्यापूर ( दर महिन्याचा 2 रा. गुरुवार )

वेळ : दुपारी 2 ते सायंकाळी 7 वाजेपर्यंत

मो. 9890043911, 9372151186


# वंचित लाभार्थ्यांना घरकुल नोंदणीसाठी मुदतवाढ

## ३१ जुलैपर्यंत डेडलाइन | घरकुलासाठी पात्रताधारक लाभार्थ्यांना दिलासा

अजिंक्य भारत | सुनिल तळोकार

**अमरावती, दि. २५ :** प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घरकुल लाभापासून वंचित राहिलेल्या ग्रामीण भागातील लाभार्थ्यांसाठी सर्वेक्षणाला मुदतवाढ देण्यात आली आहे. यामुळे वंचित लाभार्थ्यांना आता ३१ जुलैपर्यंत ऑनलाइन नोंदणी करून घरकुल लाभासाठी अर्ज करता येणार आहे. या मुदतवाढीमुळे घरकुलापासून वंचित असलेल्या पात्रताधारक असलेल्या लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ घेण्याची संधी शासनाने उपलब्ध करून दिलेली आहे.



शासनाने सर्वांना घर ही योजना गेल्या १५ वर्षापासून राबविली आहे. परंतु ग्रामीण भागातील बऱ्याच लाभार्थ्यांकडे जागा उपलब्ध नसल्यामुळे घरकूल योजनेपासून त्यांना वंचित राहावे लागेल. शासनाने ज्या लाभार्थ्याकडे घरकूल बांधण्यासाठी जागा उपलब्ध नाही अशा लाभार्थ्यांना ५० हजाराचे अतिरिक्त अनुदान देवून त्यांनी जागा उपलब्ध करून द्यावी किंवा विकत घ्यावी असे स्पष्ट निर्देश देण्यात आले होते, परंतु या योजनेचा लाभ ग्रामीण भागातील लाभार्थ्यांना मोजक्या प्रमाणात मिळाला कारण ही योजना बऱ्याच जनांना माहिती नसल्यामुळे जागाउपलब्ध होऊ शकली नाही. त्यामुळे ग्रामीण भागातील असंख्य लाभार्थी जागे अभावी घरकूलापासून वंचित आहे. शासनाने पुन्हा ग्रामीण भागातील घरकूल लाभार्थ्यांना ३१ जुलै पर्यंत ऑनलाईन अर्ज करून घरकूल योजनेचा लाभ घेण्याचा आवाहन केले आहे.

प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंतर्गत २०१८ मध्ये तयार करण्यात आलेल्या प्रतीक्षा यादीत समाविष्ट न झालेले; परंतु सद्य:स्थितीत पात्र असलेल्या कुटुंबांना तसेच बेघर व कच्च्या घरात राहणाऱ्या कुटुंबांना घरकुलाचा लाभ देण्यासाठी १ ते ३० एप्रिलदरम्यान गावस्तरावर ग्रामपंचायत अधिकारी यांना सर्वेक्षणाचे निर्देश दिले होते. त्यानुसार ३१ मेपर्यंत मुदत दिली होती. त्यानंतर सलग तीनवेळा १५ दिवसांची मुदत वाढ देत १५ जुलैपर्यंत अंतिम मुदत दिली होती. या कालावधीत जिल्ह्यात एकूण 1 लाख ४ हजार १२२ लाभार्थ्यांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे.

यानंतर मुदतवाढीची मागणी होत असल्याने शासनाने वंचित असलेल्या घरकुल लाभार्थ्यांना नोंदणीसाठी ३१ जुलैपर्यंत मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे घरकुलापासून वंचित असलेल्या लाभार्थ्यांनी दिलेल्या कालावधीत ऑनलाइन नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या सीईओ संजिता महापात्र व डीआरडीएच्या प्रकल्प संचालक प्रीती देशमुख यांनी केले आहे.



प्रधानमंत्री आवास योजनेतील ग्रामीण भागातील लाभार्थी घरकूलापासून मोठ्या प्रमाणात वंचित होते. लाभार्थ्यांकडे जागा नसल्यामुळे घरकूलाचा लाभ घेता आला नाही. अश्या लाभार्थ्यांना आता घरकूलाचा लाभ मिळण्यासाठी ३१ जुलै पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. ज्या लाभार्थ्याकडे जागा उपलब्ध असेल त्यांना या यादीमध्ये समाविष्ट करून घेतले जाणार आहे. तर ज्या लाभार्थ्यांकडे जागा उपलब्ध नाही अश्याही लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यामुळे आता लाभार्थ्यांना घरकूलाचा प्रश्न निकाली निघणार आहे.

**संजिता महापात्र**
**मुख्य कार्यपालन अधिकारी,**
**जिल्हा परिषद, अमरावती**

शासनाच्या योजनेपासून ग्रामीण भागातील घरकूल लाभार्थी काही कारणावरून वंचित राहिले आहे. वंचित असलेल्या लाभार्थ्यांची यादी प्रशासनाकडे आहे.जिल्ह्यात १ लाख ४ हजार १२२ लाभार्थ्यांचे सर्वेक्षण करण्यात आले. ही बाब शासनाकडे कळविण्यात आली होती. त्यावर शासनासने मुदतवाढीसाठी मंजूरात दिली आहे. घरकूलापासून वंचित असलेल्या लाथार्थ्यांना ३१ जुलै पर्यंत आपले अर्ज ऑनलाईन पद्धतीने सादर करावे.

**प्रिती देशमुख**
**प्रकल्प संचालक**

## थोडक्यात

### पीडब्ल्यूडी कार्यालया समोरून दुचाकीची चोरी

**अमरावती :** कामानिमित्त आलेल्या विनोद उत्तमराव गायकवाड (रा. शेगाव रहाटगाव रोड) यांनी त्यांची दुचाकी (एमएच २७- एएक्स ५२४२) पीडब्ल्यूडी कार्यालयासमोर उभी केली होती. तेथून ती अज्ञाताने चोरून नेली. तिची अंदाजे किंमत १५ हजार रुपये होती. याबाबत त्यांच्या तक्रारीवरून गाडगे नगर पोलिसांनी गुन्हा नोंदवला. या घटनेचा पुढील तपास गाडगेनगर पोलीस करीत आहे.

### पानठेला फोडून २९ हजारांची चोरी

**अमरावती :** दस्तुर नगर ते एमआयडीसी मार्गावर असलेला पानठेला फोडून अज्ञात चोरट्याने रोख २ हजार रुपयांसह एकूणा २९ हजारांचे साहित्य चोरून नेले. याबाबत गौरवसिंग राजेंद्रसिंग राजपुत यांनी दिलेल्या तक्रारीवरून राजापेठ पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा नोंदवला.

### दारू पिवून घातला गोंधळ

**अमरावती :** भातकुली येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दारू पिवून गोंधळ घालत धम्मपाल हरभजन सेजव (३५, रा. निंभा, ता. भातकुली) याने गोंधळ घातला. इतकेच नव्हे, तर तेथील सुरक्षा रक्षकाच्या आंगावर हात उगारत त्याला धक्काबुक्की केली. याबबात भातकुली पोलिसांनी त्याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवला. या घटनेचा पुढीलतपास भातकुली पोलीस ठाण्याचे ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली भातकुली पोलीस करीत आहे.

### ऑटो चालकावर गुन्हा दाखल

**अमरावती :** टांगा पाडाव येथे ऑटो (एमएच २७- बीडब्ल्यू २०८५) रहदारीच्या रस्त्यावर धोकादायक स्थितीत उभा करणाऱ्या चालकावर नागपुरी गेट पोलिसांनी गुन्हा नोंदवला. अबरार अली जब्बार अली (५२) असे गुन्हा दाखल केलेल्या ऑटो चालकाचे नाव आहे.

### क्षुल्लक कारणावरुन जीवे मारण्याची धमकी

**अचलपूर :** हॉटेलमध्ये असलेली पाण्याची मशीन तपासण्यासाठी गेलेल्या एका अल्पवयीन युवकाला दुसरयाने तू मशीन तपासण्यासाठी कसा काय आला असे म्हणत त्याच्या डोक्यावर हातातील कड्याने मारत जखमी केले. जीवे मारण्याची धमकी दिली. गांधीपुल येथे घडलेल्या घटनेबाबत अल्पवयीन युवकाने दिलेल्या तक्रारीवरून सरमसपुरा पोलिसांनी दुखापतीचा गुन्हा नोंदवला.

### काकाची पुतण्याला मारहाण

**खोलापूर :** वाठोडा शुक्लेश्वर येथे क्षुल्लक कारणावरून काकाने पुतण्याला मारहाण करीत शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिली. त्याच्या आईलाही काकाने मारहाण केली. याबाबत अशोक पुरुषोत्तम निमकर (३५) याच्या तक्रारीवरून खोलापूर पोलिसांनी सुधाकर गोपाळराव निमकर (५२) याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवला.

### निरुळगंगामाई शिवारातून दुचाकी लंपास

**आसेगाव :** शेताच्या धुऱ्यावर दुचाकी उभी करून शेतात चक्कर मारण्यास गेलेल्या शेतकऱ्याची दुचाची अज्ञाताने चोरून नेली. तिची अंदाजे किंमत 20 हजार रुपये आहे. ही घटना निरुळगंगा माई शेत शिवारात घडली. शंकर कृष्णराव मरोळकर (40) यांच्या तक्रारीवरून आसेगाव पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा नोंदवला.

# चक्काजाम आंदोलनात तहसील कर्मचाऱ्यांचा भांडाफोड!



अजिंक्य भारत | रोशन वानखडे

**अमरावती, दि. २५ :** माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली २४ जुलै रोजी झालेल्या चक्काजाम आंदोलनामुळे चांदूरबाजार तहसील कार्यालयातील कर्मचाऱ्यांची अनुपस्थिती उघड झाली. शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी स्वप्निल कोकाटे यांच्या नेतृत्वात प्रहार कार्यकर्त्यांनी तहसील कार्यालयासमोर रास्ता रोको आंदोलन केले. या वेळी नागरिकांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय झाली, कारण सरकारचे आदेश असूनही अनेक अधिकारी व कर्मचारी मुख्यालयी उपस्थित नव्हते. नायब तहसीलदार मनोज सोनारकर हे स्वत: मुख्यालयी राहत नसल्याचे समोर आले, तर अनेक कर्मचारी त्यांच्या आशीर्वादाने गैरहजर होते. संजय गांधी योजनेचे कर्मचारी रेहान शेख हे एकमेव उपस्थित कर्मचारी होते. दुसरीकडे, २४ तास मुख्यालयात राहणारे सहाय्यक महसूल अधिकारी सचिन कन्नमवार यांच्यावर मात्र कारवाई होऊन त्यांची हकालपट्टी करण्यात आली होती. यामुळे प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, दोषी अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी होत आहे.

# शेतकऱ्याची विष घेवून आत्महत्या

**अमरावती:** एकीकडे शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी राज्यभरात बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली आक्रोश मोर्चा आणि चक्काजाम आंदोलन सुरु असतानाच, दुसरीकडे जिल्ह्यातील नांदगाव पेठ येथे एका शेतकऱ्याने कर्जाच्या ओझ्याने कंटाळून आत्महत्या केल्याने जिल्ह्यात हळहळ व्यक्त होत आहे. विनोद भाऊरावजी सावरकर (वय ५४) असे आत्महत्या केलेल्या कर्जबाजारी शेतकऱ्याचे नाव असून कर्जाचा डोंगर उभा राहिल्याने आणि मजुरांना द्यायला सुद्धा पैसे नसल्यामुळे विवंचनेतून त्यांनी आत्महत्येसारखा दुर्दैवी निर्णय घेतल्याचे बोलले जात आहे. शेतकरी विनोद सावरकर यांच्या कडे स्वत:ची चार एकर शेती असून त्यांनी त्याच परिसरात चार एकर शेती लागवणने घेतली होती. मात्र सततची नापिकी, खर्चाचे वाढलेले प्रमाण, मजुरांची मजुरी देण्यासाठी असलेली आर्थिक अडचण आणि कर्जाचा डोंगर अशा संकटांच्या गर्तेत ते सापडले होते. त्यांच्यावर सुमारे दोन लाखांचे कर्ज होते. २३ जुलै रोजी रात्री ११ वाजताच्या सुमारास त्यांनी स्वत:च्या राहत्या घरी विषारी द्रव्य प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. कुटुंबियांना याबाबत माहिती होताच त्यांनी विनोद सावरकर यांना अत्यवस्थ अवस्थेत जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती येथे दाखल केले. मात्र उपचारादरम्यान 24 जुलै रोजी सकाळी 7 वाजता त्यांचे निधन झाले.

# शेतमजूर महिलेचा विद्युत तारेला स्पर्श झाल्याने मृत्यू

## शिराळा शेतशिवारातील घटना

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अंजनगाव सुर्जी, दि. २५ :** तालुक्यातील दहिगाव रेचा महिलेचा खिराळा शेत शिवारात चालू विद्युत वाहिनीच्या ताराचा संपर्कात आल्याने एका महिलेचा शॉक लागून मृत्यू झाल्याची घटना आज २५ जुलै ला सकाळी १० वाजताच्या सुमारास घडली.रुपाली शुद्धधन सावळे वय ३६ वर्ष रा.दहिगाव असे मृतक महिलेचे नाव आहे.आज सकाळच्या सुमारास मृतक महिला व तिच्यासह ९ महीला ह्या अनिल धुमाळे यांच्या शेतात निंदन करण्यासाठी गेल्या होत्या.मृतक महीला ही १० वाजताच्या सुमारास लघु शंकेला अरुण टकोरे यांच्या शेताच्या धुऱ्यावर गेली असता तेथे चालू विद्युत वाहिनीचा तार तुटलेला होता.दहा वाजता लाईन आल्याने तुटलेल्या चालू विद्युत वाहिनीच्या संपर्कात मृतक महिला आल्याने जबर शॉक लागला, हे पाहून तिच्यासोबत असलेल्या शेतमजुर महिला तिला ओढण्यासाठी जात असताना एका महिलेच्या सतर्कतेमुळे ९ महिलांचे प्राण वाचले.ह्या घटनेची वार्ता दहीगाव रेचा परिसरात वाऱ्यासारखी पसरताच नागरिकांनी तसेच प्रहार पक्षाचे पदाधिकारी यांनी घटनास्थळी धाव घेऊन पोलिसांना घटनेची माहिती दिली असता पोलिसांनी घटनास्थळ गाठून घटनेचा पंचनामा केला मात्र उपस्थित नागरिक व प्रहार पक्षाच्या पदाधिकारी यांनी मृतदेह उचलण्यास नकार दिला आणि मृतदेह ट्रॅक्टर ट्रॉली मध्ये टाकून दहिगाव येथून अंजनगाव महावितरण कंपनीच्या कार्यालयात आणून ठिय्या आंदोलन केले,दरम्यान मृतदेह आणताना जुना बसस्थानक येथे तैनात असलेल्या पोलीस ताफ्याने त्यांना रोखण्याचा प्रयत्न केला संतप्त जमावाने पोलिसांना न जुमानता प्रेत असलेला ट्रॅक्टर थेट वीज वितरण कंपनी कार्यालयात आणला असता गेट वर सुद्धा त्यांना पोलीसांच्या ताफ्याने त्यांना रोखण्याचा प्रयत्न केला मात्र जमाव ऐकण्याच्या मनस्थितीत नसल्याने त्यांनी पोलिसांना न जुमानता ट्रॅक्टर आत नेला.व संतप्त नागरिक,मृतक महिलेचे नातेवाईक व प्रहार पदाधिकाऱ्यांनी जो पर्यंत मृतक महिलेच्या नातेवाईकांना न्याय मिळणार नाही तो पर्यंत मृतदेह उचलणार नाही असा पवित्रा घेत गदारोळ घातला. शेतमजूर महिलेला एक मुलगा एक मुलगी असून मोल मजुरी करुन परिवाराचा उदरनिर्वाह करीत असे तिच्या अशा दुर्देवी जाण्याने परिवारात व परिसरात शोककळा पसरली. ज्या शेतात हा तार पडला होता त्याबाबत काही दिवसापूर्वी शेतकऱ्याने सुर्जी येथील महावितरण कार्यालयात तक्रार दाखल मात्र याबाबत कार्यालयाने कोणतीही दखल घेतली नाही. एक महिन्यापूर्वी दहिगाव रेचा येथे डीपीच्या संपर्कात एक आदिवासी महिला आल्याने जागेवरच मृत्यू पावली होती. ती घटना ताजी असताना महावितरण कंपनीने घटनेचे गांभीर्य लक्षात न घेतल्याने ही घटना घडली.





यावेळी महावितरण कार्यालयात गावकरी व प्रहार पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित असल्याने पोलिसांनी मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला असता आमदार गजानन लवटे यांच्या मध्यस्थीने वाद निवळला आणि सुर्जी विभागाचे कनिष्ठ अभियंता जाधव यांना अटक झाल्याचे आमदार यांनी सांगितले.त्यामुळे गावकऱ्यांनी प्रेत उचलून शव विच्छेदन करण्यास ग्रामीण रुग्णालय येथे हलविले.

### बस स्टॉपवरून दुचाकी चोरी

**चांदूर बाजार :** मित्राच्या शेतामध्ये जेवणाचा कार्यक्रम होता. त्याला उपस्थित राहण्यासाठी फिर्यादी एकनाथराव हरिभाऊजी गावंडे यांनी त्यांची दुचाकी चिंचोली काळे बस स्टॉपजवळ उभी केली होती. तेथून परत आले असता, त्यांना दुचाकी दिसली नाही.

# जिल्हा बँकेचे नोटीस प्रकरण आदेशाकरिता 'क्लोज'

## संचालक आनंद काळे यांच्या अपात्रतेवर २९ जुलै रोजी सुनावणी

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. २५ :** अमरावती जिल्हा मध्यवर्ती बँकेला दंडाची नोटीस बजावल्याच्या प्रकरणात आदेशाकरिता न्यायालयाने सदर प्रकरण क्लोज केले असून संचालक आनंद काळे यांच्या अपात्रेबाबत २९ जुलैची तारीख देण्यात आलेली आहे.





जिल्हा मध्यवर्ती बँकेत सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये प्रशासन व न्यायालयीन संघर्ष सुरू असून विरोधकांनी सत्ताधाऱ्यांविरोधात केलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने विभागीय सहनिबंधक कार्यालयाने चौकशी समितीची स्थापना केली होती. या समितीसाठी जिल्हा बँकेने आवश्यक कागदपत्रे न पुरविल्यामुळे बँकेला दंडाची नोटीस बजाविण्यात आली होती. कागदपत्रे सादर करेपर्यंत प्रतिदिवस दंड ठोठावण्यात आला होता. परंतु बँकेने मात्र याविरोधात न्यायालयात धाव घेतली होती. यासंदर्भात दोन वेळा सुनावनी पार पडली असून, मंगळवार, २२ जुलै रोजी झालेल्या सुनावणीत न्यायालयाने सदर प्रकरण प्राथमिक आक्षेपाच्या आदेशाकरिता बंद केले आहे. त्यामुळे याचा कोणत्याही दिवशी निर्णय येण्याची शक्यता आहे. या निर्णयाकडे आता सहकार क्षेत्राचे लक्ष लागले आहे. तसेच बँकेचे संचालक आनंद काळे यांच्यावर विविध प्रकरणांमध्ये अनियमितता केल्याचा आरोप ठेवत त्यांना अपात्र ठरविण्याची नोटीस बजावण्यात आली आहे. यासंदर्भातील पहिली सुनावणी १४ जुलै रोजी झाली होती. मात्र, त्यांनी नोटीस मिळालेली नसल्याचे सांगितल्यामुळे त्यांना पुढील सुनावणीसाठी २२ जुलैची तारीख देण्यात आली होती. मात्र, मंगळवारी झालेल्या सुनावणीत त्यांना पुन्हा २९ जुलैची अंतिम संधी देण्यात आली आहे.

# विद्यापीठातील दहा जणांना अनुकंपा भरतीचे नियुक्तीपत्र







मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते आदेश वाटप

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. २५ :** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ व परिक्षेत्रातील विविध महाविद्यालयांतील दहा कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपा तत्वावर नियुक्ती आदेश उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. या कार्यक्रमाला विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, नॅक अध्यक्ष डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, डॉ. केशव तुपे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे आदी मान्यवर उपस्थित होते. या वेळी बोलताना मंत्री





पाटील यांनी, राज्य सरकारच्या निर्णयानुसार डिसेंबर २०२५ पर्यंत सर्व अनुकंपा भरती पूर्ण केली जाईल, असे स्पष्ट केले. विद्यापीठातील प्राजक्ता बंड, स्वप्नील बनसोड, उदयन वनस्कर, अभिनव धोटे व पायल गुजर तसेच परिक्षेत्रातील पाच महाविद्यालयांतील बिलाल पटेल, अक्षय आगळे, पूजा सारडा, उर्वशी मालपाणी व वेदांत डांगे यांना नियुक्ती आदेश देण्यात आले. कार्यक्रमात डॉ. अनिता पाटील यांनी तयार केलेल्या किडनी स्टोनवरील 'क्रश' या औषधाचे सादरीकरणही करण्यात आले. या औषधाचे व्यावसायिकीकरण झाले असून, कुलगुरू डॉ. बारहाते यांच्या हस्ते मंत्री पाटील यांना औषधाचे प्रतिक प्रदान करण्यात आले.

कार्यक्रमाचे संचालन जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी केले. कर्मचारी संघटनांनी मंत्री पाटील यांना मागण्यांचे निवेदनही दिले.




## थोडक्यात

### वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्यावर गुन्हा दाखल

**आसेगाव :** वासणी बु. येथे सापन नदीपात्रातून वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्या सतीश जगदेवराव वानखडे (३६, रा.तळणीपुर्णा) याच्यावर आसेगाव पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला. कारवाई दरम्यान पोलिसांनी ट्रॅक्टर (एमएच २७-बीबी २०५३) व एक ब्रास वाळू असे एकूण ६ लाख ६ हजारांचे साहित्य जप्त केले.

### कचरा टाकण्याच्या वादातून महिलेला मारहाण

**दर्यापूर :** सोनखस लेहगाव येथे घरातील कचरा मागे टाकत असताना शेजारी राहणाऱ्या एकाने महिलेसोबत वाद घालत तिला शिवीगाळ करीत जीवे मारण्याची धमकी दिली. तिला लाकडी काठीने मारहाण करीत जमखी केले. महिलेच्या तक्रारीवरून दर्यापूर पोलिसानी एकाविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### दुकान लावण्यावरून वाद; युवक जखमी

**खोलापूर :** वाठोडा शुक्लेश्वर येथे आठवडी बाजारात मोची काम करणाऱ्या युवकाला दुकान लावण्यास मज्जाव करीत गावातीलच एकाने सळाखीने मारहाण करीत जखमी केले. ही घटना वाठोडा शुक्लेश्वर येथे घडली. ज्ञानेश्वर शंकरराव धुमाळे (३८) याच्या तक्रारीवरून खोलापूर पोलिसांनी पृमोद सतीशराव वानखडे (३०) याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवला.

### जादूटोण्याच्या कारणावरून मारहाण

**अंजनगाव सुर्जी :** विहिगाव येथे कवी प्रभाकर अभ्यंकर (३८) याने अविनाश विनायक मोहोड (३१) याला जादूटोण्याच्या कारणावरून मारहाण करीत शिवीगाळ करीत जीव मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी रहिमापूर पोलिसांनी मारहाण करणाऱ्या युवकाविरुद्ध गुन्हा नोंदवला.

### शिदोडी येथे अज्ञाताची युवकाला मारहाण

**धामणगाव रेल्वे :** मंगरूळ दस्तगीर पोलीस ठाण्यांतर्गत येणाऱ्या शिदोडी येथे काहीही कारण नसताना अज्ञाताने मंदिर परिसरात बसलेल्या सत्यपाल सोपान शेंडे (३५) याला मारहाण करीत जखमी केले. याबाबत पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध दुखापतीचा गुन्हा नोंदवला.

### वीज चोरी करणाऱ्यावर गुन्हा दाखल

**अमरावती :** वीज चोरी करीत शासनाची दिशाभूल करणाऱ्या व्यक्तीवर बडनेरा पोलिसात भारतीय विद्युत कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. शेख अजीज वाहेद (४३, रा. मसानगंज) असे गुन्हा दाखल केलेल्या व्यक्तीचे नाव आहे. याबाबत महावितरणचे अभियंता देवानंद शेषराव इंगळे (३३) यांनी बडनेरा पोलिसात तक्रार दिली.

### ऑटोगल्लीत जुगारवार धाड; एकावर गुन्हा नोंद

**अमरावती :** राजापेठ चौकातील ऑटो गल्लीत सुरू असलेल्या जुगारावर राजापेठ पोलिसांनी कारवाई करीत एकूण १ हजार २५ रुपयांचे साहित्य जप्त केले, तर हनुमान प्रेम शेरवाने (३३) याच्यावर महाराष्ट्र जुगार कायद्यांतर्गत गुन्हा नोंदवला.

### नेताजी कॉलनीत वृद्धाचा झोपेतच मृत्यू

**अमरावती :** तपोवन परिसरातील नेताजी कॉलनी येथे राहणारे वैद्यनाथ महादेव वंजारी (७०) यांचा झोपेतच मृत्यू झाला. त्यांना जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले असता, डॉक्टरांनी मृत घोषित केले. याबाबत त्यांचा मुलगा रजत वैद्यनाथ वंजारी (२२) यांच्या फिर्यादीवरून गाडगे नगर पोलिसांनी मर्ग नोंदवला.

# दरोड्याच्या तयारीत असलेल्या टोळीचा पर्दाफाश

## गाडगेनगर डिबी पथकाची मोठी कारवाई, प्राणघातक शस्त्रासह ५ जण गजाआड

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. २५ :** शहरात मोठा गुन्हा घडविण्याच्या तयारीत असलेल्या टोळीचा गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या शोध पथकाने पर्दाफाश केला आहे. रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत पांढरी हनुमान मंदिराच्या मागील मैदानात दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या पाच जणांना अटक करण्यात आली. त्यांच्याकडून प्राणघातक शस्त्रं व गुन्ह्यात वापरण्यात येणारे साहित्य जप्त करण्यात आले आहे. दोन आरोपींनी घटनास्थळावरून पळ काढला असता, त्यांनाही काही तासांत पकडण्यात पोलिसांना यश आले.

२१ जुलै रोजी पहाटे १.४५ वाजता डिबी पथकाला गोपनीय माहिती मिळाली की, पांढरी हनुमान मंदिराच्या मागे काही संशयित इसम हातात लोखंडी रॉड, चाकू, कट्यार घेऊन दरोड्यासाठी दबा धरून बसले आहेत. या माहितीवरून पोलिस पथकाने सापळा रचून तीन जणांना जागीच पकडले, तर दोन पळून गेले. काही तासांतच त्यांनाही पकडण्यात आले. अटक आरोपीमध्ये सूरज उमेश कवाडे (वय २१, रा. कठोरा, अमरावती), सागर वरमेश कवाडे (वय २५, रा. शिरखेड, ता. मोर्शी), पंकज विनायक बोरखडे (वय ३०, रा. शिवर, ता. दर्यापूर), उमेश डोईफोडे (वय १९, रा. शिरजगाव कसबा)



आदित्य अनिल सिरसाठ (वय १९, रा. महात्मा फुले नगर, अमरावती) यांचा समावेश आहे. त्यांच्या ताब्यातून एक लोखंडी रॉड, लोखंडी चाकू, लोखंडी कट्यार, मिरची पूड, दोरी, दुपट्टे, ३ मोबाईल फोन असा एकुण १५,४८० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी गाडगेनगर पोलीस ठाण्यात कलम ३९९, ४०२ भादंवि अंतर्गत गुन्हा दाखल करून आरोपींना अटक करण्यात आली आहे.

शहरात मोठा गुन्हा टळला, टोळी नेमकी कुठे दरोडा टाकण्याच्या तयारीत होती, याचा तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरीया, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, सहायक पोलीस आयुक्त अरुण पाटील, तसेच गाडगेनगर पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल वर यांच्या मार्गदर्शनात करण्यात आली. कारवाईमध्ये सहायक पोलिस निरीक्षक मनोज मानकर यांच्या नेतृत्वाखाली पो.ह. भारत वानखडे, उपनिरीक्षक जावेद अहमद, कॉन्स्टेबल राजेश गुरेले, शिपाई नंदकिशोर करोची, महेश शर्मा व रूपेश हटकर आदींचा सहभाग होता. अशा गुन्हेगारांचा बंदोबस्त करण्यासाठी पोलीस सतर्क असून, शहरवासीयांनी कोणतीही संशयास्पद हालचाल दिसल्यास त्वरित माहिती द्यावी, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# मेळघाट जरीदा उपकेंद्र ३३ केव्ही वीजवाहिनी बांधता यावी

## खा. वानखडेच्या नेतृत्वात शिष्टमंडळाने घेतली मुख्य सचिवांची भेट

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. २५ :** अमरावती मतदारसंघातील मेळघाट भागातील नागरिकांना वीज पुरवठ्याची गंभीर समस्या भेडसावत आहे, ही समस्या सोडवण्यासाठी जरीदा उपकेंद्रापर्यंत 33 केव्ही वीजवाहिनी बांधण्याचा आराखडा केंद्र सरकार कडे प्रस्तावित करण्यात आला आहे. या प्रस्तावित वीजवाहिनीसाठी फेस दोन बाबत वन विभागाशी पत्रव्यवहार करण्यात आला आहे . जरीदा उपकेंद्रापर्यंत 33 केव्ही वीजवाहिनी सहज बांधता यावी यासाठी वन विभागाकडून दुसऱ्या टप्प्याची परवानगी घेणे बंधनकारक आहे.

जेणेकरून या भागातील ग्रामस्थ, शेतकरी, आरोग्य केंद्रे, शैक्षणिक संस्था आणि इतर



आवश्यक सेवांना अखंड वीजपुरवठा करता येईल. सदर वीजवाहिनीचा काही भाग वनक्षेत्रातून जातो, त्यामुळे हा प्रकल्प राबविण्यासाठी वन विभागाकडून परवानगी घेणे आवश्यक आहे. या प्रकल्पादरम्यान पर्यावरण संतुलन राखले जाईल आणि वन्यजीव संरक्षण कायदा आणि पर्यावरणीय मार्गदर्शक तत्त्वांचे पूर्णपणे पालन केले जाईल याची असे सांगण्यात आले.

म्हणून, जनहित, प्रादेशिक विकास आणि मूलभूत सुविधांची उपलब्धता लक्षात घेऊन वन विभागाकडून लवकरच परवानगी घ्यावी अशी नम्र विनंती केली आहे, या भेटी दरम्यान, चिखलदरा काँग्रेस कमिटी चे अध्यक्ष सहदेव बेलकर, राहुल येवले उपाध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस तथा उपसभापती कृउबा समिती धारणी, विक्की राठौर, आणि राकेश झारखंडे उपस्थित होते.

# विजेच्या धक्क्याने बैलांचा मृत्यू

## निंबा शेत परिसरात विद्युततारा तुटल्याने घडली घटना

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**तळेगाव दशासर, दि.२५ :** तळेगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील निंबा शिवारात गुरुवारी सकाळी झालेल्या दुर्दैवी घटनेत, तुटलेल्या विद्युत तारेचा शॉक लागून एका शेतकऱ्याचा व त्याच्या बैलाचा मृत्यू झाला. मृत शेतकऱ्याचे नाव अशोक सोनोजी शेंडे (वय ५०, रा. निंबा) असे आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, अशोक शेंडे हे सकाळी आपल्या बैलजोडीला घेऊन शेताच्या दिशेने चालले होते. याच दरम्यान, रमेश देशमुख यांच्या शेताजवळून जाणाऱ्या वीज वितरण कंपनीच्या मार्गावर तुटून पडलेल्या विद्युत तारेचा स्पर्श झाल्याने त्यांना आणि बैलांना जोरदार विजेचा शॉक बसला.



घटनास्थळीच दोघांचा मृत्यू झाला.

सदर तारा हायटेंशन असल्यामुळे करंटचा जोर अधिक होता. मृत्यू झालेल्या बैलजोडीपैकी एका बैलाची किंमत सुमारे ७० हजार असल्याचे सांगण्यात येत आहे. याप्रकरणी दिनेश नारायण गवई यांच्या तक्रारीवरून तळेगाव पोलीस ठाण्यात अपघाती मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. या दुर्घटनेमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.



# शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांना सानुग्रह अनुदान व बियाणे किट वाटप

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अंजनगाव बारी, दि. २५ :** आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना मदतीचा हात देत युवा स्वाभिमान पक्षाच्या पुढाकाराने व कृषी विभागाच्या माध्यमातून सानुग्रह अनुदान व बियाणे किट वाटप करण्यात आले. आमदार रवि राणा यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पोहरा बंदी येथे (दि. २४) राबविण्यात आला. यावेळी सुनिल राणा आणि युवा स्वाभिमान पार्टीचे अमरावती तालुका अध्यक्ष अजय घुले यांच्या हस्ते चंचला साहेबराव चव्हाण (पोहरा) व सुनील वामन चव्हाण (बोडणा) या शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबीयांना बियाणे किटचे वाटप करण्यात आले. या मदतीमागचा उद्देश संकटग्रस्त कुटुंबांना आधार देण्याचा असून, त्यांना नव्या हंगामासाठी प्रोत्साहन देणे हे प्रमुख लक्ष्य आहे. कार्यक्रमात पोहरा बंदी येथील ग्रामस्थांसह युवा स्वाभिमान पार्टीचे तालुका उपाध्यक्ष उमेश डकरे, माजी जि.प. सदस्य दिनेश टेकाम, ओंकार मोहोड, जगदीश अंबाडकर, विठ्ठल पवार, धारूसिंग चव्हाण, आलसिंग चव्हाण, मधु चव्हाण, राजू पवार, उपसरपंच हारूनभाई, नईम भाई, मनोज भालकर, दिपक पवार, अशोक पवार, गणेश जाधव, सरपंच शेवती मुंदावने आदी मान्यवर आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमामुळे शेतकरी कुटुंबांना मानसिक व आर्थिक आधार मिळाला असून, स्थानिक पातळीवर या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

# डॉ.मोनाली ढोले 'ओबजी पिलर्स ऑफ प्रोग्रेस अवार्ड' ने सन्मानित

## वैद्यकीय क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीची घेतली दखल

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. २५ :** सोलापूर ऑब्स्टेट्रिक्स अँड गायनॅकॉलॉजिस्ट सोसायटीच्या वतीने दोन दिवशीय 'फोगसी प्रेसिडेन्शिअल कॉन्फरंस'चे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात अमरावती जिल्हा स्त्रीरोग व प्रसुती संघटनेच्या माजी सचिव सुप्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ डॉ.मोनाली ढोले यांना 'ओबजी पिलर्स ऑफ प्रोग्रेस अवार्ड' देऊन नुकतेच सन्मानित करण्यात आले. वैद्यकीय क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

सोलापूर येथील बालाजी सरोवर येथे १९ व २० जुलैदरम्यान सोलापूर ऑब्स्टेट्रिक्स अँड गायनॅकॉलॉजिस्ट सोसायटीच्या वतीने फोगसी प्रेसिडेन्शिअल कॉन्फरंसचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेत रोटरी क्लब ऑफ अंबिकाच्या माजी




अध्यक्षा अमरावती जिल्हा स्त्रीरोग व प्रसूती संघटनेच्या माजी सचिव डॉ.मोनाली ढोले यांनी उपस्थिती दर्शवून अल्ट्रासाउंड एडिशन व्हॅल्यू टू प्रॅक्टिस या विषयावर आपले विचार मांडले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते ओबजी पिलर्स ऑफ प्रोग्रेस अवार्ड देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी प्रसिद्ध रक्ततज्ञ, पॅथॉलॉजिस्ट, स्त्रीरोगतज्ञासह प्रख्यात वक्त्यांनी ओबजीमधील एमआरआय, जेनेटिक्स या विषयावर आपले मत व्यक्त केले. डॉ.मोनाली ढोले यांनी वैद्यकीय क्षेत्रात काम करीत असताना सामाजिक बांधिलकी जोपासली आहे. रोटरीच्या माध्यमातून त्यांनी अनेक सामाजिक उपक्रम यशस्वीपणे राबविले. या सन्मानाबद्दल डॉ. ढोले यांनी मोनिका शशिकांत उंबरदंड, मिलिंद शहा, सुजाता कुलकर्णी यांचे आभार मानले.



# धामणगावमध्ये 'एक पेड माँ के नाम' उपक्रमांतर्गत वृक्षारोपण

## नगरपरिषदेचा हरितक्रांती स्तुत्य उपक्रम

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**धामणगाव रेल्वे, दि. २५ :** धामणगाव रेल्वे नगर परिषदेमार्फत 'एक पेड माँ के नाम' या भावनिक संकल्पनेतून तसेच अहिल्याबाई होळकर त्रिशताब्दी वर्षानिमित्त वृक्षारोपणाचा स्तुत्य उपक्रम राबवण्यात आला. दादाराव अडसड पटांगणात पार पडलेल्या या कार्यक्रमात नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग होता. या उपक्रमात शासकीय भूखंड, शाळा, रस्त्याच्या दुतर्फा, उद्याने व खुल्या जागांमध्ये वड, पिंपळ, कडुनिंब, गुलमोहर, अशोका, साग व औषधी झाडांची लागवड केली जात आहे. एकूण दोन हजार झाडे लावण्याचा संकल्प नगर परिषदेने केला असून सध्या प्रत्यक्ष वृक्षारोपण सुरू आहे.कार्यक्रमात नगर परिषदेचे अधिकारी, कर्मचारी, शिक्षक, विद्यार्थी, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध क्षेत्रातील मान्यवर सहभागी झाले. 'झाडे लावा, झाडे जगवा' या घोषणांनी परिसरात चैतन्य निर्माण केले. अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या आईच्या नावे झाडे लावून उपक्रमात भावनिक सहभाग नोंदवला. धामणगावं नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी पूनम कळंबे यांनी सांगितले की, एक झाड आईच्या नावे लावणे हीच खरी मातृवंदना आहे. लावलेली झाडे जगवण्यासाठी नागरिकांनी पुढाकार घ्यावा. असे आवाहन यावेळी करण्यात आले. पर्यावरणपूरक दृष्टिकोनातून राबवण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत असून, इतर संस्थांसाठीही हा उपक्रम प्रेरणादायी ठरत आहे.

# नवीन शैक्षणिक धोरणात परिवर्तन घडविणार : ना. चंद्रकांत पाटील

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. २५ :** संत गाडगेबाबा व डॉ. पंजाबराव देशमुख यांनी दिलेल्या शिक्षण परंपरेतूनच विद्यार्थ्यांना ज्ञान देण्याचा प्रयत्न होत असून, केवळ पुस्तकी नव्हे तर प्रात्यक्षिकात्मक शिक्षणावर भर देणारे नवीन शैक्षणिक धोरण देशाचे भविष्य घडवणारे आहे, असे प्रतिपादन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले.

अखिल महाराष्ट्र फेडरेशन ऑफ प्रिन्सिपल्स असोशिएशन ऑफ नॉन गव्हर्नमेंट कॉलेजेसच्या 40व्या राज्यस्तरीय अधिवेशनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. हा कार्यक्रम श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या वतीने डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालयाच्या सभागृहात झाला.



या वेळी डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे, डॉ. मिलिंद बारहाते, डॉ. अतुल वैद्य, आमदार किरण सरनाईक, डॉ. शैलेंद्र देवळाणकर, डॉ. केशव तुपे, डॉ. आबासाहेब देशमुख, प्राचार्य नंदकुमार निकम, डॉ. सुधाकर जाधवर यांच्यासह राज्यातील अनेक प्राचार्य उपस्थित होते. ना. पाटील यांनी सांगितले की, शिक्षण हे उद्योग व रोजगाराशी जोडले पाहिजे. मातृभाषेतून शिक्षण, भारतीय ज्ञान परंपरेचा समावेश, संशोधनास प्रोत्साहन ही या धोरणाची वैशिष्ट्ये आहेत. हर्षवर्धन देशमुख यांनी अध्यक्षीय भाषणात सांगितले की, राज्यात शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी प्राचार्य आणि व्यवस्थापन यांच्यात समन्वय गरजेचा आहे. या वेळी स्मरणिकेचे प्रकाशन, पुस्तक प्रकाशन आणि 'इंडस्ट्री-हायर एज्युकेशन लिंकेज पोर्टल'चे उद्घाटन झाले. प्राचार्य डॉ. स्मिता देशमुख यांनी कार्यक्रमाचे संचालन केले तर डॉ. अंबादास कुलट यांनी आभार मानले.



## थोडक्यात



### पांढरकवडा उपजिल्हा रुग्णालयात 'महाडायलेसिस सेंटर' सुरू

**पांढरकवडा :** येथील उपजिल्हा रुग्णालयात नव्याने सुरू करण्यात आलेल्या 'महाडायलेसिस सेंटर'चे लोकार्पण आमदार राजू तोडसाम यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले. या आठ खाटांच्या सुविधेमुळे तालुक्यातील रुग्णांची मोठी सोय झाली असून, त्यांना मोफत डायलिसिस मिळणार आहे. अध्यक्षीय भाषणात आमदार तोडसाम यांनी आरोग्य विभागाने आदिवासी बांधवांसाठी अधिक प्रभावीपणे काम करण्याची गरज असल्याचे सांगितले. तसेच, रुग्णालयातील ट्रॉमा केअर युनिट बंद असल्याबद्दल खंत व्यक्त केली. जिल्हा शल्यचिकित्सक सुखदेव राठोड यांनी पांढरकवडा रुग्णालयाला उत्कृष्ट म्हटले. रुग्णालयाच्या अधीक्षक वैशाली सातुरवार यांनी प्रास्ताविकातून सेंटरची माहिती दिली. कार्यक्रमाला शंतनू दुधाडे, डॉ.भागवत रेजिवाड, दिनेश झांबरे, आनंद वैद्य, गजानन बेजंकीवार, बंटी जुवारे, किशोर देशेट्टीवार, मंगेश वारेकर, मोबीन पटेल, विशाल चव्हाण आदी उपस्थित होते. संचालन राजेंद्र वाघमारे यांनी तर आभार वैद्यकीय अधिकारी मडावी यांनी मानले.




### मोहनाबाई कन्या शाळेत पोलिसांचे मार्गदर्शन

**दिग्रस :** विद्यार्थिनींना विविध कायद्यांची माहिती व्हावी आणि त्यांच्यात सुरक्षेविषयी जागरूकता निर्माण व्हावी, या उद्देशाने दिग्रस पोलिसांनी येथील मोहनाबाई कन्या शाळेत विशेष मार्गदर्शन शिबिर आयोजित केले. शाळेच्या मुख्याध्यापिका अनिता नगराळे यांच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात ४०० पेक्षा जास्त विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या. यावेळी पोलीस निरीक्षक वैजनाथ मुंडे यांनी महिलांवरील अत्याचार, नवीन तीन कायदे, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर आणि मोटार वाहन कायद्यावर सविस्तर माहिती दिली. पोलीस उपनिरीक्षक राजेश लाखकर, महिला हेड कॉन्स्टेबल संध्या धूरधवे, वाहतूक शाखेचे पोलीस अंमलदार सुनील राठोड आणि गोपनीय शाखेचे अमलदार मिलिंद धाडवे यांनीही विद्यार्थिनींना महत्त्वाच्या सूचना दिल्या. याच कार्यक्रमात, शासनाच्या निर्देशानुसार शाळेत परिवहन समितीची स्थापना करण्यात आली. या समितीच्या अध्यक्षपदी मीना पाटील यांची तर उपाध्यक्षपदी मुख्याध्यापिका अनिता नगराळे यांची निवड करण्यात आली. या उपक्रमामुळे विद्यार्थिनींच्या ज्ञानात मोलाची भर पडली.

### यवतमाळ जिल्हा 'मोतिबिंदू मुक्त' करण्यासाठी विशेष मोहीम सुरू

**यवतमाळ :** आरोग्य विभागाच्या वतीने 'मोतिबिंदू मुक्त महाराष्ट्र' या विशेष मोहिमेला यवतमाळ जिल्ह्यात सुरुवात झाली आहे. २२ जुलै ते २२ ऑगस्ट २०२५ या महिनाभराच्या कालावधीत चालणाऱ्या या अभियानाचे उद्घाटन आमदार बाळासाहेब मांगुळकर यांच्या हस्ते करण्यात आले. या मोहिमेअंतर्गत जिल्ह्यातील सर्व नागरिकांना मोफत नेत्र तपासणी आणि मोतीबिंदू शस्त्रक्रिया उपलब्ध करून दिली जाणार आहे. उद्घाटन प्रसंगी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुखदेव राठोड, जिल्हा नेत्र शल्यचिकित्सक डॉ. मनोज तगलपल्लेवार, डॉ. प्रशांत चव्हाण आणि नेत्रतज्ज्ञ डॉ. स्मिता चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उपस्थितांना मोतीबिंदूची लक्षणे आणि उपचारांची माहिती देण्यात आली. जिल्ह्यातील ४० वर्षांवरील सर्व नागरिकांनी या मोहिमेचा लाभ घेण्यासाठी जवळच्या शासकीय रुग्णालयात नेत्र तपासणी करून घ्यावी, असे आवाहन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुखदेव राठोड यांनी केले आहे.

# स्वप्न साकारण्यासाठी परिश्रम करा

## पालकमंत्री संजय राठोड : रोजगार मेळाव्यात युवकांशी संवाद, पंडित दिनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २५ : युवकांनी केवळ पदवीवर अवलंबून न राहता कौशल्य आत्मसात करावे आणि स्वप्नपूर्तीसाठी त्याला परिश्रमाची जोड द्यावी, असे प्रतिपादन पालकमंत्री संजय राठोड यांनी केले. जिल्हा कौशल्य विकास केंद्रातर्फे जाजू महाविद्यालयात आयोजित रोजगार मेळाव्यात ते दूरदृश्य प्रणालीद्वारे युवकांशी संवाद साधत होते. यावेळी १४ नामांकित कंपन्यांनी मुलाखती घेतल्या.**



जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्यावतीने येथील हरिकिसन जाजू महाविद्यालयात पंडित दिनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याच्या उद्घाटनप्रसंगी आदिवासी विकास मंत्री प्रा.डॉ.अशोक उईके, आमदार बाळासाहेब मांगुळकर, प्रभारी जिल्हाधिकारी अनिल खंडागळे, सहायक आयुक्त पी.बी. जाधव, संस्थेचे अध्यक्ष प्रकाश जाजू, सचिव आशिष जाजू, शिल्पा जाजू, प्राचार्य रितेश चांडक आणि प्रफुल चव्हाण उपस्थित होते.

पालकमंत्री संजय राठोड यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे युवकांशी संवाद साधला. ते म्हणाले की, आजचे युग हे केवळ पदवी किंवा शिक्षणावर चालत नाही, तर कौशल्यावर चालते. शिक्षण घेऊनही अनेकांना नोकरी मिळत नाही, त्यामुळे शिक्षणासोबतच कौशल्य विकास आवश्यक आहे. कौशल्य विकसित केल्यास अधिक चांगल्या संधी मिळू शकतात. या मेळाव्याच्या माध्यमातून विविध कंपन्या नोकऱ्या घेऊन थेट तुमच्या दारात आल्या आहेत, या संधीचे सोने करा, असे आवाहन त्यांनी केले. छोट्या सुरुवातीतून मोठे ध्येय गाठा, स्वप्ने प्रत्यक्षात आणण्यासाठी मेहनत करा आणि मोठे व्हा, असा सल्लाही पालकमंत्र्यांनी युवकांना दिला.

### युवकांसाठी विविध शासकीय योजना

**शासनाने युवकांसाठी अनेक योजना आणल्या आहेत, असे पालकमंत्र्यांनी सांगितले. 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजने'तून शासकीय व खाजगी कार्यालयांमध्ये विद्यावेतनाचा लाभ घेता येतो. जे स्वयंरोजगार करू इच्छितात, त्यांना शासन स्टार्टअपच्या माध्यमातून आणि विविध कर्ज देणाऱ्या महामंडळांच्या साहाय्याने मदत करते. युवकांनी या संधींचा लाभ घेऊन मोठे व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.**

### ४७० पदांसाठी घेतल्या थेट मुलाखती

**जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्यावतीने हा पंडित दिनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला होता. यामध्ये सहभागी १४ नामांकित कंपन्यांनी त्यांच्याकडील ४७० रिक्त पदांसाठी नोकरीइच्छुक उमेदवारांच्या थेट मुलाखती घेतल्या. संधी आपल्या दारातच आहे, तिचा युवकांनी फायदा घ्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन सिमा खिरोडकर यांनी केले, तर आभार कॉलेज ऑफ मॅनेजमेंट अँड कॉम्प्युटर सायन्सच्यावतीने व्यक्त करण्यात आले.**

# आर्णी तहसीलसमोर नागरिकांची लूट

## १ रुपयाच्या अर्जासाठी १० रुपये वसुली, झेरॉक्स दुकानदारांची मनमानी

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**आर्णी, दि. २५ :** तहसील कार्यालयात विविध कामांसाठी येणाऱ्या सामान्य नागरिकांची आणि शेतकरी-शेतमजुरांची दिवसाढवळ्या आर्थिक लूट सुरू आहे. कार्यालयासमोरील झेरॉक्स केंद्रांवर अवघ्या एक रुपयाच्या शासकीय अर्जासाठी ५ ते १० रुपये उकळले जात असून, या मनमानी कारभारामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष देऊन कारवाई करावी, अशी जोरदार मागणी जोर धरत आहे.



तहसील कार्यालयात ७/१२ उतारा, उत्पन्न प्रमाणपत्र, जातीचे दाखले यांसारख्या अनेक कामांसाठी अर्ज लागतात. शासनाने या अर्जांचे दर निश्चित केले असले, तरी बाहेरील दुकानदार त्याची सर्रासपणे अवहेलना करत आहेत. याचा सर्वाधिक फटका ग्रामीण भागातून येणाऱ्या शेतकरी, मजूर, महिला आणि वयोवृद्ध नागरिकांना बसत आहे. याशिवाय, तहसील कार्यालयातील 'रेकॉर्ड रूम'मध्येही कोणत्या कामासाठी किती शुल्क लागते, याचे दरपत्रक लावलेले नाही. या अपारदर्शकतेमुळे दलालांचे फावत असून भ्रष्टाचाराला खतपाणी मिळत असल्याचा आरोप नागरिक करत आहेत. हा प्रकार म्हणजे केवळ आर्थिक शोषण नसून जनतेच्या विश्वासाचा भंग आहे. त्यामुळे तहसीलदारांनी या गंभीर प्रकारात तातडीने हस्तक्षेप करावा, झेरॉक्स दुकानदारांवर कारवाई करावी, रेकॉर्ड रूमबाहेर दरपत्रक लावावे आणि शेतकरी-मजुरांसाठी 'सहाय्यता कक्ष' स्थापन करावा, अशा मागण्या नागरिकांकडून केल्या जात आहेत. ऑनलाइन प्रणाली असली तरी, आजही बहुसंख्य नागरिक प्रत्यक्ष कार्यालयात येत असल्याने त्यांची ही लूट थांबवणे आवश्यक बनले आहे.

# नेर येथील दि इंग्लिश हायस्कूलमध्ये 'सखी सावित्री' समितीचे गठण




दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नेर (परसोपंत), दि. २५ :** महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार, येथील दि इंग्लिश हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेसाठी 'सखी सावित्री' समितीची स्थापना करण्यात आली. पर्यवेक्षिका किरण रॉय यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात विद्यार्थिनींना विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. निवेदिता चव्हाण यांनी मासिक पाळीतील स्वच्छता आणि आरोग्यविषयक सवयींबद्दल महत्त्वाची माहिती दिली. तर, पोलीस प्रतिनिधी मेघा फाळके यांनी विद्यार्थिनींना 'गुड टच' आणि 'बॅड टच' मधील फरक समजावून सांगितला. निकोप आणि भयमुक्त वातावरणासाठी विद्यार्थिनींनी मोकळेपणाने संवाद साधावा, असे आवाहन अध्यक्ष किरण रॉय यांनी केले. कार्यक्रमाला अंगणवाडी सेविका संगीता राजूरकर आणि महिला प्रतिनिधी वैशाली वाडेकर यांचीही प्रमुख उपस्थिती होती. सूत्रसंचालन रितिजा जिरापुरे यांनी केले, तर आभार नयना धुर्वे यांनी मानले. या उपक्रमाला विद्यार्थिनी व महिला पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

# लोकमान्य टिळकांचा पुतळा मूळ जागी स्थापित करा



दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**वणी, दि. २५ :** शहरातील टिळक चौकातील लोकमान्य टिळकांचा पुतळा त्याच्या मूळ जागी पुन्हा स्थापित करण्याच्या मागणीसाठी शुक्रवारी एक लक्षवेधी आंदोलन करण्यात आले.

सामाजिक कार्यकर्ते जयंत त्रिवेदी यांनी स्वतः लोकमान्य टिळकांची वेशभूषा धारण करून शहरातून थेट तहसील कार्यालयापर्यंत पायी मोर्चा काढून सर्वांचे लक्ष वेधले. रस्ता कामासाठी तात्पुरता हटवलेला हा पुतळा अद्याप बसवण्यात आलेला नाही. प्रशासनाने नगर परिषदेला तात्काळ निर्देश देऊन जनभावनांचा आदर करावा, अशी मागणी त्यांनी निवेदनाद्वारे केली. या आगळ्यावेगळ्या आंदोलनात त्यांच्यासोबत मोठ्या संख्येने नागरिक आणि कार्यकर्ते देखील सहभागी झाले होते.

# राष्ट्रभक्तीने प्रेरित होऊन समाजहिताचे कार्य करा

## प्राचार्य डॉ. श्रीकांत पर्बत : दाते अध्यापक विद्यालयात नवागतांचे स्वागत

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २५ :** येथील दाते अध्यापक विद्यालयात (डी. एड. कॉलेज) डी.एल.एड. प्रथम वर्षातील नवागत विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. महाविद्यालयाच्या परंपरेनुसार, द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी १७ जुलै रोजी या कार्यक्रमाचे आयोजन करून, आपल्या सहकारी मित्रांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत केले.




कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीकांत पर्बत होते, तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. प्रशांत गावंडे उपस्थित होते. त्यांच्यासोबत मंचावर प्रा. कैलास बोके, प्रा. शितल माकोडे व प्रा. डॉ. नीता देवतळे यांचीही उपस्थिती होती. पसायदानाने कार्यक्रमाची सुरुवात झाल्यानंतर मान्यवरांच्याहस्ते दीपप्रज्वलन आणि प्रतिमापूजन करण्यात आले. द्वितीय वर्षाची विद्यार्थिनी स्वाती करपाते हिने स्वागतगीत सादर केले. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना, डॉ. प्रशांत गावंडे म्हणाले, 'पुरातन शिक्षण पद्धतीसोबतच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शिक्षकांनी आपले ज्ञान अद्ययावत ठेवावे, ज्याचा फायदा देशाला होईल.' अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. श्रीकांत पर्बत यांनी राष्ट्रभक्तीने प्रेरित होऊन समाजहिताचे कार्य करणाऱ्या आदर्श शिक्षकांची पिढी घडवण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आचल उभाड हिने, प्रास्ताविक धनश्री मुकरे हिने, तर आभार प्रदर्शन सोनल अंकुशकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कल्याणी होले, अकलाक सिद्धकी, प्रथमेश कात्रे, स्वाती करपाते, प्रिया वाघाडे, मनस्वी डंबारे, वैष्णवी गुल्हाने, आणि वर्षा भड यांनी परिश्रम घेतले. वंदे मातरमने कार्यक्रमाची सांगता झाली.

# आर्णी येथे सर्वपक्षीय चक्काजाम आंदोलन



दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**आर्णी, दि.२५:** 'शेतकऱ्यांचा सातबारा कोरा झालाच पाहिजे' या प्रमुख मागणीसाठी, 'प्रहार'चे अध्यक्ष बच्चू कडू यांच्या राज्यव्यापी आवाहनानुसार आज आर्णीत सर्वपक्षीय चक्काजाम आंदोलन करण्यात आले.

दाभडी रोडवरील पाण्याच्या टाकीजवळ झालेल्या या आंदोलनात विविध पक्षांचे नेते आणि कार्यकर्ते एकत्र आले. यामध्ये 'प्रहार'चे तालुकाध्यक्ष रवी जाधव, मनसेचे तालुकाध्यक्ष सचिन यलगंदेवार, राष्ट्रवादी काँग्रेसच्या जिल्हा उपाध्यक्ष रंजना आडे आणि वंचित बहुजन आघाडीचे तालुका प्रमुख उत्तम मुनेश्वर यांनी नेतृत्व केले. आंदोलनात कपिल ठाकरे, अजय पिलकुळे, महेश बांते, धीरज कोडापे, ओम राऊत, बलदेव आडे, पंकज रत्ने, दीपक बोरकर, शुभम राऊत, विकास ठमके, अजय राठोड, अंगत राठोड, संतोष पत्रे, विजय बनसोड, रवींद्र पाटील, सौरभ राठोड, गोपाल राठोड, संदीप पवार, विजय राठोड, साहोर, देवेंद्र राठोड, संजय राठोड, विनोद जाधव, अविनाश राठोड, विशाल राठोड, रामदास चव्हाण आदींसह असंख्य शेतकरी बांधव सहभागी झाले होते. ठाणेदार नीलेश सुरळकर यांनी चोख पोलिस बंदोबस्त ठेवला होता.

# वाढदिवसाला गिफ्ट नको, आईच्या नावाने एक झाड लावा

## पांडुरंग खांदवे यांचे आवाहन : 'एक पेड माँ के नाम' अभियानांतर्गत चिमुकल्यांनी लावली झाडे

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २५ : भारत सरकारच्या 'मेरा युवा भारत' अभियानांतर्गत, यवतमाळ येथील उबुंटू इंग्लिश स्कूलमध्ये 'एक पेड माँ के नाम' हा वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी, शाळेतील चिमुकल्यांनी 'वृक्ष दिंडी' काढून आपल्या आईच्या नावाने झाडे लावली आणि निसर्ग संवर्धनाचा संदेश दिला. यावेळी वाढदिवसाला गिफ्ट न देता, आपल्या आईच्या नावाने घराच्या परिसरात किंवा सार्वजनिक ठिकाणी झाडे लावून त्याची जपवणूक करावी, असे भावनिक आवाहन पांडुरंग खांदवे यांनी केले.**




भारत सरकारच्या 'मेरा युवा भारत' युवा कार्यक्रम विभागाच्यावतीने, शहरातील उबुंटू इंग्लिश स्कूल येथे 'एक पेड माँ के नाम' या देशव्यापी कार्यक्रमांतर्गत वृक्षारोपण करण्यात आले. मुलांना लहान वयातच निसर्गाबद्दल प्रेम लागावे, वृक्षलागवडीतून निसर्गाचा समतोल राखण्याची सवय लागावी आणि आपल्या आईच्या नावाने एक झाड लावून त्याची जोपासना करता यावी, हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. यावेळी शाळेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि मुख्याध्यापिका यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

या महत्वपूर्ण कार्यक्रमासाठी 'मेरा युवा भारत' कार्यालयाचे अनिल ढेंगे, उबुंटू इंग्लिश स्कूलचे अध्यक्ष पांडूरंग खांदवे, संभाजी राणे, उपाध्यक्ष शुभांगी बोरखडे, निखिल आडे, समन्वयक अक्षय शहाडे, क्रीडा शिक्षक अश्विन यादव, कला शिक्षक नरेंद्र पाटणे आणि संगीत शिक्षक सुधाकर वासनिक यांच्यासह इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अनिल ढेंगे, मनिष आडे आणि रवि शेळके यांनी शाळेच्या सहकार्याने विशेष परिश्रम घेतले.

### चिमुकल्यांची 'वृक्ष दिंडी'

**या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरली ती चिमुकल्या मुलांनी काढलेली 'वृक्ष दिंडी'. 'एक पेड माँ के नाम', 'झाडे लावा झाडे जगवा', 'कावळा करतो काव काव, माणसा माणसा झाडे लाव' अशा घोषणा देत मुलांनी जनजागृती केली. या दिंडीनंतर, चिमुकल्या हातांनी मोठ्या उत्साहात शाळेच्या परिसरात आणि रस्त्याच्या कडेला कडुलिंबाची झाडे लावण्यात आली.**

अजिंक्य भारत
# आपलं यवतमाळ
शनिवार, दि. २६ जुलै २०२५


## शॉर्टक्यात

### अपघातात एकाचा मृत्यू

**आर्णी :** आर्णीजवळ राष्ट्रीय महामार्ग ३६१ वर शुक्रवारी, (दि.२५) ॲपे वाहनाची ट्यूब फुटल्याने झालेल्या भीषण अपघातात एकाचा मृत्यू झाला, तर पाच जण गंभीर जखमी झाले. चौधरी पेट्रोल पंप ते गुरुनानक ढाब्यादरम्यान ही घटना घडली. शेलू उर्फ झेंडू जवळा मार्गे हे (एमएच २९, एन ९४८१) क्रमांकाचे वाहन चालवत असताना, टायर ट्यूब फुटल्याने त्यांचे नियंत्रण सुटले आणि ॲपे रस्त्यावरच पलटले. या अपघातात शेलू (ब्राह्मणवाडा) येथील रहिवासी सुरेश धनेश्वर मनवर (वय ५२) यांचा डोक्याला जबर मार लागल्याने मृत्यू झाला. सर्व जखमींना यवतमाळ शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले. याच ठिकाणी आठवड्यातील ही दुसरी मोठी अपघात घटना आहे.

### बंद घर फोडून ५० हजारांची चोरी

**यवतमाळ :** येथील जी.एन. पार्क परिसरात एका बंद घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने तब्बल ५० हजार रुपयांची रोकड लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. ही घरफोडी १५ ते २३ जुलै या कालावधीत घडल्याची प्राथमिक शक्यता वर्तवण्यात येत आहे. फिर्यादी अशोक सदाशिव गुल्हाणे हे कामानिमित्त घराबाहेर असताना चोरट्याने ही संधी साधली. चोरट्याने घरात प्रवेश करून लोखंडी आलमारीत ठेवलेली ५० हजारांची रोख रक्कम चोरून नेली. याप्रकरणी गुल्हाणे यांच्या तक्रारीवरून शहर पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध घरफोडीचा गुन्हा दाखल केला आहे.

### अपघातात एक गंभीर जखमी

**वडकी :** येथील बसस्थानकावरून घराकडे पायी जात असताना एका व्यक्तीला भरधाव दुचाकीने धडक दिल्याची घटना १२ जुलै रोजी घडली आहे. या घटनेप्रकरणी कैलास दिवाकर येरेकार यांनी दिलेल्या तक्रारीवरून वडकी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. आरोपी शुभम गुरनुले याने आपली एम.एच. ९६४९ क्रमांकाची दुचाकी निष्काळजीपणे व भरधाव चालवून येरेकार यांना जोरदार धडक दिली. या अपघातात ते गंभीर जखमी झाले आहेत. वडकी पोलिस आरोपी शुभम गुरनुले याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून त्याचा कसून शोध घेत आहेत.

# दारूतस्करीचा मोठा डाव उधळला

## पुसद शहर पोलिसांची धडक कारवाई; ६४ लाखांच्या मुद्देमालासह सात जण ताब्यात

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि.२५: पुण्यातून नागपूरकडे जाणारी विदेशी दारू मध्येच विकून चोरीचा बनाव करण्याचा डाव पुसद शहर पोलिसांनी उधळून लावला आहे. गुरुवारी (दि. २४) माहूर रोड परिसरात केलेल्या एका धडक कारवाईत, पुसद शहर पोलिसांनी ६४ लाखांहून अधिक किमतीच्या मुद्देमालासह सात जणांना अटक केली आहे. या कारवाईमुळे अवैध दारू विक्री करणाऱ्यांचे मोठे रॅकेट उघडकीस आले आहे.**



पुसद शहर पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे, त्यांनी माहूर रोडवरील शिवाशीष रेसिडेन्सीजवळ सापळा रचला. यावेळी अशोक लेलँड ट्रकमधून (क्रं. एमएच १२ वायबी ००४८) अवैधरीत्या दारूची विक्री सुरू असल्याचे आढळले. पोलिसांनी ट्रकचालक मनीष ईश्वर सुरूळे (वय १९, रा. डोकसावंगी, कारेगाव, ता. शिरूर, जि. पुणे) याच्यासह दारू खरेदी करणारे रामेश्वर मधुकर पवार (वय २४), सचिन उहल चव्हाण (वय २३), सतीश श्रावण चव्हाण (वय २४), गोकूळ बाबूसिंग चव्हाण (वय २३), विक्रम बळिराम जाधव (वय २०), सर्व रा. तुळशीनगर, ता. महागाव, प्रवीण दत्ता जिजोरे (वय ३०, रा. वाई गौळ, ता. मानोरा, जि. वाशीम) अशा एकूण सात जणांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांच्याकडून विदेशी दारू, ट्रक, तीन दुचाकी आणि सहा मोबाईल फोन असा एकूण ६४ लाख ७२हजार ३६०रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सर्व आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक प्रेमकुमार केदार करत आहेत.

### बोर्डीकर यांचा संबंध नाही

**पोलिसांनी सांगितले की, ही दारू पुण्याच्या हडपसरमधून नागपूरला अधिकृतपणे जात होती, मात्र चालकाने मध्येच विक्रीचा कट रचला. या ट्रकवर राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांचे नाव असल्याने खळबळ उडाली होती; परंतु, तपासात ट्रक मालक किंवा नावाचा या गुन्ह्याशी काहीही संबंध नसल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.**

# सहा वर्षांनी माहिती अधिकार अपिलावर सुनावणी

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**बाभूळगाव, दि.२५:** माहिती अधिकारात अर्ज करूनही माहिती नाकारल्याने तब्बल सहा वर्षांपूर्वी दाखल झालेल्या एका द्वितीय अपिलावर अखेर सुनावणीची तारीख निश्चित झाली आहे. राज्य माहिती आयुक्तांनी याप्रकरणी ५ ऑगस्ट रोजी सुनावणी ठेवली असून, बाभूळगावच्या तत्कालीन तहसीलदारांना प्रत्यक्ष हजर राहण्यासाठी नोटीस बजावली आहे. तत्कालीन तहसीलदाराने नियमांचे उल्लंघन करून स्वतःच्याच माहितीवरील अपील ऐकल्याचा आरोप या प्रकरणात करण्यात आला आहे.

माहिती अधिकार कार्यकर्ते सुधाकर अलोणे यांनी २४ डिसेंबर २०१९ रोजी तत्कालीन तहसीलदार आनंद देऊळगावकर यांच्या मुख्यालयी वास्तव्याबाबत माहिती मागितली होती. जनमाहिती अधिकारी तथा तत्कालीन निवासी नायब तहसीलदार योगिराज निवल यांनी ही माहिती 'वैयक्तिक व उपलब्ध नाही' असे सांगून देण्यास नकार दिला. याविरोधात अलोणे यांनी प्रथम अपील दाखल केले असता, तत्कालीन तहसीलदार आनंद देऊळगावकर यांनी स्वतःच त्यावर सुनावणी घेतली. वास्तविक, शासकीय परिपत्रकानुसार, ज्या अधिकाऱ्यांविषयी वैयक्तिक माहिती मागितली आहे, तो अधिकारी स्वतःच्या प्रकरणावर अपील ऐकू शकत नाही. या नियमांचे उल्लंघन झाल्याचा ठपका ठेवत अलोणे यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील (क्र. २८०/२०२०) दाखल केले होते. या प्रलंबित अपिलावर आता सहा वर्षानंतर सुनावणी होत आहे. राज्य माहिती आयुक्तांनी जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपिलीय अधिकारी यांना सुनावणीवेळी कोणत्याही प्रतिनिधीला न पाठवता 'प्रत्यक्ष हजर'राहण्याचे कठोर निर्देश दिले आहेत. त्यामुळे या सुनावणीत काय निर्णय लागतो आणि संबंधित अधिकाऱ्यांवर काय कारवाई होते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**CAPTION** श्रावणसरी आणि समृद्धी...



**दिग्रस : श्रावण महिन्याच्या आगमनाने डोंगर-दऱ्या आणि टेकड्या हिरव्यागार शालूने नटल्या आहेत. या मनमोहक हिरवळीवर मुक्तपणे चरताना दिसणारी गुरे-ढोरे डोळ्यांना आणि मनाला एक सुखद गारवा देतात. हे दृश्य केवळ निसर्गरम्य नसून, ते ग्रामीण जीवनातील समृद्धी आणि निसर्गासोबतच्या अतूट नात्याचे सुंदर प्रतीक आहे. जणू काही पावसाने आणि हिरवाईने जमिनीवर एक जिवंत चित्रच रेखाटले आहे.**

# सोशल मीडियावर दहशत माजविणाऱ्या टोळ्यांवर पोलिसांचा 'सायबर स्ट्राईक'

## १३ सराईत गुन्हेगार ताब्यात; यवतमाळ गुन्हे शाखेची विशेष मोहीम

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि.२५:** सोशल मीडियावर आक्षेपार्ह रील्स आणि फोटो टाकून दहशत निर्माण करणाऱ्या आणि एकमेकांना धमक्या देणाऱ्या गुन्हेगारी टोळ्यांवर यवतमाळ स्थानिक गुन्हेशाखेने 'सायबर स्ट्राईक'केला आहे. गुरुवारी (दि. २४) राबविलेल्या एका विशेष मोहिमेत, पोलिसांनी १३ सराईत गुन्हेगारांना ताब्यात घेऊन त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई केली.

जिल्हा पोलिस अधीक्षकांच्या आदेशानुसार, स्थानिक गुन्हे शाखेने सायबर पेट्रोलिंग आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सोशल मीडियावर सक्रिय असलेल्या गुन्हेगारी टोळ्यांची माहिती गोळा केली होती. काही सराईत गुन्हेगार 'ए.आर कंपनी', 'ए.बी कंपनी', 'बकासुर टोळी यवतमाळ', '३६केटीएम, 'ए.पी कंपनी', 'जिगरी ग्रुप', 'एफ.एफ.जी कंपनी', 'एस.डब्ल्यू. कंपनी', 'ए.पी. कंपनी ३०२' यासारखे व्हॉट्‌ॲप आणि इंस्टाग्राम ग्रुप तयार करून त्यावर आक्षेपार्ह व्हिडिओ आणि धमक्या पोस्ट करत असल्याचे निदर्शनास आले होते. या माहितीच्या आधारे पोलिसांनी विशेष पथके तयार करून एकाच वेळी १३ गुन्हेगारांना ताब्यात घेतले. त्यांना भविष्यात सामाजिक सलोख्याला बाधा पोहोचवणार नाही किंवा कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करणार नाही, याबाबत सक्त समज देण्यात आली आहे. यापुढेही सोशल मीडियावर बारकाईने लक्ष ठेवून, गुन्हेगार ज्या ठिकाणी रील्स बनवतात, त्या ठिकाणी पेट्रोलिंग करून कारवाई केली जाईल, असा इशारा पोलिसांनी दिला आहे. नागरिकांनीही अशा आक्षेपार्ह पोस्ट आढळल्यास तत्काळ सायबर सेल किंवा स्थानिक गुन्हे शाखेशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांनी केले आहे.

# यवतमाळच्या डॉ. चित्रा मात्रे यांचे 'नेट' परीक्षेत दैदिप्यमान यश

## देशातून दुसऱ्या, तर प्रवर्गातून प्रथम स्थानी

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि.२५:** विद्यापीठ अनुदान आयोगामार्फत (युजीसी) नुकत्याच जाहीर झालेल्या राष्ट्रीय पात्रता परीक्षेच्या (नेट) निकालात, यवतमाळच्या डॉ. चित्रा नितीश मात्रे यांनी देदीप्यमान यश संपादन केले आहे. त्यांनी पाली विषयात ९९.३१ पर्सेंटाईल गुण मिळवित संपूर्ण देशातून दुसरा, तर अनुसूचित जाती (एससी) प्रवर्गातून देशात प्रथम क्रमांक पटकावला आहे. या उज्ज्वल कामगिरीमुळेत्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

डॉ. चित्रा मात्रे या येथील दर्डा नगरातील रहिवासी असून, भूविकास बँकेचे माजी व्यवस्थापक सदाशिव मात्रे यांच्या स्नुषा आणि रेल्वेमध्ये टीटीई पदावर कार्यरत असलेल्या नितीश मात्रे यांच्या पत्नी आहेत. त्यांनी संभाजीनगर येथील मिलिंद महाविद्यालयातून 'पाली आणि बुद्धिझम' या विषयात ८४ टक्के गुणांसह पदव्युत्तर पदवी (एम.ए.) प्राप्त केली आहे. कुटुंबाची जबाबदारी यशस्वीपणे सांभाळत त्यांनी हे यश मिळविले, हे विशेष उल्लेखनीय आहे. या यशामुळे त्या आता 'असिस्टंट प्रोफेसर'पदासाठी आणि 'पीएचडी'साठी पात्र ठरल्या आहेत. भविष्यात पाली भाषेतच संशोधन (पीएचडी) करण्याचा त्यांचा मानस



आहे. त्या सध्या समाजात पाली भाषा आणि बुद्ध धम्माच्या प्रचार-प्रसाराचेही महत्त्वपूर्ण कार्य करतात. या यशानंतर प्रतिक्रिया देताना, डॉ. मात्रे यांनी आपल्या यशाचे श्रेय डॉ. संघमित्रा जाधव (कल्याण), डॉ. प्रमोद इंगोले (पाली विभाग प्रमुख, मिलिंद महाविद्यालय, संभाजीनगर) आणि आपल्या संपूर्ण कुटुंबीयांना दिले आहे. त्यांच्या या नेत्रदीपक यशाबद्दल त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत असून, पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# वणीत ऑनलाइन वरली मटका अड्ड्यावर छापा

## तेलंगणातील दोघांसह चौघांना अटक, एक लाख ५४ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि.२५:** वणी पोलिसांनी पद्मावती नगरी येथील एका फ्लॅटमध्ये सुरू असलेल्या ऑनलाइन वरली मटका अड्ड्यावर छापा मारून तेलंगणातील दोघांसह चौघांना अटक केली आहे. या प्रकरणी पोलिसांनी फ्लॅट मालकावरही गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी घटनास्थळावरून एक लाख ५४ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलिस उपनिरीक्षक धीरज गुल्हाने यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांनी पथकासह पद्मावती नगरीतील एका फ्लॅटवर छापा मारला. या कारवाईत पोलिसांनी गोपीनाथ सोमय्याजुलु बंडी (वय ६०, रा. वारंगल, तेलंगणा), राजेंद्र यादगीरी येलगंटी (वय ५२,



रा. पेगडामपल्ली, तेलंगणा), फरदीन अतिक अहेमद (वय २४, रा. सबा कॉलनी, वणी) आणि स्वामी कोमराया बोक्का (वय ३६, रा. म्युचाराला, तेलंगणा) यांना अटक केली. हे आरोपी मोबाईलद्वारे ऑनलाइन वरली मटका नावाचा जुगार खेळवत होते. पोलिसांनी घटनास्थळावरून दोन अँड्रॉइड मोबाईल (अंदाजे किंमत ४० हजार रुपये), दोन जुने मोबाईल (अंदाजे किंमत ४० हजार रुपये), दोन टॅब (अंदाजे किंमत २० हजार रुपये), एक प्रिंटर (अंदाजे किंमत २० हजार रुपये), दोन कॅल्क्युलेटर (अंदाजे किंमत ५०० रुपये), एक लॅपटॉप (अंदाजे किंमत २५ हजार रुपये), वरली मटका आकडे लिहिलेल्या चिठ्ठ्या आणि ९ हजार २०० रुपये रोख असा एकूण एक लाख ५४ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक धीरज गुल्हाने करीत आहेत. ही कारवाई उपविभागीय पोलिस अधिकारी किंद्रे यांच्या मार्गदर्शनात पोलिस निरीक्षक उंबरकर यांच्या आदेशानुसार पीएसआय धीरज गुल्हाने,पीएसआय अंकुश वडतकर, पोकाँ मिथुन राऊत, पोकाँ मानेश्वर खंडरे, पोकाँ गजानन कुडमेथे, पोकाँ नंदकुमार पुप्पुलवार यांनी केली आहे.

### फ्लॅट मालकावरही गुन्हा नोंद

**सदर फ्लॅट मनीष सुरावार (रा. वणी) यांच्या मालकीचा असून त्यांनी तो आरोपींना दहा हजार रुपये प्रतिमहिना भाड्याने दिला होता. सुरावार यांनी अवैध जुगारासाठी जागा उपलब्ध करून दिल्याने त्यांच्यावरही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्याच्या कलम ४ व ५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

# उमरखेड तालुक्यात पावसाचे दमदार पुनरागमन

## खरीप पिकांना मिळाले जीवदान; समाधानकारक पावसामुळे बळीराजा सुखावला

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

✦ संभाजी भोयर

**उमरखेड, दि.२५: मागील पंधरा ते वीस दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने उमरखेड तालुक्यात कोरड्या दुष्काळाचे सावट निर्माण झाले होते. खरीप हंगामातील सोयाबीन, कापूस, तूर यांसारखी पिके माना टाकू लागली होती, तर शेतकऱ्यांचे चेहरे चिंतेने काळवंडले होते. पावसाच्या या उघडिपीमुळे सोयाबीनवर हुमणी अळीचा आणि ऊस पिकावर पांढऱ्या माशीचा प्रादुर्भाव वाढल्याने शेतकरी दुहेरी संकटात सापडले होते. पिके वाचविण्यासाठी महागड्या औषधांची फवारणी करण्यापलीकडे त्याच्याकडे पर्याय उरला नव्हता.**



मात्र, गेल्या चार दिवसांपासून तालुक्यात सर्वत्र पावसाने दमदार पुनरागमन केले आहे. मृग, आर्द्रा आणि पुनर्वसू नक्षत्रात बरसलेल्या पावसाने सुरुवातीला पेरण्या साधल्या होत्या, पण त्यानंतरच्या विश्रांतीने निर्माण झालेली चिंता आता दूर झाली आहे. या रिमझिम आणि दमदार सरींमुळे सुकू लागलेल्या पिकांना संजीवनी मिळाली असून, शेतशिवारे पुन्हा एकदा हिरवीगार झाली आहेत. या दिलासामुळे बळीराजा सुखावला असून, शेतीच्या आंतरमशागतीच्या कामांनी मोठा वेग घेतला आहे. या पावसाचा सकारात्मक परिणाम तालुक्याची जीवनदायिनी असलेल्या इसापूर धरणाच्या पाणीसाठ्यावरही झाला आहे. पाणलोट क्षेत्रात झालेल्या पावसामुळेधरणातील पाणीसाठा ६५ टक्क्यांच्या वर पोहोचला आहे. सिंचनासाठी या धरणाचे महत्त्व अनन्यसाधारण असल्याने, तालुक्यातील जनतेच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. असे असले तरी, धरण पूर्ण क्षमतेने भरण्यासाठी अद्यापही मोठ्या पावसाची आवश्यकता कायम आहे. 'आभाळाकडे डोळे लावून जीव मेटाकुटीला आला होता. हाता-तोंडाशी आलेला घास पावसाअभावी हिरावला जातो की काय, या चिंतेने रात्रीची झोपही उडाली होती. पण वरुणराजाने कृपा केली आणि चार दिवसांच्या पावसाने पिकांनाच नाही, तर आमच्या जिवालाही जीवदान दिले, अशी प्रतिक्रिया शेतकरी व्यक्त करीत आहेत.

# शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीसाठी सर्वपक्षीय 'चक्काजाम'

## तासभर वाहतूक ठप्प; वाढोणा (बाजार) येथे रास्ता रोको आंदोलन

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**राळेगाव, दि.२५:** शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करून सातबारा कोरा करावा, या प्रमुख मागणीसाठी गुरुवारी (दि. २४) राळेगाव तालुक्यातील वाढोणा (बाजार) येथे विविध पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी आणि शेतकऱ्यांनी 'चक्काजाम' आंदोलन केले. सकाळी अकराच्या सुमारास वडकी-राळेगाव महामार्गावर वाहतूक रोखून धरत, शासनाचे लक्ष वेधण्यासाठी जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

सरकार कोणतेही असले तरी शेतकऱ्यांच्या शेतमालाला हमीभाव मिळत नाही. वाढलेला उत्पादन खर्च आणि कर्जाचा डोंगर यामुळे शेतकरी नैराश्यातून आत्महत्या करत आहे. त्यामुळे शासनाने दिलेले आश्वासन पाळून शेतकऱ्यांना कर्जमुक्त करावे, अशी तीव्र मागणी आंदोलकांनी केली. यावेळी केवळ शेतकरीच नव्हे, तर मेंढपाळ, मच्छीमार, शेतमजूर, कामगार आणि दिव्यांग बांधवांचे प्रलंबित प्रश्नही मांडण्यात आले. या सर्व घटकांना न्याय मिळावा, यासाठी हे आंदोलन शांततेच्या मार्गाने करण्यात आले. या आंदोलनामुळे रस्त्याच्या दुतर्फा वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. या आंदोलनात प्रहार जनशक्ती पक्षाचे तालुकाध्यक्ष संजय दुरबुडे, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) तालुका अध्यक्ष दिलीप कन्नाके, शिवसेना (उद्धव ठाकरे गट) जिल्हा उपाध्यक्ष विनोद काकडे, राहुल बहारे, चंद्रकांत झाडे, नगरसेवक मधुकर राजुरकर, सय्यद लियाकत अली, श्याम धुर्वे, दिनेश करपते, शेखर अंबाखाये, प्रमोद अमृतकर, जितेंद्र काहुरके, मधुकर पावडे, प्रमोद ढाले, सुनील फटिंग, बादल देवतळे, प्रदीप गुजरकर, किशोर गलांडे, विष्णू तोडासे यांच्यासह विविध पक्षांचे नेते, दिव्यांग बांधव आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.